म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. २०९३
१९३३

# गीतगुंजन

REFBK-0004943
REFBK-0004943

—सरोमसुहृद.

# गीतगुंजन

[ भाग पहिला ]

कवि

**सरोजसुहृद्**

REFBK-0004943
REFBK-0004943

आवृत्ति पहिली

१९३३

किंमत १ रुपया


मुद्रकः—रघुनाथ दिपाजी देसाई
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस.
१०० डी, गिरगांव मुंबई ४.

महाराष्ट्राचें आवडतें
सर्वांग सुंदर मासिक
नवजीवन
संपादकः—नारायण रामचंद्र मोरे
या मासिकाच्या प्रत्येक अंकांत विद्वानांचे विद्वत्ता-प्रचुर लेख, प्रवासवर्णनें, चटकदार लघुकथा, प्रतिभाशाली कवींच्या सुंदर कविता, तज्ञांचीं परीक्षणें; आणि, नामांकित चित्रकारांचीं नयनमनोहर तीन रंगी, दोन रंगी चित्रें येतात.
वार्षिक वर्गणी ५ रु. ट. ख. सह.
एका प्रतीस आठ आणे
कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.
मॅनेजर 'नवजीवन' ऑफिस
२२४, पांडुरंगवाडी, गिरगांव मुंबई ४

प्रकाशकः—गोविंद भार्गव घाणेकर
व्यवस्थापक सहकारी ग्रंथकार.
नवाकाळवाडी, गिरगांव-मुंबई ४

[ या पुस्तका संबंधीं सर्व हक्क कर्त्याचे स्वाधीन आहेत. ]

स्थळ प्रत
नं.
ता.
ठा जं.



पतितपावन श्रीमंत सरकार महाराज सयाजीराव गायकवाड
सेनाखासखेल समशेर बहादुर
जी. सी. एस. आय; जी. सी. आय. ई, एल. एल. डी.

स.क्रो ०५
ता. २८/५/३३

# समर्पणपत्रिका

श्रीमंत सरकार **सयाजीराव महाराज गायकवाड**

यांस

श्रीकृष्णाचा भगवंताचा अवतारच भासतो । वाटतो
मंगलमय सुखशांत अरुण हा वटोदरीं तळपतो ॥
तमांधकारा नाशुनि रविसम ज्ञानतेज देउनी । पसरुनि
सकल पौरजन रंजन करितो तनुचंदन झिजवुनी ॥
या नृपतीची चतुराई ती बुधपंडित गुंगवी । मोहवी
जिंकुनी साही रिपूस राजा योगीजन भूषवी ॥
राष्ट्र हिंद हें विमुक्त व्हावें आस जया अंतरीं । साजिरी
वसंतकालीं प्रसन्न होई भारत-भू-सुंदरी ॥
महारथी हा अतिरथी ऐसा कृष्णासम सारथी । भारतीं
हातिं धरुनिया अस्पृश्याचा अर्जुन बसवी रथी ॥
राव सयाजी हा रणगाजी शौर्याचा सागर । आगर
जय बोलाया सदैव त्याचा गर्जत रत्नाकर ॥
गायन वादन चित्रकलांच्या सकल देवता झणी । येउनी
यश देउनीया ठाकिति मंदिरिं उभय करा जोडुनी ॥
कपोल कल्पित नव्हे कथा ही दर्शन घ्या नृपतिचे । आजचे
वानुनी त्याला पहा प्रचीती बोल हेच सलगिचे ॥
डुन्का गाजे, निशाण डोले पवनसखा खेळतो । भासतो
चिर स्नेहाची सलामी देतां मंत्रमुग्ध गुंगतो ॥
रावरंक ज्या समान सारे कुटुंब वसुधा गणी । बहुगुणी
युगायुगांतरिं दिगंत कीर्ति फडको यश गाउनी ॥
होती सारे प्रसन्न जन हे महोत्सवीं अर्चना । दर्शना
ओंकारांत जपुनी वाही मी शब्दमाळ पूजना ॥

—सरोजसुहृद

## गीतगुंजनांतील कविता

**यापूर्वीं खालील नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.**

| | |
|---|---|
| मनोरंजन | कुंजविहारी |
| मातृभूमि | सुबोध |
| नवजीवन | नवयुगमाला |
| यशवन्त | आन्ध्रसेवक |
| स्फूर्ति | सह्-विचार |
| आत्मबोध | मालवसाहित्य |
| खेळगडी | उषःकाल |
| मुलांचें मासिक | केसरी |
| लोकमित्र | श्रीशिवाजी |
| लोकसेवक | श्री लोकमान्य (खास अंक) |
| निर्झर | मौज ( खास अंक ) |
| प्राविण्य | सन्देश |
| वऱ्हाड शाळापत्रक | करमणुक ( खास अंक ) |

# अनुक्रमणिका


| नं. | कविता | पृष्ठ |
|---|---|---|
| ३२ | श्रीसमर्थ | २५ |
| ५६ | अनुताप | ४८ |
| १०६ | अपूर्वता | ९१ |
| १०१ | अभीष्टचिंतन | ८६ |
| ७६ | अमावास्येच्या रात्रीस | ६७ |
| ८७ | अये मायभूमि | ७७ |
| १७ | अवस्थात्रय | १४ |
| ६० | आई | ५२ |
| ७३ | आत्मज्योत | ६५ |
| १०३ | इषारा | ८८ |
| ६६ | उत्कंठिता | ५८ |
| १३ | उषाराणी | ११ |
| ४७ | कर्मवीर | ४० |
| ६४ | करुणदृश्य | ५६ |
| १०५ | कविसम्मेलन | ९० |
| २९ | कारभारीण | २३ |
| ९२ | कौतुक | ८० |
| ५ | खरा देशभक्त | ५ |
| ९४ | खुळा चांदोबा | ८१ |
| १८ | गाणें | १४ |
| २४ | गान माधुरी | १८ |
| ३९ | गुलजार तरुण | ३२ |
| १९ | गौळण | १५ |
| ७१ | चतुर्थीच्या चंद्रास | ६३ |
| ७० | चातक | ६२ |

| नं. | कविता | पृष्ठ |
|---|---|---|
| १२ | चेतना | १० |
| ५५ | चेंडूचा छंद | ४७ |
| १५ | जगाची रीत | १२ |
| ६१ | तानाजी-पत्नी-विलाप | ५३ |
| ४१ | तिचें पत्र | ३३ |
| १०७ | तुजसाठीं | ९२ |
| ८३ | तो वंद्य | ७४ |
| ८९ | नजरबंदी | ७९ |
| ७२ | नवल | ६४ |
| ५४ | नादब्रह्म | ४६ |
| ५९ | निर्झरिणी | ५१ |
| ४३ | निर्माल्य | ३५ |
| ५१ | नोकरीचा अर्ज | ४३ |
| १ | पहाट | १ |
| ८८ | परमात्मा कुठें आहे ? | ७८ |
| ९१ | परीक्षा | ८० |
| १६ | पुरुष-प्रकृति | १३ |
| ३४ | पैसा | २८ |
| ८० | पंजरी | ७१ |
| ५७ | पंढरी | ४९ |
| ८५ | प्रमाद | ७५ |
| ६९ | प्रश्न | ६१ |
| ८ | प्रियाराधन | ७ |
| ६५ | प्रेमग्रहण | ५७ |
| ८६ | फटिंग | ७६ |
| २५ | बाहुली | १९ |

| नं. | कविता | पृष्ठ |
|---|---|---|
| ६२ | भरारी | ५४ |
| ९८ | भवपार | ८४ |
| ३७ | भातुकली | ३० |
| ४९ | भावगीत | २४ |
| १०४ | भावी भारत | ८९ |
| ३५ | भुवनसुंदरा | २९ |
| ७७ | मराठा | ६८ |
| ८१ | महोत्सव | ७२ |
| २१ | माझा दादा | १६ |
| ८२ | माझी सिंधु | ७३ |
| ७५ | माता, | ६७ |
| ३० | मावळा हेर | २४ |
| १०२ | मी | ८७ |
| ४५ | मुलांफुलांची मौज | ३८ |
| ७९ | मुरलीवाला | ७१ |
| १०० | मोगरा | ८६ |
| २२ | या क्षणीं | १७ |
| ९३ | योगेश्वर | ८१ |
| २८ | रत्नाकर | २२ |
| ९७ | राधामाधव | ८३ |
| २ | रुचिवैचित्र्य | २ |
| ३ | लेखणी | ३ |
| ३१ | लोकमित्र | २५ |
| ४२ | वनदेवी | ३४ |
| ४६ | वनवासी | ३९ |
| ७४ | व्यथिता | ६६ |
| ७ | वासंतिक रात्र | ६ |
| १४ | विनोद | १२ |
| ३६ | विरस | ३० |
| ५० | विरहिणी | ४३ |
| २० | विषमता | १५ |
| ९५ | विश्वरंजन | ८२ |
| ६ | वेणुनाद | ५ |
| ४८ | वंदन | ४१ |
| १०८ | वंदे मातरम् | ९३ |
| ५८ | वृद्धेचें अश्रुमोचन | ५० |
| २७ | व्यक्ति स्वातंत्र्य | २१ |
| ४० | शंकिता | ३३ |
| २३ | शल्य | १७ |
| ४४ | शर्विलक | ३८ |
| ५२ | शाप | ४४ |
| ३८ | शेवटचा प्रणाम | ३१ |
| ७८ | समजलं हं | ७० |
| १० | समाधान | ९ |
| ९९ | संन्यासी | ८४ |
| ६३ | स्मशानांतलें गाणें | ५२ |
| ११ | सावधान | १० |
| ५३ | स्वार्थी चंद्र | ४६ |
| ९ | स्वार्थगीत | ८ |
| ६८ | स्वारी आली हं | ६० |
| ६७ | सिंहाचा छावा | ५९ |
| ९ | सेवा धर्म | २७ |
| ४ | हरवलेली कविता | ४ |
| ८४ | हरहर मोतिलाल गेला | ७५ |
| २६ | हिंदु | २० |
| ९० | हे श्याम सुंदरा | ७९ |
| ९६ | हौस | ८२ |

काव्य. १०६८
24/5/33
६८०१

# आभार

**गीतगुंजनाचा** पहिला भाग महन्मंगल परमेश्वरकृपेनें रसिकांस सादर करतांना अननुभूत आनंद होत आहे व त्याचा स्वीकार करून वाचकवृंद उपकृत करील असा आत्मविश्वास आहे.

कविता लेखनास सुरवात होऊन एक तपापेक्षां अधिक काळ लोटला आहे. कविवर्य **वसंतविहार** व नागपूरचे सुप्रसिद्ध कवि **आनंदरावजी टेकाडे** यांच्या सहवासांत काव्यप्रांतांतील वसंत-वैभव व अखंड आनंदाचा लाभ मला मिळाला.

या प्रथम भागांतील अनेक कविता ज्या नियतकालिकांच्या संपादकांनीं या पूर्वीच महाराष्ट्रास सादर केल्या त्यांचा नामनिर्देश इतरत्र केलेला आहे. या व्यतिरिक्त अनेक नियतकालिकांतून माझ्या कविता आल्या आहेत. या सर्व संपादकांचा मी मनःपूर्वक आभारी आहें. प्रस्तुत संग्रहांतील कवितांची निवड व सजावट करण्याचे कामांत माझे बंधुतुल्य प्रेमळ स्नेही कविवर्य श्री. **शंकरराव माडीवाले** बी. ए. यांनीं जी बहुमोल मदत केली, व अनेक मित्रांनीं जी मदत केली त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें हें माझें कर्तव्य होय. प्रस्तुत **गीतगुंजनाचें** परीक्षण करून बडोदा संस्थानच्या शिक्षणमंत्र्यांनीं गुर्जराधिपति श्रीमंत सरकार सर **सयाजीराव महाराज गायकवाड** यांस त्यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त अर्पण करण्याची परवानगी दिल्याबद्दल त्यांचें आभार मानणें इष्ट आहे.

माझ्या विनंतीला मान देऊन श्री. **भा. रा. धुरंधर** बी. ए. एल्एल् बी, **उपसंपादक** [illegible]ळ, यांनीं विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना लिहून दिली. तसेंच प्रकाशक या नात्यानें " **सहकारी ग्रंथकार** " चे चिटणीस श्री. **का. म.**

**ताम्हनकर** बी. ए. यांनीं दोन शब्द लिहिले त्याबद्दल त्यांचे खास आभार मानणें जरूर आहे. त्याचप्रमाणें '**न्यू भारत प्रेसचे**' चालक श्री. **रघुनाथराव देसाई** यांनीं छापखान्यांत कामाची अतिशय गर्दी असतांना देखील अवघ्या वीस दिवसांत पुस्तक छापून दिलें, व येथील सुप्रसिद्ध **लक्ष्मी आर्ट प्रेसच्या** चालकांनीं पुस्तकाचे अंतरंग व बाहिरंग मनोवेधक करण्यासाठीं सुंदर चित्रें अल्पावधींत तयार करून छापून दिलीं, व बडोद्याचे ब्लॉक मेकर श्री. विद्वांस यांनीं महाराजांचा सुंदर ब्लॉक करून दिला याबद्दल मी उपकृत आहें.

पुस्तकाची छपाई व इतर सर्व कामें तीन आठवड्यांत झाल्यामुळें पुस्तकांत प्रूफें तपासण्याच्या बाबतींत अनेक चुका राहून गेल्या आहेत व रसिक जन त्याबद्दल क्षमा करतील अशी आशा आहे.

वस्तुतः ति. स्व. श्री. **कृष्णाजी अनंत ऊर्फ दादासाहेब केळकर** यांनीं प्रथमपासून माझा पुरस्कार घेऊन जी आस्था दाखविली त्याबद्दल आनंद व्यक्त करण्यास शब्दच अपुरे आहेत. ज्यांच्या प्रेमळ छत्राखालीं माझें लालन पालन संवर्धन व शिक्षण झालें व ज्यांनीं मला सदैव उत्तेजन दिलें. त्या कै. ति. स्व. **आप्पासाहेब पेंडसे** यांचे चरणीं माझे शतशः प्रणाम असोत. तसेंच **वडिल मातोश्रींच्या** पुण्याईनें आज आनंद लाभला त्यांनाहि वंदन करीत आहें.

दयाघन परमेश्वराच्या प्रेमळ साउलीनें हे **गीतगुंजन** प्रकाशित झालें त्यांस वंदन करून रसिक वाचकांना प्रेमाची अभिवृद्धि व्हावी अशी विनंति करून हा लेखविस्तार संपवितों.

आर. के. बिल्डींग स्टेशन रोड,
माहीम-मुंबई १६
महाशिवरात्र ता. २२-२-३३

सरोज सुहृद

# प्रकाशकांचें निवेदन

**सहकारी ग्रंथकार** या प्रकाशक संस्थेच्या प्रकाशन कार्याला सुरवात झाल्यापासून अवघ्या दोन महिन्यांच्या मुदतींत या संस्थेला तीन पुस्तकांचें प्रकाशन करण्याची संधि लाभली आहे. पहिलें पुस्तक ‘ बेबी ’ नाटिका याची पहिली दोन हजारांची आवृत्ति बहुतेक संपल्यासारखी असून दोनच महिन्यांत दुसरी आवृत्ति काढण्याचा योग या पुस्तकाला आला हें नमूद करण्यास आनंद वाटतो. दुसरें पुस्तक म्हणजे आमचे सहकारी बंधु श्री. के. रा. पुरोहित यांची ‘ मी कोण ? ’ ही स्वतंत्र सामाजिक कादंबरी होय.

पहिली नाटिका व दुसरी कादंबरी झाल्यानंतर प्रकाशनाकरतां श्री. ‘ **सरोज सुहृद्** ’ यांच्या सारख्या नव्या तडफेच्या कवीचा काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याचा सुयोग ‘ सहकारी ग्रंथकार ’ या संस्थेला लाभला हा तिसरा शुभसूचक योगच होय. ललित वाङ्मयांतील तीन वेगवेगळे कलायुक्त नमुने इतक्या अल्पावधींत वाचकांपुढें मांडण्याची संधि लाभल्याबद्दल कोणत्याहि नव्या प्रकाशक संस्थेला हेवा वाटावा, असे हे योग आहेत ! छपाईचें काम फार घाईनें झाल्यामुळें छपाईत बऱ्याच चुका राहून गेल्या आहेत त्याबद्दल वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

श्री. ‘ **सरोजसुहृद्** ’ यांची कवि या नात्याची भक्तियुक्त तपश्चर्या किती आहे आणि त्यांच्या या काव्यसंग्रहाचें स्वरूप काय आहे, याचा विस्तृत परिचय आमचे बंधु **श्री. भा. रा. धुरंधर** यांनीं आपल्या प्रस्तावनेंत करून दिलाच आहे. श्रीमंत **सयाजीराव महाराज बडोदें** यांच्या ७१ व्या वर्षाचे जुबिली प्रसंगीं प्रकाशित होऊन त्यांना अर्पण करण्यांत आलेलें श्री. **सरोजसुहृद** यांचें हें गीतगुंजन मराठी भाषेच्या रसिकांचे हृदयांना राष्ट्रीय भावनेच्या गुंजारवांत गुंग करून सोडील, अशी आम्हांस उमेद वाटते.

ता. १८।२।३३
सहकारी ग्रंथकार
कचेरी,
नवाकाळ वाडी.

**का. म. ताम्हनकर,**
चिटणीस सहकारी ग्रंथकार.

# प्रस्तावना

मी कांहीं प्रथितयश प्रस्तावनाकार नाहीं. प्रस्तावना हें वाङ्मयाचें स्वतंत्र-दालन होऊन राहिलें आहे. अनेक कसलेल्या लेखकांनीं आपल्या कारागिरीचें लेणें त्यावर चढविलें आहे. आणि माझ्या उमेदवारीस तर आरंभ होत आहे. म्हणून त्या दालनांत मी सकम्प पाऊल टाकीत आहे.

वधूची ज्यावेळीं परीक्षा होते त्यावेळीं तिची सखीहि तिच्या सोबतीला असते. कवितावधूची प्रस्तावना ही सखी आहे. परंतु वधूपरीक्षेबरोबर वधूच्या सखीची परीक्षा होत नसते. येथें न्याय उलटच आहे. प्रस्तावनेचा दर्जा ठरून गेला आहे, म्हणून कवितेबरोबर प्रस्तावनेचीहि परीक्षा होत असते.

पण हें एकपरीनें ठीक झालें. माझ्यावरील जबाबदारी यामुळें बरीच कमी झाली आहे. प्रस्तावनेचें व कवितांचें स्वतंत्र परीक्षण होईल. मी लिहिलेल्या प्रस्तावनेंत जी कांहीं न्यूनता असेल ती कवितासेवनाच्या आड येणार नाहीं.

श्री. वासुदेव त्रिंबक कालेकर किंवा '**सरोजसुहृद्**' या नांवानें काव्य-प्रेमिजनास ज्ञात असलेल्या कवींच्या १०८ कवनांचा हा संग्रह आहे. **गीतगुंजन** या यथार्थ नांवानें तो प्रसिद्ध होत आहे व रसिकांस सादर केला जात आहे.

कवि '**सरोजसुहृद्**' यांच्या काव्यनिर्मितीस '**मृत्यु**' या कवितेपासून आरंभ झाला हा एक चमत्कार खरा, परन्तु तात्त्विक दृष्ट्या तें योग्यच झालें असें म्हटलें पाहिजे. खरा जन्म मृत्यूंत आणि मृत्यूंतून असतो. मृत्यूला पाहणारी दृष्टि, मृत्यूचें स्वरूप निरीक्षण करणारी दृष्टि, अमर काव्य प्रसविण्यांस समर्थ होते. कुरुक्षेत्रावर लोकक्षय करणारी **भगवंताची** कालस्वरूप मूर्ति पाहून **पार्थाची** वाणी रोमाञ्चकारी काव्य गाऊं लागते. ज्याची दृष्टि त्या स्वरूपावर स्थिर होते तो स्वतः "**अमृतत्वाय युज्यते**" म्हणजे अव्यय पद पावतो व इतरांना त्या पदाचा मार्ग दाखवूं शकतो. हा अधिकार **सरोजसुहृद्** यांना प्राप्त झाला आहे असें म्हणणें साहस होईल. परन्तु ज्या कवीला पहिल्या प्रथमच मृत्यूचें स्वरूप न्याहाळावेसें वाटलें व मृत्यूला कवितेंत आळविण्याची इच्छा झाली तो कवि लोकोत्तर काव्य निर्माण करील असा भरंवसा वाटतो. कवि '**सरोज सुहृद्**' तरुण आहेत. आज एक तप झालें त्यांनीं कविता-देवीची सेवा केली

आहे व यापुढेंहि ते अविरत सेवा करीत राहतील. त्यांना तो नाद लागला आहे! त्यांनीं खरीखुरी तपश्चर्या केली आहे. तपश्चर्या आणि भक्ति यांचा संगम झाल्यावर साफल्य दूर राहील काय?

कविता-लेखनास १२ वर्षांपूर्वी त्यांनीं आरंभ केला खरा, परंतु १९२४ पासून त्यांच्या कविता प्रसिद्ध होऊं लागल्या. महाराष्ट्रांतील **मनोरंजन, स्फूर्ति, यशवन्त, चित्रमयजगत्, केसरी** वगैरे २०-२५ नियतकालिकांत त्यांच्या कविता गेलीं आठ वर्षे प्रसिद्ध होत आहेत. त्यांच्या कवितांनीं महाराष्ट्राबाहेरील बृहन्महाराष्ट्रांतहि प्रवास केला आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या कविता-संग्रहाचीं पुस्तकें १९२७ पासून प्रसिद्ध होऊं लागलीं. १९२७ सालीं **मंजरी**, १९२८ त **वैखरी**, १९२९ त **माधुरी** आणि १९३१ त **सुधा** याप्रमाणें आजवर त्यांचे चार छोटे कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. या व्यतिरिक्त त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या कवितांची संख्या ३५० वर आहे. त्यापैकीं १०० प्रसिद्ध आणि ८ अप्रसिद्ध कविता एकत्र करून त्यांचें हें '**गीतगुंजन**' निर्माण झालें आहे.

मासिकांत, साप्ताहिकांत किंवा पुस्तकाच्या द्वारें त्यांच्या कवितेला प्रसिद्धी मिळाली आहे खरी, तथापि ते महाराष्ट्राला गायक कवि म्हणून परिचित आहेत. त्यांच्या आवाजांत माधुर्य आहे आणि शंभर टक्के चांदीच्या रुपयाचा खणखणीतपणा आहे. संमेलनाच्या, समारंभाच्या, किंवा गणेशोत्सवाच्या प्रसंगीं त्यांच्या कविता-गायनानें सभामंडप दणाणून जातो, आणि कण्ठमाधुर्यानें श्रोतृवृंद नादलुब्ध होतो. या कलेंत त्यांना गुरूप्रमाणें पूज्य असलेले आणि प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें स्फूर्ति देणारे नागपूरचे श्री. **आनंदराव टेकाडे** हे आदर्श आहेत. श्री. **आनंदरावांना** कविता-गायनांत अपूर्व यश आलें व त्यामुळेंच कीं काय कविता-गायनाची परंपरा रूढ झाली आहे.

काव्यगायनाची परंपरा भरतखण्डांत प्राचीन आहे, दोन हजार वर्षांपूर्वीची आहे. पूर्वीच्या काळीं काव्यगायन हेंच काव्यप्रकाशन होतें. स्वरचित काव्यें गाऊन प्रकाशित करावीं असा त्यावेळीं प्रघात होता. **वाल्मीकि** तर महाकवि होता. आपल्या अंगीं कवित्व आहे याची जाणीव प्रसंगवशात् सहजस्फूर्त छन्दोमयी वाणीवरून त्याला झाली. त्यानंतर ध्यानाचें आणि तपश्चर्येचे संस्कार त्यावर पडून भगवत्प्रसादाचें फल म्हणून रामायणाची ओघवती रचना झाली.

या महाकवीनेंहि आपल्या काव्याचें प्रकाशन आजच्या काव्यगायकांना मार्गे टाकील अशा अस्सल आजतागाईत पद्धतीनें केलें. आपल्या आश्रमाच्या विद्यापिठांत विद्यार्जन केलेल्या संस्कारसंपन्न आणि बुद्धिमान् शिष्यद्वयांच्या सुरेल आवाजीनें श्री **रामचन्द्राच्या** दरबारांत स्वरचित रामायणाच्या गायनाचा यशस्वी प्रयोग **वाल्मीकीनें** केला हें महशूर आहे काव्यगायनाची ही इतिहासप्रसिद्ध परंपरा संस्कृतकवींनीं चालू ठेविली. परंतु गेल्या पाउणशें वर्षांत ही परंपरा मार्गे पडली.

**" सकालेनेह महता योगो नष्टः । "**

दीर्घ कालान्तरानें काव्य आणि काव्यगायन यांचा योग नष्ट झाला. आज त्याचें पुनरुज्जीवन होत आहे. म्हणून आधुनिक टीकाकारांना तो अपरिचित वाटूं लागला आहे. आपल्या संस्कृतीला आपण किती पराङ्मुख झालों आहोंत याचा हा एक दाखला आहे.

इन्द्रधनुष्यांतून कस्तुरीचा परिमळ दरवळूं लागला तर आपणांस जसें आश्चर्य वाटेल तसें काव्य आणि गायन यांचा संयोग पाहून आज आपणांस आश्चर्य वाटत आहे. इन्द्रधनुष्याचा आणि कस्तुरीच्या सौरभाचा संबंध पूर्वदृष्ट किंवा पूर्वघ्रात नसतो अशी शंका कोणी उपस्थित करतील. त्याला असें उत्तर आहे कीं आधुनिक एकदेशी दृष्टीला सुरुचिर कांतियुक्त कमलांत सौरभ किंवा मकरन्द आढळून आला तरीहि आश्चर्य वाटेल ! काव्य आणि गायन यांचा कमलाचें सौंदर्य आणि सौगन्ध यांच्या इतका निकट संबंध आहे. तो न कळल्यामुळें काव्यगायक कवीवर अलिकडे आक्षेप घेण्यांत येत आहेत. कवि जेव्हां काव्य रचतो तेव्हां तो गुञ्जन करीत असतो आणि रसिक जेव्हां काव्य वाचतो तेव्हां तोहि कवीप्रमाणें गुञ्जन करीत असतो. कवींनीं आणि रसिकांनीं याचा प्रत्यय स्वतः घेऊन पहावा. यांत गूढवाद बिलकूल नाहीं. मानसशास्त्रांत याला ' articulate image ' आणि ' sensory image ' असें म्हणतात. कवि आणि रसिक किंवा रचणारा आणि वाचणारा काव्य रचतांना आणि वाचतांना अक्षरांना अनुसरून ओठाची, जिव्हेची हालचाल करीत असतो किंवा त्या अक्षरांना अनुरूप अशा नादाची प्रतिमा निर्माण करीत असतो. साध्या भाषेंत याला गुञ्जन म्हणतात. हें गुञ्जन प्रत्येक कवि आणि प्रत्येक रसिक यथार्थ किंवा यथाक्षर किंवा यथाभाव करतो असें नाहीं. कवीला

जर आपलें काव्य गातां येत असेल तर तो रसिकाला गुञ्जनांत मदत करून त्याच्या अंतःकरणांत रसग्रहणाचीं द्वारें खुलीं करतो. गुञ्जन यथार्थ झालें नाहीं तर रसग्रहणास आणि रसज्ञतेस अडथळा येतो. म्हणून काव्यगायनाला जितकें उत्तेजन देतां येईल तितकें देणें अवश्य आहे. ज्यांना काव्याचें खरें महत्व कळलें आहे तें काव्यगायनावर केव्हांहि आक्षेप घेणार नाहींत. मानवाच्या अंतःकरणांतील उच्च भावनांची बिनमोल संपदा काव्यशब्दांच्या खजिन्यांत कोंडून ठेविली आहे. त्या खजिन्याचें एक द्वार काव्यगायनाच्या किल्लीनें उघडतां येतें. असें असतां तें बंद करून ठेवण्यांत काय अर्थ आहे ? म्हणून काव्यगायन ही खरोखरीच एक प्रकारची वाङ्मय–सेवा आहे. मराठींत काव्यगायनाचा प्रघात पडल्यापासून जनतेमध्यें रसिकता अधिक वाढली आहे यांत शंका नाहीं. आज काव्य-वाचनाची अभिरुचि अनेक लोकांमध्यें आढळून येतें याचीं कारणें अनेक असतील, परंतु काव्यगायन हें एक प्रमुख कारण आहे यांत शंका नाहीं. कवीला काव्य रचण्याची तशी रसिकाला काव्य-सेवन करण्याची स्फूर्ति होत असते. जे रसिक नसतात तेही काव्य-श्रवणानें नादलुब्ध होऊन काव्यमाधुरी सेवन करण्यास प्रवृत्त होतात, म्हणून काव्य गायकांचा सांप्रदाय वाढावा असें मला वाटतें.

यावर कित्येकांचा असा आक्षेप आहे कीं ज्यांच्या कवितांत काव्य नसतें अशा कवींचा विनाकारण बोलबाला होतो आणि जे जातिवंत कवि असतात ते गोड गळ्याच्या अभावीं मागें पडतात. ही भीति निष्कारण आहे.

काव्यगायनाची आवड जसजशी अधिक वाढेल तसतशी रसिकता वाढून जनतेंत काव्याची अधिक मागणी आढळून येईल. स्वतःचें काव्य गाणाऱ्या कवीव्यतिरिक्त रसिकामध्येंच काव्यगायकांचा एक वर्ग निर्माण होईल आणि न गाणाऱ्या कवींचें काव्यहि मधुर आवाजांत श्रवण करण्याची लोकांना संधी मिळेल. कांहीं कवींना गातां येत नाहीं म्हणून काव्यगायक कवीवर आक्षेप घेणें म्हणजे **कालिदासानें** सुन्दर छपाईबद्दल **टेकाडे** किंवा **यशवंत गिरीश** यांच्यावर आक्षेप घेण्यासारखें आहे. **बाणभट्टाची कादंबरी** चांगल्या कागदावर, चांगल्या टाईपांत व कव्हरवर तीन रंगी चित्रांसह छापलेली नाहीं म्हणून ‘ **सुकलेल्या फुलांची** ’ छपाई चांगली असतां कामा नये असें म्हणणें समंजसपणाचें आहे काय ? काव्यगायनाचा अधिकाधिक प्रचार होण्यांत

सर्व कवींचें, रसिकांचें आणि जनतेचें हित आहे. ज्या कवींचें काव्य कम-अस्सल असेल त्यांच्या काव्याचें गायन सेंटपॉल यांच्या शब्दांत

"Sounding of the brass and
tinkling of the cymbals"

याहून अधिक वठणार नाहीं हें सांगावयास नकोच. असो.

श्री. **सरोजसुहृद्** यांच्या या कवितासंग्रहास **गीतगुंजन** हें नांव यथार्थ आहे. श्री. **आनंदराव टेकाडे** यांच्याकडून कवींना स्फूर्ति मिळाली याचा वर उल्लेख केला आहे. आरंभी आरंभी तर **सरोजसुहृदांनीं आनंदरावांच्या** चाली त्यांची ढब, त्यांची शैली उचलण्याचा प्रयत्न केला. परंतु असें करण्यांत आपलें व्यक्ति-वैशिष्ट्य गमावून बसूं याची त्यांना कल्पना आली. अनुकरण हे वैशिष्ट्य-विनाशक आहे. ती एक प्रकारची आत्महत्या आहे ही गोष्ट त्यांना कळून चुकली आहे. याचा प्रत्यय वाचकांस या संग्रहांत पहावयास मिळतो. आपल्या व्यक्तित्वाला वाणी फुटली पाहिजे म्हणून त्यांची अहर्निश तळमळ चालू आहे असें हा संग्रह वाचतांना दिसून येईल. एखाद्या कवीपासून, ग्रंथापासून किंवा कलादर्शापासून स्फूर्ति मिळणें निराळें आणि त्यांची छाया आपल्या सर्व कृतीला व्यापून रहाणें या गोष्टीं भिन्न आहेत. श्री. **आनंदरावांकडून** अनेक चाली **सरोजसुहृदांनीं** घेतल्या आहेत. पण या संग्रहांत जवळ जवळ १० गीतें अशी आहेत कीं त्यांच्या चालीं स्वतंत्र आहेत. बाकी राहिलेल्या ९८ गीता पैकीं सुमारें ७० गीतांच्या चाली एकदाच आल्या आहेत. त्यामुळें या संग्रहांत श्रुतिमनोहर वैविध्य उत्पन्न झालें आहे. चालीमध्यें साधलेले वैविध्य केवळ गायनासाठींच नसून ते विषयांतहि उतरलें आहे असें आढळून येईल. किंब-हुना विषय वेगवेगळे असल्यामुळें त्यांना अनुरूप अशा चाली घालाव्या लागल्या. **ऐतिहासिक, राष्ट्रीय, तात्विक, शृंगारिक, निसर्गवर्णनात्मक**, इ. विविध विषयांवर या कविता रचल्या आहेत.

माझ्याजवळ कवींनीं हे **गीतगुंजन** जेव्हां वाचण्यास दिलें तेव्हां मी त्यांना सहज विचारलें, "या संग्रहांत आपणा स्वतःस कोणती कविता आवडतें ?" अरसिकास शोभेल असाच माझा प्रश्न होता, कारण आईला आपली सर्व मुलें प्रिय असतात. परंतु अनेक वेळा असें आढळून येतें कीं परिस्थितीमुळें म्हणा किंवा कांहीं विशेष गुणामुळें म्हणा अनेक मुलांत एखाद्या मुलाकडे आईच्या

अंतःकरणाची विशेष ओढ असते. माझा प्रश्न ऐकून **सरोजसुहृद्** क्षणभर स्तब्ध राहिले. मी म्हणालों, " या संग्रहांतील अशी कविता दाखवा कीं, जी रचतांना हृदयांत भावनांचें विशेष थैमान चालू झालें, जी रचल्यावर स्वतःसच आपल्या कृतीचें कौतुक करावेंसें वाटलें आणि ती रचून ठेवून दिल्यावरहि वारंवार गुणगुणत रहावेंसें वाटलें. " पहिल्या-प्रथम वाचतांना जी कविता मला अतिशय आवडली आणि माझ्या प्रश्नांचें **उत्तर** देतांना ज्या कवितेकडे त्यांनीं बोट दाखविलें ती या संग्रहांतील ८२ वी कविता ' **माझी सिन्धु** ! ' ही होय.

ही कविता एखाद्या कल्पित प्रसंगावर किंवा अनुभवावर रचण्यांत आली नसून आत्मचरित्राचा एक भाग आहे. समाजाला खडबडून जागें करण्यासाठीं **केशवसुतानीं** आपलें हृदय पिळवटून त्याची एक **गोफण** तयार केली होती. हृदय दुभंगल्या शिवाय हृदयंगम बोल निर्माण होत नसतात. ' **माझी सिन्धु** ! ' लिहिणाऱ्या कवीचें हृदय विदीर्ण होऊन हृदयाच्या अश्रूंनीं ती लिहिली गेली आहे.

कवीच्या आर्द्र अन्तःकरणालाच आपण स्पर्श करीत आहों असें ती कविता वाचतांना वाटतें.

> **" हंसतांना ती कमल भूषवी**
> **बघतांना ती हरिणि लाजवी**
> **वदतांना ती मनास रमवी "**

अशा **सिन्धूचा** वियोग झाल्यावर कोणाचें अंतःकरण टाहो फोडणार नाहीं ?

> **" पिसें लागुनी मति ही भ्रमली**
> **अरेरे लेखणीहि थकली ! "**

अशी स्थिति झाल्यास नवल नाहीं. सिन्धू इहलोक सोडून कां गेली ? संध्येला ती प्रिय वाटली म्हणून तिनें नेली किं चन्द्राला तिचें वेड लागलें म्हणून तो तिला घेऊन गेला, किं रजनी तिच्या सौंदर्यावर लुब्ध झाली आणि तिला घेऊन गेली ? ती इतकी कांतियुक्त, म्हणून रवीनें तिला दिव्य तेजाची लालूच दाखवून फसवून तर नेलें नाहीं ? छे, छे.

**" कोमल कलिका रुचलि प्रभूला**
**माझी सिंधु राजसबाला**
**भूषविली निज मंगल माला "**

असेंहि असेल. परंतु त्यानें आमचे समाधान कसें होणार ? कारण

**" खेळ विधीचा हा निमिषाचा**
**होम आमुच्या सर्वस्वाचा**
**सदैव हृदयीं कहर स्मृतीचा "**

अशी आमची स्थिति झाली आहे. देवाची काय ही भीषण लीला ! आपणावर असा प्रसंग देवानें आणला म्हणून कवि त्याची विनवणी करतात—

**" देवा देणें कधि ना द्यावें**
**दिधलें तरि तें परत न घ्यावें**
**विनवी तुजला जीवें भावें**
**अरेरे कविता ही सरली ! "**

वाङ्मयांत ही कविता चिरस्थायी झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

कवीनें आपल्यापुढें आदर्श उच्च ठेवला आहे व तो साध्य झाला नाहींतर **" कशास गाणें उगाच गावें ? "** असा कवीचा सवाल आहे.

**" गाणें गावें निजदेशाचें**
**आंदोलवि जें हृदय नराचें**
... ... ... .... ...
**तेंचि खरोखर गाणें गावें**
**मृत कीं ज्यानें जिवंत व्हावें "**

असेंच गाणें सदैव गावून, आसेतू हिमाचल तें घुमवावें, रति रतिमाजीं त्यांचें नाद निघावें व भारतानें अखंड गावें अशी जर महत्वाकांक्षा असेल तर तत्सिध्यर्थ

**" तन–मन–धन या पावन काजा**
**वेंचुनि गाणें सदैव गावें "**

त्याचप्रमाणें त्यासाठीं ज्यांचा एक एक पराक्रम अगणित काव्यें प्रसवूं शकतो त्यांचें उज्ज्वल चरित्र डोळ्यासमोर ठेवणें अवश्य आहे. म्हणून

**' स्वातंत्र्य देविचा दास**
**आठवा मराठा वीर ।**

ज्याला अहर्निश............स्वातंत्र्याचा ध्यास लागला आहे

"त्या क्षुधा कशाची होती
अंगार पेटला चित्तीं
स्वातंत्र्य प्राप्तिची खंती"

परंतु हा मार्ग खडतर आहे. या मार्गाचें स्वरूप मोठें उज्ज्वल आहे, मोहक आहे. कुरुक्षेत्रावर समर जिंकून रुधिर स्नान झालेल्या वीरवर भीमाला पाहून तृप्त झालेल्या पाञ्चालीचें चित्र तानाजीच्या पत्नीला मोठें रोमाञ्चकारी वाटलें असेल, परंतु जेव्हां तिच्यावर दुर्धर प्रसंग ओढावला तेव्हांचा तिचा विलाप पहा,

"रुधिरस्नात वीर होत समर जिंकितां
तृप्त मनीं पांचाली त्यास देखतां
तीच आस मानसांत, फोल या क्षणीं"

तानाजिकडे पहातांना कृतांतानेहि भीतिवश व्हावें,

"धजत ना कृतांत तुम्हा पाहण्या सदा
जन्मभरीं झुंजियली झुंज सर्वथा
साहुं कंवि हा वियोग एकली जनीं"

बालरायाचें लग्न सोडून गड सर करण्यास धावला, गड सर केला, वचन पूर्ण केलें आणि इतकें ऐश्वर्य संपन्न केल्यावर

"टाकुनि मज स्वर्ग रुचे हाय कां मनीं"
"बोला हो विक्रान्ता मीहि एकली
राहु कंवि भूवरतीं वृत्ति लोपली
जगति लता तरुवांचुन कधिं न राहिली
आयु कसें खडतर हें कंठुं निशिदिनी"

याप्रमाणें कवि क्षणांत वीराचा सिंहनाद ऐकवितात, तर क्षणांत विलापाचे करुण बोल श्रवण करावयास लावतात, केव्हां केव्हां ते विधीशीं स्पर्धा करतात व म्हणतात.

"चित्रकार मी प्रतिसृष्टींचा
विधिसम माझा भाव मनाचा
चित्र काढितों मधुर कृतीचें
मनोज्ञ मंगल भाव जयाचें"

अशीवृत्ति जागृति झाली कीं हलक्या हातानें हळुवारपणानें अंतःकरणाच्या सूक्ष्म तारावर कवीची करांगुलि फिरूं लागते व नजरबंदीनें मुग्ध झालेली प्रणयिनी नजरबंदीचें रहस्य विचारते

" नजर बंदी कां अशी असावी ?
कळे न मजला मनिं बाई "
जादु वसतसे नयनामाजीं
मोह उपजवी चित्तामाजीं
खचित मुग्धता येई सहजीं, नजरबंदी...
तृषा क्षुधा मम हरपुनि जातें
मंत्रमुग्ध मी क्षणांत होतें
जडतें केंवि प्रेमळ नातें, नजरबंदी...

रहस्य कळत नाहीं परंतु

" जादुगिरीचें बक्षिस द्यावें
काय मला तें कांहीं न ठावें
कोडें केंवि उलगडवावें, नजरबंदी...

हेंच रहस्य उकलू लागले व त्याचें प्रतिबिंब विश्वांत पडलें म्हणजे

" जनांत माधव
मनांत माधव
माधव दिसतो चोहिकडे ।

... .... ... ... ....

घरिंदारीं ग
अंतरिं माझ्या
विलास त्याचा असे गडे ।

अशी दृष्टि प्राप्त झाली कीं हातून प्रेमाचे प्रमाद होतात

" प्रमाद माझे
किति तरी घडती
भान मला ना मुळीं गडे ।

कारण

" प्रमाद माझे
प्रमोद देती
माधव नामीं सतत गडे "

वरील उतारे वाचून श्री. **सरोजसुहृद** यांच्या **गीतगुंजनाची** रसिकांना साधारण कल्पना करतां येईल. साधारण म्हणण्याचें कारण त्यांनीं अनेक विषयावर कविता निर्मित केली आहे. वेदान्त्यांच्या अध्यात्मापासून तो बाल हृदयाच्या गाण्यापर्यंत, वीरश्री संचारविणाऱ्या कर्मवीरापासून चन्द्रभागेच्या वाळवंटावरील भक्तिवीरापर्यंत, निसर्गाच्या ऐश्वर्यापासून सांप्रतच्या सामाजिक दैन्यावस्थेपर्यंत विस्तृत जीवनप्रांत त्यांच्या कविता विहंगमानें अवलोकन केला आहे. त्यांची '**उषाराणी**' नीलगगनीं पडदा सारून मोहक स्वरूपांत नयनगोचर होते. त्यांचा '**चातक**' आर्त हृदयानें गगनामाजी संचरणाऱ्या व चपलेबरोबर रमणाऱ्या मेघाला आळवितो

**'जलबिंदु ना, एकहि मुखिं मम**
**प्राण व्यथित झाले । मेघा !**
**बोल न निघती घुटमळती हे**
**प्राण जलासाठीं । मेघा !**
**तेही त्यजितो तुझ्या पदांबुजिं**
**हे अंबुदराजा । मेघा !'**

त्यांची कलिका लतामालेला प्रश्न विचारते, आई माणसें सदय खरी. पण मला कळत नाहीं कीं यांना

**"हौस नावरे**
**कंठ चिरण्याची । कंठ चिरण्याची ।**
**ताटातुट करिती हाय**
**मातृप्रेमाची !"**

त्यांची कविता रसिकांना चन्द्रभागेच्या तिरीं नेते आणि

**"मंद मंद ती विठाइ हांसत"**

नयनापुढती हृदयीं वसे असें सुंदर दृश्य दाखविते. याप्रमाणें कधीं ललित, तर कधीं संतापाचे, तर कधीं निराशेचे सूरहि त्यांच्या कवितासंग्रहांत ऐकावयास मिळतात. जातिमत्सर वाढत आहे, फितुरीचें पीक पिकत आहे, अन्नाविण नित्य तडफडाट चालला आहे, आणि जगण्याची शक्ति नाहीं अशा वेळीं त्यांची 'चेतना' गर्जना कुठुनि करणार आणि दिग्मंडळ कसें दुमदुमणार ?

याप्रमाणें हा काव्यसंग्रह आहे. त्यांतील जो भाग वाचून मला आनंद वाटला त्याचें दिग्दर्शन केलें आहे. त्यांच्या काव्यांत गुण आहेत, तसेच दोषहि आहेत, याची मला जाणीव आहे. त्यांनीं भावगीतापलिकडे लिहिण्याचा प्रयत्न केला नाहीं. इतक्या मर्यादित क्षेत्रांत कवि स्वतःस कां कोंडून घेतात ? कवितेचा प्रांत विस्तीर्ण आहे, परंतु भावगीतावरच अनेक कवींनीं विशेष परिश्रम घेतले आहेत. हल्लीं कवींच्या हातीं भावगीत स्वयंकेंद्रित झाल्यामुळ कवितेच्या इतर द्वारांतून येणाऱ्या स्फूर्तीच्या प्रकाशकिरणाला तें पराङ्मुख झालें आहे. इतर अंगाची जोपासना झाली तर अधिक काव्यमय भावगीतें निर्माण होतील असें मला वाटतें. श्री. **सरोजसुहृदा**सारख्या कवींनीं त्याकडे अवश्य लक्ष द्यावें अशी माझी नम्र सूचना आहे. शिवाय आज जगामध्यें नव-जीवनाचे जे प्रवाह वाहत आहेत, त्यांच्यापासून त्यांनीं दूर राहूं नये. प्रस्तुत प्रसंगीं मी याहून अधिक लिहू इच्छीत नाहीं. गुणदोषांचें विवेचन करण्याचें हें स्थळ नाहीं. परीक्षकांनीं तें करावें व ते करतीलही. तें काम त्यांच्यावर सोंपवितों.

प्रस्तावना-सखीचें काम संपलें. कविता वधूला रसिकांपुढें उभे केलें आहे. आतां ती त्यांना पसंत पडो व **सरोजसुहृदांच्या** हातून अधिकाधिक तेजस्वी कृति निर्माण होवो असें अभीष्ट चिंतून मी रजा घेतो.

‘ नवाकाळ ’ कचेरी मुंबई.<br>शनिवार, ता. १८-२-१९३३.

**भालचंद्र रा. धुरंधर.**

# गुंजन

श्रीशारदाकृपेनें ये स्फूर्ति गुंजनानें
भगवान गीत गाई
पार्थास ज्ञान देई
कुरुक्षेत्रिं आत्मज्ञानें ये स्फूर्ति गुंजनानें
ज्ञानेश ओंवि गाई
महाराष्ट्र धर्म राही
प्रतिभा प्रसन्नतेनें ये स्फूर्ति गुंजनानें
मुक्तेश्वरा मनाची
हो मुक्ताहि साची
या एक भावनेनें ये स्फूर्ति गुंजनानें
श्रीदासबोध योगे
शिवराय शूर जागे
माता भवानी जाणे ये स्फूर्ति गुंजनानें
तुकयाची गोड वाणी
गाता अभंग गाणी
भक्ती रसाळतेनें ये स्फूर्ति गुंजनानें
अवतार वामनाचा
श्रीश्लोक वामनाचा
बुध प्रज्ञ मान्यतेनें ये स्फूर्ति गुंजनानें
आर्यास आर्य महती
अजुनीहि पंत देती
कवितेस धन्यतेनें ये स्फूर्ति गुंजनानें
प्रेमी उपासकांचे
शिरिं छत्र साउलीचे
त्या लीन वंदनानें ये स्फूर्ति गुंजनानें

ग्रंथ संग्रहालय
सं. नं.
४८५



आत्मज्योत.

" ही रीत कशी या हरिची "–

Lakshmi Art, Bombay, 8

काव्य १०९८
२७-५-३३
६७२१

# गीत गुंजन

## पहाट

हे प्रभो विभो०—या चालीवर

हो सुमंगला पहाट उदया आली
नवजीवन सृष्टित घाली

साम्राज्य शशीचें सरलें
नव अरुण राज्य हें आलें
घे उषादेवि ही झोले
हांसतां लालि ये गालीं १

पसरतां लालि गगनांत
विकसतां दिशा सदनांत
उमलतां फुलें जगतांत
दरवळे गंध भवंतालीं २

हे विहंग धांवत आले
गुणगानीं मोदें रमले
दर्शनार्थ वेडे झाले
चौफेर गर्दि ही झाली ३

शृंगार रसाच्या नलिनी
मधुपास दूर लोटोनी
'संपली मधुर ही रजनी'
सांगती पहाटहि झाली ४

सुप्रभात मंगल होतां
आनंदें फुलतां डुलतां
एकांतीं चिंतन करितां
हरिभजना संधि आली ५

नैसर्गिक शोभा जातां
निद्रेंतुनि जागृत होतां
जीवनक्रम तो आचरतां
कृत्रिमता उदया आली ६

स्वातंत्र्य सुखाचा स्वाद
नैसर्गिक जो आनंद
मिळविण्यास अंतरिं मोद
चल जाग भारता वेळीं ७

ही पहाट तुजला सांगे
कर्मयोग शक्तीमार्गे
भारता उठुनियां वेगें
दास्यता पळवि या कालीं ८

ही पहाट येते जाते
कळवळुनी तुजला वदते
परवश तुज बघुनी झुरते
हो स्वतंत्र वैभवशाली ९

## २ रुचि-वैचित्र्य : : : भूपती खरे०-या चालीवर

कुणि सांगति मजला कविता लिहि तूं छान
कुणि बोलति रसिका भुलवी हरुनी भान
कुणि वदती मजला शृंगारानें सजवी
कुणि म्हणती आम्हां हास्यरसानें हंसवी
कुणि वीररसाची कविता चेतविण्याला
कुणि करुणरसात्मक हृदय हालवायाला
कुणि कपोल-कल्पित लिहिण्या कथि प्रेमानें
कुणि सांगति लिहि तूं विनोद चतुराईनें
कुणि आग्रह धरिती नाविन्यानें नटवी
कुणि विनविति मजला अलंकार वरि चढवी
कुणि अर्थ असावा गूढ म्हणोनी वदती
कुणि प्रतिभेसाठीं डोकावुनिया बघती
कुणि आशा धरिती विविध कल्पनेसाठीं
कुणि सांगति एकचि शब्द-सौष्ठवासाठीं
कुणि पदलालित्या नाद-ब्रह्म कवितेला
कुणि सांगति सुखवा सदा रसिक-हृदयाला
कुणि कथिती उपमा गोड असावी सारी
कुणि सांगति मजला शब्द-माधुरी-भारी
कुणि तत्त्वज्ञानी वेदांती कवितेला
कुणि वैराग्याची सांग मज लिहिण्याला
कुणि सगुण निर्गुणी परमेशी स्वरुपाची
कुणि निराकार कथि वर्णी लीला त्याची

\+ + +

मी कोण कुणाचा लिहिणारा मी कोण
शारदे, तुजविण कुणिहि न जाणे ज्ञान
तव आदेशानें कविता जन्मा येई
मजकडुनी सेवा गोड करुनियां घेई
हा भिन्न रुचीचा रसिक-छंद पुरवाया
करि समर्थ माते हेंच मागणें पायां

## ३ लेखणी : : : : अंबरगत परि०—या चालीवर

भावबलानें वंदन करितों सान स्वरूपे अये
लेखणी लेखन चतुरे सये
सान चिमुकली प्रभावशाली लेखक-सहचारिणी
तया तूं होसि सखी साजणी
जगतीं नाहीं बहुत पसारा तुझा कधीं भामिनी
परी तूं विविध-कार्य-प्रसविणी
कधिं जन्म देसि तूं ललित नव्या नाटिकां
कधिं चटकदार गे सुरम्य आख्यायिका
कधिं प्रतिभाशाली कविता सुखदायिका
वेदांताचीं तत्त्वें कधिं तीं, अर्थपूर्ण भावना
प्रमेयें पंडित मन चालना १

आदेशानें स्थान देसिं तूं वैभव-शिखरीं कुणां
कर्दमीं दारिद्र्याच्या कुणां
न्यायदान तें कधिं देउनियां कुणास मृत्यूमुखीं
कुणाच्या होसि जिवाची सखी
कुणा वीरता देशप्रेम दे स्वतंत्रता स्थापण्या
कुणाला परवशता लोळण्या
किति विविध खेळ गे असे सखे खेळुनी
निर्विकार अपुली तूं हि पुन्हां राहुनी
चिमुकली परी, हा व्याप असा पसरुनी
शांतपणानें विराजसी गे लेखक-करिं शोभने
कलपना नव्हे सत्य प्रेमले २

वाग्देवीची प्रियतम दासी सुंदर चपले गडे
जगाचें तुझ्याविना गे अडे

परमेशाची अघटित लीला कुणां कधीं दाविसी
प्रेरणे मनोमार्ग लेखिसी
कुणि वर्णावी चातुरि सारी तुझी महन्मंगले
पिसें मन मंत्र मुग्ध जाहलें
नव रसास लुटण्या मोह तुझा गे पडे
प्रतिभेसि रमाया छंद तुझा गे जडे
मी घालित म्हणुनिच प्रेमें कविता-सडे
हृदय-अंगणा सजवित तुजला खेळायातें असे
मजला हेंचि लागलें पिसें ३

## ४ हरवलेली कविता : : कुणावरती वद०—या चालीवर

पिसा झालों । जगीं भ्रमलों । शोधितां तुज भागलों
दिसे कुणीही त्यास पुसोनी, थकुनी मी गेलों । कविते
कुणि पाहियली मधुर उपवनीं, सांगा तरि मजला । दीना
कासारीं कां क्रीडा करितां, देखियली बोला । तिजला
किंवा सांगा वनदेवीच्या, सन्निध ती रमली । कविता
पातालीं वा अमृत म्हणुनी, लोभलि ती राणी । कविता
भूवरि कोठें शोधुं तिला मी, सुजन मला सांगा । दीना
गिरि–गव्हरिं कीं घोर काननीं, एकान्तीं बसली । कविता
तप, करण्याला गेली अथवा, पार्वतिसम बोला । जनहो
काली माता संचरते कां, सगरिं नित सांगा । कविता
फुलाफुलातुनि कळ्याकळ्यांतुनि, लतिकेवर नटली । कविता
ब्रम्हांडीं वा विराटरूपीं, कविता कां सजली । बोला
टाकुनि मजला दुःखित ऐसी, लपली का सांगा । कविता
\+ + + +
स्वप्नीं मजला सांपडली ती, अश्रुजलें न्हाली । प्रेमें
आनंदाचा पार न उरला, भास पुरा विरला । माझा

## ५ खरा देशभक्त : : परवशता पाश०–या चालीवर

तळमळ ती ज्यास लागे देशा सदा सेवण्या
देशध्यास निशिदिनिं त्याला ठेवि धैर्य बाणा
मारि लाथ संसाराला भोगि क्लेश नाना
तीर्थ बंदिशाला त्याला देश देवराणा
घाव घोर पडतां त्याला गमत सुमन माला
किर्ति हांव लेश न त्याला समरिं काळ जाणा
मृत्यु पाश कवटाळाया मोद होइ त्याला
जन्म जन्मि तो देशाला चिंति देह द्यावा
नमन हिंद भू-पद-कमला प्रसवि जी तयांनां

## ६ वेणुनाद : : : : वैशाखमासिं०–या चालीवर

" आनंदकंद श्याम मधुर वेणु वाजवी
हृदयरंग उसळवुनी स्नेह वाढवी
तो स्नेहभाव चंन्द्रबिंब समसमान गे
तो प्रेमभाव सागरिंच्या लहरिंवाणी गे
तो आत्मभाव एकरूप विश्वरूप गे
त्रिविध भाव त्रिविध परी जीव रंजवी— १

तो मंजु गोड ध्वनि हृदयीं ज्योत जागवी
तो ज्ञाननाद भुवनधाम सकल चेतवी
तो प्रेमसूर जीव-जीविं अमृत सिंचवी
त्रिविध दशा त्रिविध अशा भुवन कोंदवी— २

तो एक देव त्रैलोकयीं कृष्ण सांवळा
तो एकमात्र त्रिभुवनांत कृष्ण सांवळा
तो एकरूप त्रैमूर्तित कृष्ण सांवळा
राजस-तम-सत्त्वगुणीं व्रज विभूषवी-- ३

तो भ्रांति उडवि जीव रमवि ज्ञान देउनी
तो शांति स्थापि तेज ओपि वेणु छेडुनी
तो कांति देइ ग्लानि हरुनि गान गाउनी
त्रिविध स्थिति त्रिविध करी वृत्ति गुंगवी— ४

तो भक्तिभाव भक्त-हृदयिं सुदृढ होउनी
तो मुक्तिमार्गदर्शक हो खचित मन्मनीं
तो योगिराज दे समाधि तंद्रि लावुनी
त्रिविध योगि विविध रागिं वेणु वाजवी— ५

तो बाल रमवि बालरूप हरि धरूनिया
तो प्रौढ मंत्रमुग्ध करी मति हरोनियां
तो वृद्ध स्नेहबद्ध सदा हृदयिं असुनियां
त्रिविध दशा मानवास मोह उपजवी— ६

मी भानरहित ध्यान करित मूढ जाहलें
मी श्वासरहित आसरहित पूर्ण गुंगलें
मी प्राणरहित तेजमयी तेज विनटलें
सतत हृदीं कृष्ण सखा हृदय तोषवी— ७

## ७ वासंतिक रात्र ! : : : लावणीच्या चालीवर

रवितापघोर साहुनी श्रान्त होवुनी
मनुज मोहुनी रात्रिच्या समयीं
चांदणें देखतां गुंग होउनी जाई १

ऋतु वसंत अवनीवरी,
देइ माधुरी, जनां घडिभरीं, प्रेमभावें
शशिसुधासिंचनें सृष्टिदेवता नाहे २

तरुराज आम्र बहरुनी
विभवि नादुनी, गंध देउनी, जीवजीवा
भासवी भाट हा वसंत सारा सजला ३



वासंतिक रात्र

Lakshmi Art Bombay 8

ऋतु वसंत प्रिय नर्तिका
सौख्यदायिका, गुणी गायिका, गान गाई
कोकिला सखी ती शशिस वेडही लावी ४

ऋतुराज कंठिचा मणी
जयाला गणी, असा जो गुणी, मोगराराणा
घे सलामि प्रेमें अन्य सुमांची नाना ५

प्राविण्यप्रणय दूत हा,
गांजतो पहा, कौतुकें अहा, निशिथसमयीं
हृदयांत भावना विकार कैसे देई ६

विरहिणी कामिनी मनीं
मर्म शोधुनी, वेड लावुनी, जीव झुरवी
ऋतु वसंत मदनासवें स्नेह तो जुळवी ७

वासंतिक ही यामिनी
कशी मोहिनी, मना घालुनी, वेड लावी
जगिं सदैव प्रचिती ज्याची त्याने पहावी ८

ऋतूराज थोर सरदार !
विभव भांडार, काव्य दरबार, विरचुनीया
तुज अग्रभागिं ही बसावित कविता राया ९

## ८ प्रियाराधनः : : : : : :

"अजुनि कसा अंत बघसि हे मनोहरा
ठाइ ठाइ ऋतु वसंत फुलत साजिरा

भृंग दंग गानिं होत
मधुप मधुर सुरस लुटत
पवन-श्रवण-मनन करित
वदनिं वचन हेंच निघत १

जीव जीविं योग जडत
म्हणुनि स्नेहभाव खुलत
हंसत रमत डुलत झुलत
हृद्य गूढ गीत गात २

गगनिं लालि चढत चढत
विरही जीव तुटत तुटत
चंद्र अमृत देत सतत
रजनि शांत वचन वदत २

अश्रुमणी वेचुनिया
माळ दिव्य गुंफुनिया
वाट बघत रात्र सरत
वायु मंद मंद गात ४

एकतान जीव होत
प्रेमपूर्ण विश्व गमत
भान त्यांत मुळि न उरत
आत्मरूप नाद उठत." ५

## ९ स्वार्थगीत : : : नृपममता०—या चालीवर

परमार्थ शिवें ना कधिही स्वार्थाविण कुणि जगिं नाहीं। सर्वंगळ्या
सकलांना रुचतो स्वार्थ वचन हें मानि तूं सार्थ। स०
शंका लव येउ न देई अनुभवें आपुल्या पाही। स०
घडिभरीं। चिंति अंतरीं। जादु ही खरी।
मुक्त कुणि नाहीं। स्वार्थाविण कुणि जगिं नाहीं। स०

लाडका पुत्र जनकाचा जनकही पूज्य तनयाचा। स०
प्रिय पत्नि सखी जन्माची पति देव मूर्ति प्रेमाची। स०
कौटुंबिक नातीं सारीं स्वार्थानें भरलीं भारी। स०
आपुलें। स्वहित साधलें। कार्य संपलें।
भावना मनिं ही। स्वार्थाविण कुणि जगिं नाहीं। स०

पुण्यात्मा देवासाठीं देवही तयाचे साठीं। स०
शांति मुक्ति भक्तीसाठीं तोडिती जिवाच्या गाठी। स०
परि परस्परांचा स्वार्थ सुटतो न कधींही सार्थ। स०
जगतिंही। कृती ती नाहिं। जिथें ना राहि।
स्वार्थ तो कधिंहि। स्वार्थाविण कुणि जगिं नाहीं। स०

परमात्मा निर्मी सृष्टी केवळ तो स्वार्थासाठीं। स०
आपुल्या रंजनासाठीं नानाविध कृति करि मोठी। स०
जगिं अगणित जन्मा घाली संहार करी परि वाली। स०

त्यांतही । मौज त्या येइ । म्हणुनिया पाहि ।
नित्य वसुधाहि । स्वार्थाविण कुणि जगि नाहीं । स०
स्वार्थाच्या वातावरणीं स्वार्थाची सारि कहाणी । स०
स्वार्थाच्या बाजारांत स्वार्थाचें नाणें रुळत । स०
कां उगाच आशा धरिसी उन्नतिची सांगे मजसी । स०
दचकुनी । स्तब्ध राहुनी । मूढ लेखणी ।
विरामा घेई । स्वार्थाविण कुणि जगिं नाहीं ।

## १० समाधान : : : उद्या बध जाते०–या चालीवर

जगीं मनुजाला ना समाधान जीवाला

धनराशि जरि घे मिळवूनी
रमणीसंगें आयु वेंचुनी
विलासविभवीं दंग होउनी
परी मनुजाला—१

शिशु-स्नेहाचा त्यास उमाळा
बोल बोबडे रिझवि तयाला
त्यासाठींही देह झिजविला
परी मनुजाला—२

नाना मंगल तीर्थें करितो
व्रतवैकल्यें तो आचरितो
शिष्टचारा सदैव भजतो
परी मनुजाला—३

वनराजीचा राजा मानी
विहार करि तो रम्य उपवनीं
घोर तप करी निबिड काननी
परी मनुजाला—४

साधू होण्या भस्म लावुनी
वैराग्याचा पुतळा बनुनी
आत्मज्ञानीं आस निशिदिनीं
परी मनुजाला—५

दैवावरि तो रमत बिचारा
ध्येयावरि त्या मिळत न थारा
निज जाणीव हि हृदयागारा
परी मनुजाला—६

"समाधान निज अंतरि राहे" रागि विरागी योगि सदा हे
अंतर्बाह्यीं शोधुन पाहे
चित्तशांतीला परमात्मस्वरूपीं रमला—७

## ११ 'सावधान' : : : : प्रमाणिका

भारता बघून म्लान
योगिराज पुण्यवान
एक बोल कथि महान
दिव्य मंत्र सावधान १

धैर्यवान शौर्यवान
कीर्तिवान जाण जाण
हिंदु धर्म शीलवान
दिव्य मंत्र सावधान २

देशकार्यि वेंचि प्राण
सोडुनी क्षुधा तहान
कौतुकार्थ गोड गान
दिव्य मंत्र सावधान ३

गर्जवी न सिंह रान
मेषमात्र होत जाण
मूषकास मौज छान
होइ पूर्ण सावधान ४

चढ गडाचि बिकट वाट
कार्य ते पुढे अफाट
राष्ट्रभाट छेडि तान
दिव्य मंत्र सावधान ५

निमिष पळहि मौल्यवान
अंतरांत जाण जाण
शुभाचि शीघ्र सावधान
दिव्य मंत्र सावधान ६

समर्थराज कथि महान
सावधान सावधान
पुण्य मंत्र पंचप्राण
दिव्य मंत्र सावधान ७

भारता धरून ध्यान
शारदाहि गाइ गान
दीन भाट घुमवि तान
दिव्य मंत्र सावधान ८

## १२ चेतना : : : : : लावणी

गर्जना कुठुनि होणार
एकीची वेकी झाली
प्रेमाची होळी झाली
मत्तेची माती झाली
गर्जना०–१

दिग् मंडल दुमदुमणार
कलहाचा पवन वहातां
जातींचा मत्सर नटतां
बंधूवरि बंधू उठतां
गर्जना०–४

क्रोध 20/5/33

फितुरींचे पिकतां पीक
देशभक्ति होते खाक
भिक्षापति जन निःशंक
गर्जना०—२

द्वेषाचा पाझर फुटतां
स्वार्थाचा सागर होतां
देशाचा नेता नसतां
गर्जना०—३

धर्माचा शास्ता नसतां
नास्तिक जन होता होतां
जाणीव कोठली चित्ता
गर्जना०—५

हीन दीन होतां होतां
अन्नाविण नित तडफडतां
जगण्याची शक्ती नसतां
गर्जना०—६

भारता श्वास टाकोनी, दे प्राण तुझे सोडोनी, विधि ठेवी हेच लिहोनी
गर्जना कधिं न होणार मुक्तता कधिं न मिळणार

## १३ उषाराणी : : : मी नव बाला०—या चालीवर

६७५

मधुराणी ही अंबरिं येई
अंबरिं येई । जगता पाही
मोहक स्वरुपें चटका लावी

नील गगनिं ती पडदा सारुनी
वरचे वरती शशिला झेलुनी
लावि तयाला सहजीं पळवुनी
भूषित आपण । राणी होई
( २ )

लावण्याची खाण गमे ही
स्पर्धा करण्या न दुजी कुणिही
विधिला जणुं हे माहित नाहीं
डौले येई । जगता पाही
मधुराणी ही अखिल जगाची

शुचितम देवी जननी वाणी
प्रेमळ नयनीं अश्रु आणी
मांगल्याची पावन राणी
शुचितम करण्या जग-सजवाया
( ४ )

प्रेम सुधेचा देइ ठेवा
जागृत करण्या जनवृंदाला
कर्तव्यातें पाळायाला
भेरी घुमवी । निनाद दुमवी
सत्ता राहे कधि न कुणाची

प्रियकर रमणी रवि हृदयाची
अंबरिं येई । हांसुनी पाही । ५

## १४ विनोद : : : : लावणीच्या चालीवर

" सखे लागतां तयां नोकरी
डौल तुला येणार
कशाला मला ग तूं पुसणार १

दिवाणगिरिच्या वैभवश्रीनें
दारीं गज झुलणार
तुझा ग थाटमाट होणार २

दरबाराचे मानमरातब
दंग तुला करणार
गरीबी कधीं न तूं स्मरणार ३

बागबगीचा फळाफुलांचा
वाडा शोभविणार
तुला ना रिकामपण मिळणार ४

दासदासि वा हुजरे सारे
कर जोडुनि असणार
आज्ञा शिरीं तुझी धरणार ५

मोटारीच्या सुख सोईनें
हौस तुझी पुरणार
कधीं ग पाय न मज दिसणार ६

मेजवानिचा थाट मजेचा
सदैव तो झडणार
तुझा तो नूर गडे खुलणार ७

सरदारिणि त्या मानकरीणी
भेट तुझी घेणार
तदा तूं गर्व बळें फुगणार ८

पाश्चात्यांच्या रीतभातिनें
मोहिनि तुज पडणार
कुणाची दरकार न धरणार ९

चुकुनी मुकुनी आलें जरि मी
' चलो हटो ' वदणार
शोभा चपराशी करणार १०

दैवें तुजला खबर मिळे तरि
कठोर तूं होणार
आठ्यां कपाळास पडणार ११

कशास यावें वद गरिबानें
तुम्हा त्रास होणार
कुत्रा मला न हि पुसणार १२

सखे आठवण ठेवी कमले
संधि न कधि मिळणार
विनोदा पुढें न मी धजणार. " १३

## १५ जगाची रीत : : ये धांवत कृष्णाबाई०-या चालीवर

हीं रीत अशी जगताची
बहु मौजेची, उलटीच सदा नवलाची
धनवाना ऋणको मिळती
नातीं गोतीं, निमिषांत जुळुनियां जाती

रंकाच्या नशिबीं फकिरी,
    लत्ता मारी अमिरीहि नित्य त्या सारी
खलगौरव जगतीं होई
    जादू राही, देखतां नवी नवलाई
सत्याचा वालि न कुणिही
    छळणुक कांहीं त्या जीव नकोसा होई
ढोंग्याचे खूळ कां हीं मजेचे
    प्रभु भक्तीचें, चालते अहर्निश साचें
परि विरक्त साधू योगी
    तापा भोगी, नच सहिष्णुता तो त्यागी
जेत्यासी जित नमवीती
    अशिही शांती, उलटीच तयांची रीती

## १६ पुरुष प्रकृति : : चंद्र आला वरी०—या चालीवर

" छंद लागे मनीं सर्वथा साजणी

कृति सौख्यकारी
स्मृति ती विषारी
छेदी कुठारी
    हाय ही मानिनी १

नभिं रंग नाना
जलिं नाद नाना
मनिं भेद ते ना
    रंग ये रागिणी २

विश्रान्ति स्थानीं
शुक प्रेमराणी
मैना हंसोनी
    गुंग हो गायनीं ३

वनदेवतेची
शोभा मजेची
नव कौतुकाची
    पाहु ही शालिनी ४

शशि शर्वरीचा
अलि कमलिनीचा
प्रभु स्वामिनीचा
    विजय हो मानिनी ५

प्रेमी मनाचें
नव चारुतेचें
मन मान्यतेचें
    चित्र हे साजणी ६

प्रकृति सदाही
पुरुषास मोही
नित योजना ही
विधिची शिराणी

## १७ अवस्थात्रय : : : दीन मुला०—या चालीवर

तीन सुमें बघुनि रमे वृत्ति—सुंदरी जी निरखि अंतरीं
बाल सुमा सुखधामा प्रेम तुजवरी तें शुद्ध जग करी
बालिशता बालपणीं देइ माधुरी जी रिझवि गोजिरी
पूर्ण सुमा निजकामा प्रेम जग करी हा स्वार्थ भूवरी
लोलुपता तरुणपणीं हृदय—अंबुजा जी फुलवि झडकरी
गलित सुमा तव नामा घे न जग कधीं तें त्यागितें दुरी
खडतरता जरठपणीं 'सोडवी हरी' ही याचना करी
तीन अशा मनुज दशा मेदिनी वरी हे नवल घडिभरी
परमात्मा तो आत्मा नांदतो जरी ही त्रिविधता परी
नवल असें, जादु वसे, रसिक अंतरीं ही ईश चातुरी

## १८ गाणें : : : : : : :

कशास गाणें उगाच गावें
विमूढ होउनी जगीं पडावें
मिळेल तितुकें आपण खावें
संतोषानें फकिरहि व्हावें
कशास गाणें उगाच गावें १

गाणें गावें निजदेशाचें
आंदोलवि जे हृदय नरांचें
बोधि तत्त्व जें कर्तव्याचें
तेंचि खरोखर गाणें गाव
मृत कीं ज्यानें जिवंत व्हावें २

असेंच गाणें सदैव गावें
आसेतू हिम तें घुमवावें
रति रतिमाजीं नाद निघावें
जया भारतें अखंड गावें
मुक्तपणानें विमुक्त व्हावें ३

उगाच गाणें कशास गावें
रसनेला कधि ना शिणवावें
आशा जरि तिज तरि छेदावें
त्या जिव्हेनें कधिहि न गावें
अन्य मुक्तिविण गीतहि भावें ४

निशिदिनिं,स्वप्नीं, अशनीं, शयनीं
काननिं, स्वमनीं सन्निध रमणीं
उठतां, बसतां, भजनीं, श्रवणीं
एकचि गाणें तें घुमवावें
प्रसन्नतेनें धांवत यावें ५

निज देशास्तव जन्मचि माझा
सेवाया मम भारत राजा
तन-मन-धन या पावन काजा
वेंचुनि गाणें सदैव गावें
प्रसन्न मानस ज्यानें व्हावें ६

## १९ गौळण : : : मनमोहन०—या चालीवर

"हे दयावंत यदुराया कां आला सांग सांग

गृह धंदा त्यजिला सारा
तुजसाठीं जीवाधारा
मनिं मूर्ति तुझी ठसवोनी
वाढवितें प्रेमभाव १

संचिता दोष देवोनी
विहरतें खुळी रंगोनी
येथल्या वनींच्या गाई
बघ होती आत्मसात् २

वनफुलें मधुर वेंचोनी
गुंफिली माळ जुळवोनी
किति वेळ हाय विखुरीली
ये शंका मानसांत ३

दिनरात मुखानें माझ्या
तव गोड नाम ये सखया
आतूर कान ऐकाया
मुरलीचा मंजुनाद ४

भिरिभिरीं वनीं मी फिरतें
कावरी बावरी होतें
नयनांस ध्यास जडुनीयां
तव होतो मात्र भास ५

भासांत नाद मुरलीचा
ध्यासांत श्वास जीवाचा
खेळांत गुंगतें वेडी
परि कां ना देसि साद ६

गौळणी तुझ्या प्रीतीच्या
तूंहि त्यां प्रेमभावाचा
परि हाय मला वगळोसी
निष्ठुर कां बोल बोल ७

शोधीन तुला गोविंदा
लपुं नको व्यर्थ सुखकंदा
मी शासन तुज करतांना
कोपुं नको मग उगा ८

## २० विषमता : : दुर्बलता कैशी०—या चालीवर

विषमता सारी । अनुभवी । मानव संसारीं—जगभरीं ।
एका रुचते प्रेम असावें दुसऱ्या गमतें कधि न बघावें
युवतिचें वदन हृदयहारी
धनविभवें कुणि बांधि मनोरे । नच परवा, कधिं कुणीं फवारे
उडवितां धूळ फेकि सारी
"देवच नाहीं मी अधिराजा" । धुंदित बोले प्रमत्त काजा
दास धरि मार्ग मुक्तिकारी

चिरडि फुलें कुणि पदिं तुडवोनी। कौतुक करि कुणि करिं घेवोनी
कोमलता निरखी घडिभरीं
सुखांत राही या संसारीं। रमतो कुणि परि नित कान्तारीं
करुनियां दिव्य तपा भारी
दास्य-नरकिं कुणि खितपत पडतो। पारतंत्र्य कुणि छेदित असतो
तुडवुनी संकट भयकारी
मंडुक कूपीं राजा मानी। कुणि आणीतो विश्वच ध्यानीं
बहु गुणी, खेळ मोदकारी
विषम जगाच्या विषमय रीती। कुणि करावी त्यावरि प्रीती
कांहीं ना कळे मोहतिमिरीं
विषमांतुनिया सम जइ येई। भूवरि तेव्हां स्वर्गच होई
अवतार घेई श्रीहरी

## २१ माझा दादा : : : बंधांत सदाप्यारा०-या चालीवर

" घेई काळजी सदा जो दादा जपूनि माझा
शिकवुनी धडे मौजेनें सांगतो गोष्टि प्रेमानें
रागें कधि न भरी मजला
आणितो खाउ तो मजला खेळणीं नविन खेळाला
कपडें छान छान देतो
आपुल्या सवें फिरण्याला नेतसे सदोदित मजला
पापे गोड घेत माझे
दाखवी सिनेमा जेंव्हां समजवी सार तो तेव्हां
होई हालचाल चपला
घरिं कधी उशिर मज होइ धांवुनी शोधण्या येई
प्रेमें धाक दावि मजला

बंड तू फार रे झाला मार कां पाहिजे तुजला
वदतां येइ रडें मजला
उचलुनी घेइ पोटाशी मारुनी मिठी कंठाशी
रडणें थांबत त्या काला
धरिं कधिं दिसे ना दादा सुचत ना मला ही तेव्हां
वाटें खरन्न अहा आला ॥

## २२ या क्षणी : : : दुर्बलता ऐशी०—या चालीवर

निष्क्रियता सोडी हरघडी पाही चौखंडी
भारत दास्यीं नच वसणारा निजतेजाने जगिं तपणारा
तरुण तूं स्वार्थ सकल सोडी
अगणित छल ते जरि होणारे स्वातंत्र्याचें फल देणारे
दिव्य करि स्वर्ग सुखा जोडी
हिंद कधीं ना दास कुणाचा स्वामि मम मी सेवक त्याचा
धरुनि हा भाव मना बोधी
राष्ट्र ध्वजाचें पालन करुनी चाल पुढें तूं झणि धडकोनी
सतत घे देशकार्यीं गोडी
संधि कधीं ना पुनरपि येणें पावन तरि तूं सदैव होणें
स्वदेशा विजयलाभ देई
उद्बोधावें तुज प्रेरावे शपथ तुला तूं जगिं चमकावें
सुयश घे हिंद वाट पाही

## २३ शल्य : : : : चंद्र चवथीचा०—या चालीवर

"देव हें असें । छळत ग सखे
भारि स्वारी ती हुषार दैन्य ये परी
लग्न होवुनी । काळ लोटुनी
आठ वर्षे पुरती परि हौस एक ना
सतत लेखनीं । दंग होवुनी

भान राहि मुळिं न धरीं चुकुनि ग कदा
मैत्रिणी मला । हिणविति सदा
" सोनं नाहिं गुंजभरी अंगिं का तुला "
बहिण थोरली । विभविं नांदली
सान कमळी कमिहि तिला कांहि ग नसे
व्यर्थ वाटतें । मज जिणें सखे
कधिं मिळे न संधि मला बोलण्या गडे
छंद सारखा । लागला असा
करि भ्रमिष्ट हाय मला शल्य बोचते
उलट सांगणें । सहज बोलणें
" उंच उंच वाडे नको झोपडी बरी
गरिब राहणें । मौज त्यामधें
करित वास ना उपाधि शांतता सदा
ऐकतां असें । येतसे रडें
हौस नाहिं नित्य परी हाय टोमणें
हृदयिंची व्यथा । सांगु मी कुणा
तुजविणें ग बोलुं नको तूं परी कुणा "

## २४ गान-माधुरी : : : : बधू हीο—या चालीवर

असा ना कोणी जो गुंग होइ ना गानी

(१)

सप्तसूर ते ऐकुनि अहि ही
निमिषामाजी गुंगुनि जाई
वैरभावना विसरुनि जाई
असा तो प्राणी । जो गुंग होतसेο

(२)

अलि गानानें भानविसरुनि
नाजुक कलिका प्रमुदित होउनि
समाधि माजी जाइ रंगुनि
सगुणगुणखाणी । ती गुंगο

(५)

सरिता मोदें गाति गाना
ऐकुनि सागर विसरे भाना
सहवासास्तव विनवि प्रियांना
उचंबळोनी । होतसे गुंग निज गानीं

(६)

संगीताची मधुर चारुता
जिवाशिवाची एकतानता
प्रभुची ओळख करण्याकरितां
रंगेवाणी । गुंगवी जगत निज गानी

(३)

समीरलहरी त्या झुळझुळतां
नयन मनोहर तृणहि डुलतां
एकतानता एकनादता
पसरे रानीं
ते निसर्ग गुंगत गानीं

(४)

सागरलहरी गाती गाना
लुब्ध होइ तो दिनकर राणा
विलीन होई सागर चरणा
संध्याराणी
बघतसे ही भेट नयनीं

(७)

संगीतावरि विश्व चालतें
संगीतावरि विश्व विनटतें
संगीतावरि विश्व विहरतें
जीवन गानीं
शरण ये विश्व प्रभु चरणीं

(८)

कविरायाचें वेडें गाणें
अवमानुनि त्या कुणिही हंसणें
निंदुनि, वंदुनि कांहीं वदणें
गुंगुनीं गानीं
कवितेच्या रमतो ध्यानीं

## २५ बाहुली : : : अजुनी खुळा०—या चालीवर

"चिमुकलीच आणुनि देई बाहुली ग आई
मागणार तुज जवळी फिरुन कांहिं नाहीं
सांगशील ऐकिन मी तें नीट वागुनीया
हट्ट करिन मी नच कधिंहि खेळणीं मिळाया
चटकदार सांगिन गोष्टी मधुस, खेळुनीया
त्रास कधिं न देइन तुजला बाहुली ग देई १

जमविले किती तरि कपडे छान छान सारे
दागिनेहि लहुपाटिचे हे पाहि पाहि सारे
हळद कुंकु काजळ आई जमविलें मी सारे
राग न तूं धरितां मजला बाहुली ग देई २

विमल, कमल, चिडविति मजला खेळ खेळतांनां
बाहुली ग तुजसी नाहीं मजसि बोलतांनां

येत रडें मजला तेव्हां बोल ऐकतांनां
देइ तरी आणुनि मजला बाहुली ग आई " ३

पदर धरुनि मातेचा तो ओढि सान बाला
कल्पनाहि कुठली तिजला हीन दीन झाला
माय नयनिं क्षणिं त्या परि तो अश्रुपूर आला
'रडसि कां, ग' बोले बाला माय मूढ होई ४

## २६ हिंदु : : पाडवा सम्राटपदाला०–या चालीवर

हिंदु–हिंदू बंधु–बंधू नाममात्रें राहिले
हिंदु–हिंदू जगतिं सारे पंगु शरिरें जाहले
हिंदु–हिंदू भीरु ऐसे पारतंत्र्यीं रंगले
हिंदु–हिंदू घोर कलहे हाय हिंदीं ग्रासले
हिंदु–हिंदू ध्येय नच त्यां भार भुवनीं होउनी
हिंदु–हिंदू बल अभावें मशक–जीवनिं गुंगले
हिंदु–हिंदू धर्मबुडवे पापपंकीं लोपले
हिंदु–हिंदू हिंददेशीं हाय कां हे जन्मले
हिंदु–हिंदू कर्मयोगा बाल तिलकें शिकविलें
हिंदु–हिंदू चेतनेनें स्वामिजीनें जगविले
हिंदु–हिंदू एक करुनी *मुनिवरानें मोहिले
हिंदु–हिंदू शक्तिलागीं भारतीं या घुमविलें
हिंदु–हिंदू भावि कालीं धन्य जगता होउनी
हिंदु–हिंदू मुक्त करुनी हिंदभूमी सेवुनी
हिंदु–हिंदू शब्द–मात्रें वचक अन्यां बसविती
हिंदु–हिंदू रामराज्यीं शांततेनें नांदती

* मसुरकर महाराज

५६०

## २७ व्यक्तिस्वातंत्र्य :

उद्धवा शांतवन०–या चालीवर

( बंधनापलीकडील व्यक्तिस्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांस ! )

पारतंत्र्य जाचक असतां नच कवणा कसली लाज
पारतंत्र्य छेदी कंठा नच कवणा खंती आज
पारतंत्र्य ज्वाला जाळी उतरे न परी तिळ माज
या अशा अवस्थेमाजीं । तरुण ते होउनी राजी ।
शृंगार प्रणय गुणगाजी
ते सदा स्वैर आचरतां स्थापिती व्यक्ति स्वातंत्र्य

स्वातंत्र्य पाहिजे देशा नच विचार करि कुणि त्याचा
दुर्दशा निशिदिनीं दिसतां त्या मोह मात्र नटण्याचा
धर्मावरि घाले पडतां आरंभ शब्दवादाचा
ते तरुण हिंद देशाचे । मूढधी–हाय जन्माचे ।
वल्गना करुनि नित साचे
हाल हाल देखत असतां स्थापिती व्यक्ति स्वातंत्र्य

जगिं स्वैरपणें वागावें सोडुनी न्याय नीतीला
जगिं दांभिकता मिरवावी त्यागुनी देशकार्याला
जगिं अधःपतनिं पडतांना मानिती धन्य जीवाला
'मी पंडित मोठा आहे । मज माझें कळतें पाहे ।
स्वातंत्र्यब्रीद मी वाहे'
या अशा वल्गना करुनी स्थापिती व्यक्ति स्वातंत्र्य

आदर्श धर्म पुत्रांचा अवगणिती बालक सारे
तैसाच धर्म पितरांचा त्यागिती सुजन ते सारे
निजधर्म सोडितो पतिही बेगुमान स्वेच्छाचारें
ही समाज घटना ऐशी । बघवे न कदा नयनांसी ।
नमन त्या असो कालासी
दशदिशीं तान ही घुमते स्थापिती व्यक्ति स्वातंत्र्य

कवणाला नलगे शास्ता
वाचाळ मात्र राहोनी
अज्ञानी कुणि आढळतां

सारेच प्रमुख हे वीर
भासतात वेडे पीर
गुंग त्या करिति मुखवीर

स्वातंत्र्य तयांचें उलटें । करि अधःपतनहि पुरतें ।
परि कळे न मुखवीरातें

हे धन्य धन्य मुखवीर
हा जीवमात्र भगवंतें
जीवाची आशा राहे
हे खरें काय स्वातंत्र्य

स्थापिती व्यक्ति स्वातंत्र्य
स्वातंत्र्यास्तव निर्मियला
स्वातंत्र्यस्वाद घेण्याला
या ऐशा स्वातंत्र्याला

आजवरीं कुणि ना वरिलें । ते मूढ काय जगिं ठरले ।
इतिहास तयांचे झाले

कां उगाच जगतामाजीं
परवशता पळवायाला
ही धोंड आडवी येई
नच तमा तियेची धरतां

जे मूर्तिमंत स्वातंत्र्य
स्वातंत्र्यशिखर गाठाया
मार्गांत अशुभ सुचवाया
शतचूर्ण करा या समया

जनतेस बंध धर्माचे । सेनेस बंध शिस्तीचे ।
तोडण्या बंध दास्याचे

पाहिजेत भारत देशा
परि नको व्यक्ति स्वातंत्र्य

## २८ रत्नाकरा ! : : : धांव पांव०–या चालीवर

कुतुहला देसी सागरा
गगन चुंबिसी शांतपणानें
क्षितिजीं मीलन स्नेहबलानें
अतर्क्य वाटे बघतां नयनें
दुरुनिया, लीला सागरा १

गान सदा गंभीर घुमवुनी
पयः फेन दे झाणिं उधळोनी
सुधेची न कां खंति म्हणोनि
देसि इषारा सागरा २

रमतसे मधुरा ही गिरा
शांत मुनीच्या हृदयागारीं
विचाररत्नें नांदति भारी
सत्यस्वरूपें अगणित सारीं
तव उदरीं सागरा ४

सरिता येती प्रेम कराया
करपाशीं तुज आलिंगाया
स्नेह संगमा केंवि कथूं या
बघुनिया लीला सागरा ५

पवन सखा तुज नित सेवाया
रवि चंद्राचें मुख निरखाया
नितांत दर्पण होसी राया
रुचिरता येई सागरा ३

लवण प्रसादें जगिं मनुजाला
जीवन होसी स्वतंत्रतेला
वानु किती मी उपकाराला
प्रियतमा सुहृदा सागरा ६

संकटशैला घे वेढोनी
उदरीं पचवी गडप करोनी
विमुक्ततेला दे प्रेषोनी
भारतदेशीं, सागरा !

## २९ कारभारीण : : श्रीमंत पतीची०–या चालीवर

" घरधनीण नाहिं आली, अंधारी नयनीं आली

वैतागुनि शेता वरुनी
निरखाया बिजलीवाणी
आलों मी परि ही कहाणी
संतापवि मम जीवाला
हैराण करी या काला १

भाकूर करावी कोणी
वाटावी चटणी कोणी
नसतांना मैना राणी
ही पोपटपंची झाली
गांजते भूक या कालीं २

हंबरते जमना दारीं
गवसे न दुधाची झारी
लागली ठेंच ही भारी
ये रगत हाय पायाला
घरधनीण छळते मजला ३

सइबाई चावट कुठली
भटकण्यास घेउन गेली
काळजी तिला ना कसली
रात्रीची झाली वेळा
पाहुं मी कुठें तरि तिजला ४

करुं नको अशा चाळ्याला
सांगितलं होतं तिजला
धाब्यावर बसवी मजला
बेफाट अशी वागोनी
गांजते मला फिरफिरुनी"५

घरधनीण आली दारीं
संतप्त बघुनिया स्वारी
रडकुंडिस येई भारी
चटकन् परि बिजलीवाणी
झोपडींत गेली राणी ६

## ३० मावळा हेर : : : : लावणीच्या चालीवर

" येतों मैना राणी न ग डोळयास पाणि ग आणी
वेष न्यारा घेइन् बुरजावरी फिरेन्
जीव धोक्यांत मी ग घालीन
अचुक बातमी घेउन् रिपु भेदा काढिन्
डाव नवे नवे टाकीन
खडे त्याला चारिन् माति खाया लाविन्
युक्ति नामी ग मी योजीन
सेनापतीसवें सिंहांचे छावे
घेउन हल्ला ग मी चढवीन
सांजवाते वेळीं वीर शौर्यशाली
बेल भंडार ग उचलोनी
काळावाणी झुंजुन् गडा सर करुन्
भगव्या झेंड्यास फडकावोनी
विजयाचा टिळा लाविन् माझ्या भाला
वायुवेगें घोडा उडवोनी
रायगडीं येइन् शिवराया पाहिन्
मुजरा करिन ग मी प्रेमानं
प्रेमें ओवाळुन फुलमाळ, देण्या
ये ग अंगणांत विजलीवाणी
सवार होतों आतां जातों रातोराता
देशधर्माची हांक ऐकोनी

## ३१ लोकमित्र : : : : : सेनागती

कष्ट साहुनी अनेक
सेवुनी सदैव लोक
धीरवान छातिठोक
वचन वदति रोख सतत १

भारतांत लोकमित्र
त्याग करिती सुतकलत्र
लोकमित्र आत्मयज्ञ
करिति भुवनिं लोक सूज्ञ ३

बाल, पाल, लाल, घोस
मोतिलाल, चंद्र, दास
दिव्यता जवाहिरांत
अचलताहि मोहनांत २

भारता स्वतंत्रतेस
लोकमित्र तळपण्यास
सत्य समय ठाकण्यास
सदनिं करिति मुक्तेस ४

शारदा पदांबुजास सुमन हार वाहण्यास
लोकमित्र वंदनास मोद थोर मानसास ५

## ३२ श्रीसमर्थ : : उद्धवा शांतवन०—या चालीवर

श्रीसमर्थ महती गातां आमोद होइ जीवाला
सूर्याजी पोटीं येई तो योगिराज जन्माला
तो सुपुत्र ऐसा गुंडा जगतांत लावि झेंड्याला
नारायण नामें होता । श्रीरामनाम मनिं स्मरतां ।
निशिदिनी मंत्र हा जपतां ।
जनतेस जनार्दन पटला श्रीरामदूत वा गमला
नवपरिणित-पत्नी-मुख तें पाहण्या न मोद कुणाला
मंगलाष्टकें म्हणतांना परिसि ज्या शब्द नादाला
सावधान परि तो झाला श्रीरामचंद्रसेवेला
पूजुनिया भारतराम । रघुनंदन आत्माराम ।
जनतेंत आणिला राम
आराम कधीं ना घेतां बलशाली भारत केला

हनुमंत मंदिरें सारीं स्थापिलीं नगर नगरात
हनुमंत ब्रह्मचारी जो चिंतण्या नित्य हृदयांत
हनुमंत मूर्ति बलशाली प्रेरविली वीरमनांत

दुष्टांतें संहाराया । साधुजनां जगिं ताराया ।
धर्मातें संस्थापाया

हनुमंत ध्येय दर्शविलें जें करी शत्रुनाशाला
फिरफिरुनि भरतखंडांत धुंडिलें योग्य भूमीला
श्रीसमर्थ स्वामीरायें जगविलें महाराष्ट्राला
पुरुषार्थ शिकविला सारा देशास मुक्त करण्याला

गोब्रह्मवृंद रक्षाया । सतिलाज सदा राखाया ।
धर्मध्वज तो उभवाया

शेराहुनि शेरहि केलें त्या समर्थ शिव सिंहाला
शिवरायें अर्पण केलें निज स्वराज्य श्रीस्वामीला
ही कसोटि त्याची बघतां ते वदले शिवरायाला
हें राज्यविभव मज ऐसें नित तुच्छ योगि पुरुषाला

मज असे एकचि आस । ती पूर्ण करी तूं खास ।
त्यांतची सदा संतोष

फडकवि तूं भगवा झेंडा महाराष्ट्रभूमि सीमेला
जोहार प्रघातीं होता मोडला करुनि नियमाला
रामराम मलिन समयीं लाविली शिस्त सकलांला
ती शिस्त आजही राही जी मान्य महाराष्ट्राला

व्यक्तींत राम ज्या नाहीं । ध्येयांत राम ज्या नाहीं ।
देशांत राम ज्या नाहीं ।

जीवा-विण स्थिति ती देहा पटविलें तत्त्व देशाला
श्रीदासबोध भांडार वाङ्मयांत चमके आज
तो ग्रंथ दिव्य तें काव्य प्रेरणा द्यावया काज

ती प्रतिभा त्या ग्रंथाची शारदेस चढवी साज
ज्ञानामृत सकला देण्या । ज्ञानजलीं मन रमवाया ।
ज्ञानमूर्ति दर्शन घेण्या
चैतन्य देइ तो ग्रंथ संसार तरुनि जाण्याला

पालखी कधीं बसण्याला कधिं कानानिं चालायाला
कांधि अन्न नसे अशनाला कधिं योगच मिष्टान्नाला
कांधि शाल दुशेले असती कधिं लंगोटी वसनाला
वैराग्यशील कडकडित । वैराग्य तेज रखरखित ।
वैराग्य मूर्ति धडधडित ।
धडकली साक्ष देशाला ताराया निजधर्माला

श्रीसमर्थ घ्या अवतारा किति अनाथ जनता झाली
सद्गुरू दयाळा आम्हां नच कुणी आजला वाली
संकटाची सीमा झाली धर्माते ग्लानी आली
राष्ट्रीय शील वृद्धीला । स्वावलंबि बनवायाला ।
मुक्तता जनां द्यायाला
या धावुनि दीन दयाळा भारतास तारायाला

## ३३ सेवाधर्म : : : काशिबाई मूर्ति०—या चालीवर

नोकरी कशी ही बाई
धडपणीं न जेवण होणं
लगबगिन कपडे करणं
आठाची लोकल धरणं
हापिसाची होते घाई
विश्रान्ती तिळभर नाहीं १

विश्रान्ती तिळभर नाहीं
कधिं चुकुनी खाडा करितां
तो दंड पगारीं बसतां
मानहानि साहित असतां
रडकुंडी स्वारी येई
समजावुं कसें मी बाई ५

रात्रीचे नउ होतांनां
कंटाळुनि मी जातांनां
मनिं आस मात्र धरतांनां

गंधर्व कंपनी येतां
मनिं हौस फारही असतां
संधि ना कधिंच ती येतां

वेळेवर येणं नाहीं,
कामाची सगळी घाई २

सुट्टीचं नांवच नाहीं
सणवारीं देखिल कांहीं
उशिरानं जाणं नाहीं
वैतागुनि नयनीं येई
नित झळझळ पाणी बाई

छकुल्यासी बोलायाला
क्षणभर त्या चुंबायाला
मिनिट ना कधीं स्वारीला
यंत्रासम झिजुनी जाणं
त्यावेळीं मधुचं निजणं ४

मन व्याकुल माझं होई
धिक् जगणें वाटे बाई ६

कधि पगार वाढत नाहीं
संसारिं पुरत ना कधिंही
कर्ज तें फिटेना बाई
वाढीस परी नित येई
चिंता मज जाळित राही ७

स्वारीची चर्या बघतां
तिळतिळ मन तुटतां तुटतां
प्रभुपदासि विनवित असतां
सोडीव दयाळा येई
मी सदैव वदतें बाई ८

## ३४ पैसा : : : : : : : :

उठतां बसतां एकच ध्यानीं
पैसा भासे आत्माराम
चोरि चहाडी फंद फितूरी
जन वरुनीयां मिळविति दाम
भिक्षांदेही नाना ढोंगें
साधिति कोणी अपुलें काम
सत्य असत्या अवगणुनीयां
अन्यायाचें होती धाम
दुराचार कुणि अनीतियोगें
पैसा लेखिति आत्माराम
मानुनि पैसा परमेश्वर तो
भजति तयाचें संतत नाम
नातीं गोतीं देति झुगारुनि
पैसा नसतां कापिति मान
वेड्यासम ते भ्रमती कोणी
पैशासाठीं रानोरान
लीला असती बहुत तयाच्या
जगभरि घुमते पैसा-तान
ज्याच्या जवळी राहे पैसा
पंडित त्याला देती मान
लांगुलचालन चाले पुढतीं
लाजविती कुणि सारे श्वान
मधुतर भाषा चाले सारी
पोपट बोले जणुं कीं छान

मायावी तो डौल सदाचा पोकळ विलसे बहु गुणवान
सत्तेचा तो दिमाख दाविति रंकां करिती नित हैराण
या जगताचें देवचि जैसे मदांध होउनि गाती गान
पैसा तारक पैसा मारक पैसा प्रेरक करि बलवान
प्रभाव ऐसा या पैशाचा करि जनतेला नित बेभान
आवरितों हा पट पैशाचा उधळुनि कविता-सुम गुणवान

## ३५ भुवनसुंदरा : : : भक्तजन०—-या चालीवर

" भुवन सुंदरा। वाट सख्या पाहि जरा
गोपासी घेउनिया। धेनूसी वळवुनिया
कां रे इथुनी। जासी निघुनी। श्यामसुंदरा
येथुन तूं जातांना। दिसलासी मम नयनां
कोठें लपसि। सांगे मजसि। हे मनोहरा
यमुनातट प्रिय तुजला। वेणूचा छंद भला
कैसा जडत। नाहीं कळत। स्नेहसुंदरा
कुंजवनीं खेळावें। व्रजवासी भुलवावे
प्रेमें समज। मना उमज। भावसुंदरा
वाट तुझी नित पहावी। तूं माझी ना पहावी
याचें इंगित। करी शंकित। सगुणसुंदरा
नयनांतिल जल सरलें। वदनांतुनी वच न चले
ध्यानीं रमत। जीवा अर्पित। जीवसुंदरा
चुकलें मी वाट गडे। येत असे मजसि रडें
अश्रू मौक्तिक। सारे गुंफित। इंदिरावरा
दिससि जरी पुनरपि तूं। मानसिचें मम किंतु
सारे त्यजुन। पदा नमुन। लीन, सुंदरा "

## ३६ विरस : : : उघाडि नयन रम्य०–या चालीवर

थांब प्रिये थांब दीप मालवूं नको
नयनाचे तीक्ष्ण बाण सोडुं तूं नको

लेखनिं हा जीव गुंग
वर्णनिं हा होइ दंग
कल्पकता उधाळि रंग
विरस करुं नको १

सुंदर तव वदन कमल
नयनाचें तेज तरल
नजरेची जादु विपुल
फसवुं परि नको २

लेखनास लेखणीहि
लवहि पुढें धजत नाही
व्यर्थ इथें उभि न राहि
हांसु तूं नको ३

लेखनिं मज जडत छंद
गवसत मज मधुर मोद
निशिदिनिं हा गोड फंद
भुलवुं मज नको ४

सुखद तुझा भाव असे
विपरित तो किमपि नसे
परि मजला येइ हंसे
कोपुं तूं नको ५

मालवण्या प्राणदीप
ये कृतांत जरि समीप
विनविन मी त्या अपाप
विरस करुं नको ६

हेतु ठेवि तुज जवळीं
स्फूर्ति मनीं संचरली
मम वृत्ति परि रमली
घाव करुं नको ७

## ३७ भातुकली : : : : अंजनगीत

खेळ खेळती भातुकलीचा
यमुना, वारु, तारि, मजेचा
इंदु, सिंधुसी कलह तयांचा
सहज सुरू होई १

वारु म्हणाली "तिघिजाणिं आम्हि
सासू होऊं, तुम्हि सुनबाई
खेळ खेळु गडे इथ लवलाही
खरंच यमूबाई" २

इंदु सिंधु त्या वदती तेव्हां
"सासुच कां त्या जेव्हां तेव्हां
खेळ खेळणें नलगे आम्हा
जातों घरिं बाई" ४

"तुमची अमुची गाडि फू करितो
वेळ गडे हा वाया जातों
कितिग भांडण खेळ नको तो"
बोले यमुबाई ५

"मोट धुण्याची घेउन जावें
दळण कांडण तुम्ही करावें
इंदु सिंधुनीं पाणि भरावें"
कथि ताराबाई ३

सिंधु शांत ती शहाणी पोर
तया म्हणाली "तुम्हिच थोर
चट्टा मट्टा करुं या पार
खेळुनियां बाई" ६

दृष्टिस पडतां खेळ मजेचा। लोभ बघुनियां अधिकाराचा।
हार अर्पितों कवन सुमांचा। बालिकांस प्रेमें ७

## ३८ शेवटचा प्रणाम ! : सबसे राम भजन०—या चालीं

"प्रणाम घ्यावा शेवटचा हा सोडुनि जातों जगता
पंचत्वाचें शरीर टाकुनि अमरपुरा जातों
भावबलानें सादर ताता उभयां वंदीतों
आला दारीं स्वामी त्याला प्रेमें भोजन घाला
संतोषवुनी आशिर्वचना मिळवा मधु बोला
माते ताता कशास रडतां शोकातें त्यागा
पुत्रमोह झणिं आवरुनियां कर्तव्या जागा
खेळ मजेचे दैवाचे ते कोण चुकविणारा
भोग भोगणें ज्याचे त्यानें कुणी न सुटणारा
अशाच समयीं धैर्य धरुनिया राखा हो बाणा
दारीं आला सांब सदाशिव पशुपति हो राणा
सत्व राखण्या सुवर्णसंधी दवडुं नका वायां
मरणें कवणा कधीं न चुकणें नश्वर ही काया
उचल हात चल माय सुखानें छेदी मम कंठा
शुभसूचक त्या कितिक वाजती स्वर्गी एक घंटा
ढाळुं नका ते मुळींच अश्रू तुम्हि माझ्यासाठीं
सारीं द्वारें सताड खुलली सुरगणमुनि दाटी
शोक पुरे हा लवपळ जाई शापाचि देईल
क्रुद्ध अतीथी ताता आतां सत्व किं जाईल
पोटीं येउनि प्रमाद घडला तरि मज हो कथणें

चुकलों मुकलों अवमानीलें क्षमा तरी करणें
नयन कमल हें मिटतो आतां समाधि लावीतों
खड्ग चालवा राखा सत्वा ताता विनवीतों"
पृथ्वी:—कुमार चिलया तदा स्वतनु अर्पुनी रंगला।
महेशपदिं जेंधवा पशुपती तदा तोषला॥
असा गुणि बहू रुचे चिमुकला शिवाला मुदें।
म्हणूनि पितरां पुन्हा परत पुत्ररत्नास दे॥

## ३९ गुलजार तरुण : : : पोवाड्याचे चालीवर.

आजचे तरुण देखुनी
आजचे मर्द पाहुनी
आजचे वीर निरखुनी
निःशंक येति किती मना
विविध कल्पना
वीर गुलजार
हे देशा उद्धरणार १

तें तरुण रक्त गोठलें
नयनांतिल जल लोपलें
निस्तेज वदन जाहलें
ती प्रेतकळा येतसे
ढंगि परि पिसें
लुब्ध फार
हे देशा उद्धरणार २

अस्थींचे हे सापळे
ते वेष घेति वेगळे
अंतरीं पूर्ण वावळे
हे देशभक्तिच्या जना
कथिति वल्गना
शब्दशूर
कीं देशा उद्धरणार ३

शरीराचे हे पिंजरे
बुद्धीचें होत खोबरें
शेदाड शिपाई खरे
जाहले कागदी
खरे दिलदार
धन्य सरदार
हे देशा उद्धरणार ४

तरुणांस विनवणी तरी
व्यायामवल्लि ध्या करीं
बलभीम ध्यान अंतरीं
करुनियां दंड थोपटा
भारतीं नटा
शूर वीर
तुम्हि देशा उद्धरणार ५

राष्ट्राची सारी शक्ती
राष्ट्राची सारी युक्ती
राष्ट्राची मंगल मुक्ती
तुम्हांसि वरी सर्वथा
तुम्हां देखतां
हर्ष फार
तुम्हि हिंद मुक्त करणार ६

## ४० शंकिता : : सखे ग सुरेख संगम०—या चालीवर

“मी सुखात असतां सखे
ते सदैव जपती मला
ते प्रेमप्रभावें मला
ते राणी वदती मला
लेखिती सुमन मंगला १

ते अनेक शालू किती
भरजरी ग अंजिरी किती
दागिने अमोलिक किती
नवनवे ग देती मला २

मज कांहीं कमती नसे
मी म्हणेन वर्तन तसें
जी हुजूर वदणें असे
छे, कसे ग सांगु तुला ३

मी तिरपि नजर रोखतां
ते मधुर मधुर हांसतां
तो विनोद नित चालतां
आमुचा न कथवें मला ४

शिवलि ना शंका असली मला
फिरविति परत भाउला
तो येतां नेण्या मला
ये पुन्हा वदति त्याजला
क्षण दूर न कारिति मला ५

ती कितीक तरि नाटकें
ते तसे सिनेमा सखे
ती सुरम्य नव मासिकें
सुख असे किती ग मला ६

साधनें सुखाची सदा
लोळती जरी मम पदा
परि मनास नित आपदा
गाजते मी वदते तुला ७

ते पहिलें वर्तन नसे
हा जीव झुरत ग असे
मज स्वारी चंचल दिसे
ये शंका भलती मला” ८

## ४१ तिचें पत्र : : बंधांत सदा प्यारा०—या चालीवर

“मी हर्षभरित झालें—नाथा पत्र बघुनि अपुलें
चिमुकला मधू वदतांना
ये हसें मला बघतांना
बाई गोड किती बोले
घेउनि काठि करि घोडा
दुडदुडा धांवतो वेडा
माझें नयन गडे रमले
लेखणी घेउनी लिहितो
लटुपटी पत्र टाकीतो
किति मी कौतुक तें केलें

इकडर्चा प्रतिकृति करुनी
वाचनीं बसे तो रमुनी
माझें भान सकल गेलें

धीट हा फार कीं झाला
धाक त्या कांहिं ना उरला
रागें कितिहि जरी भरलें

पूजनीं बसे मौजेनें
धरुनियां नाक ऐटीनें
वाटे कोण इथें बसले

'येतसे कोणि तरि आई'
बोलुनि फसावितो बाई
सांगुं गूण किती सगळे

चिमुकला सोनुला माझा
आपुल्या घरांतिल राजा
निरखितां दिवस किति गेले

झडकरीं निघोनी यावें
दिवस ना फार लावावे
अपुली वाट पहात बसलें

आपुल्या पदीं मी दासी
करितसें नम्र विनतिसी
आतां पत्र पुरें करितें

## ४२ वनदेवी : : : : जागिये व्रिजराज०——या चालीवर

वनदेवी विभव तुझें हृदयमोदकारी
सुरविलास गमति तुच्छ भावनाविहारी

ठायिं ठायिं ते निकुंज
ऋषिमुनिसम दिसति सज्ज
नित विरागी रुळत साज
ज्ञानदानकारी १

ओढे ते झुळझुळती
गिरिपर्वत टकमकती
वृक्षराज खदखदती
रसविनोदकारी २

वायु मंद जल तडागिं
कमल अलि प्रेमयोगि
जलतंरगवाद्यनादिं
गाति सौख्यकारी ५

हंसत डुलत चंद्रमाहि
करि पुलकित वसुधाही
अति प्रफुल्ल बागशाही
ही शोभा न्यारी ६

आश्रमिं तरु सौगंधुनि
पिकगानें दुमदुमुनी
ऋतु वसंत तो सजुनी
प्रणयबाण टाकी ३

शुक, मैना मोहुनियां
मयुर नाच नाचुनियां
दिग्वधूस रमवुनियां
ललकारिति भारी ४

विविध कळया उमलुनियां
लाजुनियां मुरडुनियां
नयनशरा फेंकुनियां
हंसति मोदकारी ७

शांत दांत विलसुनियां
ज्योत्स्नेसी देखुनियां
क्रीडिस्तव धावुनियां
विहरति गज भारी ८

सम्राज्ञी राज्य तुझें, येथ कुणी कधिं न धजे
घे मुजरे हे माझे, जयशाली देवी ९

## ४३ निर्माल्य : : : अंबरगत०–या चालीवर

जगांत राही अदय कृती ती हाय हाय मानवी
वाटतें असुर सकल लाजवी
दवबिंदूंच्या मौक्तिकभारें शृंगारुनिया तुला
चुंबिता माय धन्य प्रेमला
कुरवाळी जइं माय प्रेमला हिरवुनियां घेतलें
केवढें घोर पाप जाहलें
लतिकेवरच्या नाजुक बाला, हाय खुडियलें तुला
वाटतें तुझा गळा कापिला
तो कुठार माळी हाय घालुनी कुणी
निर्लज्जपणानें परडिंत टाकी झणीं
त्या वेळीं माता विलाप करि साजणी
नच मन द्रवतां त्याचे परि तो करी कृती आसुरी
मारुनी भांवडें सत्वरा

अनेक ऐसीं फुलें भराभर परडित पडतां मला
भासलें घोर काळ पातला
परड्या साऱ्या पूर्ण भरुनियां शिंपि उदक तो वरी
खरोखर काळिज उलटें करी
मंगल असतां प्रभात सारी अमंगला वंदुनी
चालला पापी खलमणि झणीं
तो भीषण जातां उपवनिची सुंदरी
झळझळां नयनिंचे अश्रु सांडि सत्वरीं
तेधवां फांकल्या दिशा सकल अंबरीं
उषा बोलली अरुणा नाथा, 'काय खेळ चालला
जगीं ना वालि कुणीं राहिला'

उपकाराचें दूध पिउनियां फुललेलीं हीं फुलें
गुंफितो माळी गजरे बळें
नानाविध करि हार गुंफुनी गोंडा लावी कुणा
मिळविण्या अपार सहजीं धना
नगरामाजीं जाउनियां तो थाट मांडुनी बसे
कसाई बघतां येई हंसे
तेधवां येति ते नरनारींचे थवे
निवडुनी घेति ते ज्यांना जें जें हवे
परि समाधिमाजीं रमती माझी फुलें
कुणी भूषवी हरिमूर्तीला वाही सांबा कुणी
रमणी-केश कलापीं कुणी

मनुज जिवाच्या मोहमयी त्या लचकति प्रेमें कुणी
देखुनी सुंदर सुमनें गुणी
"प्रेमाचा तो बहर फुलविला धन्य धन्य प्रियकरा"
बोलुनी रिझविति प्रिय अंतरा
"तुजसाठीं मी अनेक सुमनें आणिन प्रेमें घरीं
सदा तूं प्रेमा मजवरि धरी"

स. न. ता. ठा ण.

संवाद असा हा घरोघरीं चालतो
तो कधीं फुलांना कळे न कुणि मानतो
परि रंग ढंग मी असे सकल देखतों
तेव्हां वाटे माझ्या मानसिं मानवता आसुरी
हुरहुर उपजे तैसी पुरी

कुणि वाहोनी निज सुहृदांच्या प्रेतावरती फुलें
मिरवुनी नेति तयांना बळें
कुणि सजवोनी मृत संन्यासी रूप गोड देखिती
तयांना भूमिमाजिं टाकिती
पूर्व जन्मिची जशी भावना तैसें येथें मिळे
मला हें एकच सारे कळे
या मानवतेचा वीट फार येउनी
मी मारि भराऱ्या फुलांसवें खेळुनी
तीं सांगति मजला अदय जगीं जन्मुनी
देह वाहवी जो जो प्राणी परोपकारा यदी
विलिन तो होइ हरीच्या पदीं

शिवालयाच्या मंदिरभागीं अन्य चित्र देखुनी
रमत मी गुंग मती होवुनी
देवावरचीं फुलें काढुनी ठेवि पुजारी तसा
वाहतो दुसरी तोही पिसा
मूर्तीवरचीं फुलें पडत तीं कोमेजुनिया यदा
तयांना येत भाग्यसंपदा
निर्माल्य लेखुनी टाकिति ते नदिजलीं
खळखळां वाहुनी धन्य होति तीं भलीं
सद्गती तयांना मिळे त्वरित ती जलीं
पूर्व जन्मिचें भाग्य जयांचे तत्सम ते होउनी
रमति, ती नसे कल्पना जनीं

## ४४ शर्विलक : : रसनेन राघवाच्या०—या चालीवर

शंका न येइ कांहीं चोरी कशी करावी
येई यदा परीक्षा
विद्यार्थि ठेवि आशा
संधी हळूच पाही
चोरी कशी करावी
बाहेर जाइ माता
खाऊ खुशाल घेतां
भय बालिकेस नाहीं
चोरी कशी करावी
सुमनें सदैव फुलतां
तोडून हातिं घेतां
खंतो न ती कुणाही
चोरी कशी करावी
युवती युवास मोही
नच दृष्टिभेट होई
मृदुभाव येइ हृदयीं
चोरी कशी करावी
अलि पुष्प-गंध सेवी
नच अन्य भाव ठेवी
अधिकार हाच राही
चोरी कशी करावी
गगनांत चंद्र येई
प्रणयी मनास मोही
नच प्रश्न त्यास राही
चोरी कशी करावी
कोणी कथानकाची
कवितेंत कल्पनेची
शंका न येइ कांहीं
चोरी कशी करावी
साहित्य सृष्टिमाजीं
गुणवान वीर गाजी
त्यां भीति लाज नाहीं
चोरी कशी करावी
जेते जितांस लुटती
त्यां बंधनेंहि नसती
जाणीव एक राही
चोरी कशी करावी

## ४५ मुलांफुलांची मौज : आनंदी आनंद०—या चालीवर

मुलें फुलांसम हांसोनी
रिझविति जगता निशीदिनीं
सानंदानें डुलुनीयां
लाविति जगता डुलवाया
स्वच्छंदानें खेळुनियां
लाविती जगता खेळाया
मोहक रूपें फुलुनीयां
लाविती विश्वा फुलवाया
समाधि सौख्या चाखोनी
देती सकलां समजवुनी
फुलासारिखा सौगंध
मुलांत वसतो आनंद

या विश्वाच्या उद्यानीं मुलें फुलें ही दरवळुनी
परिमल देती जगताला उपकारी ही जीवाला
परमेशाच्या स्वरुपाची गोड माधुरी लुटण्याची
मुलें फुलें हीं उपकरणीं धन्य अहा प्रभुची करणी
मुलांफुलांची ही मैत्री अशीच विलसो दिनरात्रीं
ईशा जगतीं तव कोडें पाहुनि चरणीं चित्त जडे

## ४६ वनवासी : : : : : काफी–त्रिताल

" प्रमुदित मी वनवासी, सदये, हेतु तुझ्या सहवासीं
मयुर पिसारा जगत पसारा
दावितसे नयनांसी

कोकिल ताना भवभय नाना
चेतविती हृद्यासी

कोमल सुमनें अदय जनमनें
ठसविति नित पाठासी

मधुकर गानीं रानोरानीं
लुटत अहा प्रणयासी

झुळझुळ गातां कथिते सरिता
शाश्वतता भावासी

इंद्रधनुष्यें विविध भविष्यें
दिसतीं कीं नयनासी

रम्य वनश्री तव विभवश्री
लोभवि मम हृदयासी

वनवासाची जादु मजेची
उकलविते गूढासी

वनवासाचा निरंतरीचा
ध्यास तुझ्या चरणांसी "

## ४७ कर्मवीर : : उद्धवा शांतवन०——या चालीवर

अनभिषिक्त नृप देशाचा कर्मवीर जन्मा आला
कर्मवीर तो हाडाचा जगतांत नाद दुमदुमला
कर्मवीर देशासाठीं आजन्म वाहि देहाला
कर्मयोग शिकवी बाल। सांगावें केवीं मोल।
कर्ममार्ग सांगे खोल।
रिपु वदले या बोलाला 'कर्मवीर जन्मा आला'

कर्मवीर कर्तव्यानें आदर्श जगाला झाला
कर्मवीर खंदा देई सद्बोध कार्य करण्याला
कर्मवीर कथि सोडावा फलमोह महाराष्ट्राला
यश येणें प्रभुचें वरती। परि यत्न मानवा हातीं।
यत्नांची करि तो पूर्ती
यश हातिं न आले परि तो 'कर्मवीर जन्मा आला'

तें भव्य भाल वीराचें तेजस्वि पाणि नयनाचें
शांत धीर मुद्रा त्याची ते गोड बोल रसनेचे
ती कुशाग्र बुद्धी त्याची ते विचार स्वातंत्र्याचे
आठवतां अश्रू येती। खळखळां वाहुनी जाती।
सामोरि रम्य ती मूर्ती
हांसताचि बोले वाटे 'कर्मवीर जन्मा आला'

अंगांत शुभ्र अंगरखा कटिं धवल वस्त्र वीराच्या
शिरिं छानदार पागोटें लेखणी खड्ग करिं त्याच्या
हा साधा पावन वेष मुखिं गोष्टी निजदेशाच्या
कर्मवीर स्मृति ती होई। पहिला तिलक कधिं नाहीं
ना असा मनुज कोणीहि
जो वदे न या बोलाला 'कर्मवीर जन्मा आला'
सर्वस्व वाहिलें देशा छल अमित सोसुनी त्यानें
जिवलगहि आप्त मित्रांचें साहिले विरह धैर्यानें

देशाच्या कार्यासाठीं मारिली लाथ जोरानें
देहाचीं दुःखें सारीं । लीलेनें बाजुस सारी
पडतांना मृत्युद्वारीं

यमधर्म वचन वदला हे 'कर्मवीर जन्मा आला'
जित महाराष्ट्र जोंवरि हा तोंवरी स्मृती वीराची
इतिहास दिव्य पानात चमकते स्मृती वीराची
पाहतां पुण्य नगरिला होतसे स्मृती वीरांची
रायगडीं शिवरायाचा । पंढरीं गजर *पंढरिचा ।
मुंबापुरिं श्रीतिलकांचा

दुमदुमतो सागर भागीं 'कर्मवीर जन्मा आला'
'कर्मवीर जन्मा आला' सागरिंच्या लहरी गाती
'कर्मवीर जन्मा आला' पवनांतुन लहरी येती
'कर्मवीर जन्मा आला' अणुरेणू साक्षी देती
त्या पवित्र स्थानीं जाणें । ते समाधिपूजन करणें
अनुभव हा पुरता घेणें

स्वातंत्र्यप्राप्तिचे साठीं कर्मवीर जन्मा आला

## ४८ वंदन : : : : : : भूपाळी

साहित्याच्या उपवनिं सुमनें दिव्य देति परिमला । देवते
तवपदकमला सेवुनि सारीं प्रसन्न करिती तुला ॥

साहित्याच्या तपोवनांतरिं थोरथोर मुनिवर । देवते
तपोबलानें संतोषविती सदा तुझें अंतर ॥

साहित्याच्या दरबारीं ते अगणित वागीश्वर । देवते
निजवाणीनें करिती स्तवना कितितरि गे सुंदर ॥

साहित्याच्या सृष्टीमाजीं भरारि मारिति कवी । देवते
कोकिल-कूजन शुक-गायन वा वाटे सहजीं भवीं ॥

* विठ्ठलाचा

साहित्याच्या नभांगणीं किति चमकति तारे अये । देवते
साहित्याच्या प्रांगणिं रांगति बाल चिमुकले सये ॥
साहित्याच्या पवित्र मंदिरिं विविध भक्त ठाकुनी । देवते
कर जोडुनियां आळविती तुज प्रेमानें गाउनी ॥
साहित्याच्या चित्रपटावरि कुशल चितारी किती । देवते
चित्रें बहुविध नानारंगें कौशल्यें रेखिती ॥
साहित्याच्या चराचराचें वर्णन करुं मी कसें । देवते
ज्ञानहीन मी पामर देवी दास तुझा गे असें ॥
माय शारदे अष्टांगानें वंदन मी करुनियां । देवते
तुजसि विनवितों बालावरतीं ठेविं सदा गे दया ॥

## ४९ भावगीत : : : : पाहीं सदा मी परि०—या चालीवर

" ही लाली गुलाबी, गालीं
गुलाबि बगिचा मधुप्रणयाचा
सौरभ देइ मधुर सुमांचा
भेदभाव नुरवी अंतरिचा
ही लाली०— १

या जन्मींचा योग म्हणोनी
या हृदयाची राजसराणी
मुग्ध परी कां ऐसी स्वमनीं
ही लाली २

निरखुनि तुझिया उभय कपोला
उषा सुंदरी उधळि गुलाला
भासे मजसी अरुणहि लपला
ही लाली ३

लाज फुलविणारी, मनोमन
कमलदलाचें विकसन होई
भ्रमर विमोहें गुंजत जाई
चित्र असे मज ग्वाही देई
ही लाली ४

अनुरागानें वचन वदावें
व्यर्थ प्रियकरा मनिं शिणवावें
प्रणयिनिला हें पुरतें ठावें
ही लाली ५

राहि उभी तूं अशीच अजुनी
गहिरि नजर ही तव चुकवोनी
डोळे भरुनी घे मी बघुनी
ही लाली ६

लालि गुलाबी नित प्रणयाची
तृप्ति करितसे पूर्ण मनाची
भेट मनोहर जिवाशिवाची
ही लाली गुलाबी ७

## ५० विरहिणी : : तिळतीळ तुटे०—या चालीवर

“हुरहूर मनीं जीव झुरे आस ना उरे
ग्रीष्म ऋतू ताप प्रखर चंद्र ना झरे

वायु देह दाहवितो
विरह तनु करपावितो
तळमळ मनिं उपजवितो
चित्त ना ठरे १

गंध न ये चंदनास
मधु मृदुला सुमवरास
कारंजे देत त्रास
थांबवी पुरे २

वीणेचा मंजुनाद
यौवनिचा गोड माद
विरहिं कुठुनि देइ मोद
भान ना उरे ३

पांडुरता निशिथिं खुले
बघ शशांक गगनिं झुले
भाव सखे त्यास कळे
हांसु ये खरें ४

जरतारी जल रुपेरि
नर्तन करि कासारिं
परि न स्वारि सामोरी
दैव हे फिरे ५

तरु लतिका सजुनिं डुलत
कमल मधुप नयनिं दिसत
असुया ग उदित होत
एकली झुरे ६

सखिमानस मोहावें
मधुवचनें झुलवावें
निष्ठुर नित ते व्हावें
पुरुष कां बरें ? ७

बहुत मनीं तळमळतां
शिणलें मी ‘त्या’ स्मरतां
वद उपाय मज आतां
भेटिचा त्वरें ८

जीव झुरे प्रेमभरें, नयनांचे जलहि सरे
विरहिणिचें गान सरे, हृदय पाझरे”

## ५१ नोकरीचा अर्ज : : : : बंझारा

“ मज काम कसेंही द्यावें
नोकरीस परि ठेवावें

नच जागा वदतां मजला
येउं द्या दया या काला

वशिल्याचें नांवच नाहीं
चिरमिरी न जवळी लवही

मज भिक्षा प्रेमें घाला
किति वेळां मी विनवावें
नोकरीस मज ठेवावें १

मी शिक्षित अनुभवि आहे
दाखले पहा तरि किति हे
लायकि मम दर्शविती हे
वच होकारात्मक द्यावें
नोकरीस मज ठेवावें २

हिंडलों कचेऱ्या साऱ्या
प्रतिकूल दैव या समया
श्रम माझे गेले वायां
नच माझे हाल पहावें
नोकरीस मज ठेवावें ३

नच अन्य साधनें कांहीं
मम गूण मात्र परिसावें
नोकरीस मज ठेवावें ४

शिक्षणास धन वेंचियलें
व्याजही न त्याचें सुटलें
हे हाल भालिं मम आले
बेजार किती म्या व्हावें
नोकरीस मज ठेवावें ५

दिनरात असे उपवासी
वत्सल मम माय घरासी
प्रिय पत्नि मुलेंही तैसी
अन्नदान त्यांस करावें
नोकरीस मज ठेवावें ६

करुं नका निराशा माझी
मी शर्थ करिन नित काजीं
विनती ही एकच माझी
नातरि शून्यांत विरावें
धूलीस मिळुनियां जावें " ७

## ५२ शाप : : : : : लावणीच्या०—चालीवर

हे क्रूर घोर भास्करा
तापली धरा, पहा रे जरा
निरखुनीया
निश्वास टाकते दया
येउ दे राया १

आशेस धरुनियां मनीं
वनीं खेळुनी श्रान्त होवुनी
धरा कासारीं
निजवदनबलानें
वराह उकरिति सारी ७

कासार सदा जळिं भरे
कधींना सरे, तिथें ना उरे
उदक बिंदू
तो शुष्क होउनी तप्त होत
जलसिंधु   २

कमलिनी सुंदरी रम्य
जीव किति वन्य, सदा जे धन्य
प्राणहीना
होउनी कलेवर भस्म होति
शंका ना   ३

पांथस्थ श्रान्त होवुनी
येति धांवुनी, वृक्ष देखुनी
जरी छायेला
परि ताप साहवे मुळीं न त्या
बसण्याला   ४

फर्मान देसि पवनास
बंद होण्यास, धाक त्या खास
भिउनि राहे
जाळतो ताप तव कुणी न
किमपी साहे   ५

मृगजला दुरुनि देखुनी
जाति धांवुनी, वनीं मोहुनी
हरिणहरिणी
ती निराश होती मिळत न
जल त्या स्थानीं   ६

तो विहगवृंद त्रासुनी
तरुवरी बसुनि, नयन ते मिटुनि
क्लान्त होई
हतदैव लाभलें म्हणुनि शुद्धि
ती जाई   ८

पारधी वनीं हिंडुनी
आयुधें त्यजुनि, तुला देखुनी
तडफडोनी
क्षणिं गलित धैर्य हो ' हन्त
हन्त ' वच वदुनी   ९

कोकिला सखी गुलजार
गायनाधार, तान भरदार
घेउनीया
ती व्यथित होतसे कुणि न रसिक
परिसाया   १०

भिल्लिणी विरहिणी ग्रस्त
तापति त्रस्त, तुला ना खंत
मुळिच कैसी
कां दाहविसी तनु प्रीति तयांवर
ठेवी   ११

कामिनी तुला पाहुनी
काळ कंठुनि, तप्त होउनी
शाप देती
' धिक् अशा तापदा घडो
अस्त चिरकालीं '   १२

## ५३ स्वार्थी चंद्र ! : : : : : :

अंबरीं आला, मानाया, रोहिणिबोला

शांतीचा हा पुतळा केवळ
सौंदर्याची प्रतिमा सोज्वल
लावण्याचा स्रोतचि सुधवल
अंबरीं आला १

त्रिभुवन पाही हांसत हांसत
कोणि वदे त्या निंदित निंदित
क्षीण असा हा एकचि भासत
अंबरीं आला २

दयिता आज्ञा झेलित झेलित
कोड मनींचे पुरवित पुरवित
जगतासाठीं सांगत सांगत
अंबरीं आला ३

कोणि न येई कवणासाठीं
जो तो येई अपुल्यासाठीं
परि प्रौढी ही ऐसी मोठी
अंबरीं आला ४

सखि वचनाला पूर्ण कराया
वाही अपुली सदैव काया
प्रणयपिसा हा नित शशिराया
अंबरीं आला ५

मनिं अपुला हा भाव छपुनियां
चंद्र ठेवितो हळुच जपुनियां
कळतां वदतां कुणि या समया
अंबरीं आला ६

जगास कळती प्रणयीलीला
स्वार्थ तयाच्या मानसिं भरला
जनसेवेचें ढोंग कशाला
अंबरीं आला०—

## ५४ नादब्रह्म : : : : : : :

मधुर मीलनें आखिल सृष्टिला प्रसन्नता येई

प्रशांत रजनी तसा चंद्रमा
विशुद्ध सरिता ज्योत्स्ना, रामा
रिझवित जीवा मनविश्रामा
प्रसन्नता—१

रजनीचें मधु गायन चाले
सरिता अपुल्या मंजुळ तालें
कुशल नृत्य ती भासे खेळे
प्रसन्नता—४

सुधास्यंदिनी थबथबलेली
सृष्टिदेवता ती न्हालेली
रम्य शांतता तिथें विनटली
प्रसन्नता—२

लतिकेवरचीं कोमल सुमनें
पवनाला ती करिती नमनें
समीर गाई अपुल्या गानें
प्रसन्नता—३

शुचितम योगी कुणी विरागी
ब्रम्हानंदीं विलीन जोगी
समाधिमय आनंदहि भोगी
प्रसन्नता—५

एकान्ती मन रमतां रमतां
समीप श्रीहरि येतां येतां
मोदभरें तो डुलतां डुलतां
प्रसन्नता—६

नादामाजी हरिनादाला, ज्ञाता झाला गायनलीला
हरिपदिं प्रेमें समरस झाला, प्रसन्नता आली—७

## ५५ चेंडुचा छंद : : : : : :

खेळायाला चांद हवा ताता चेंडू नवानवा

मोहक सुंदर जरतारीं
नील गगनिं हा सोनेरी
हळुहळु उडुनी येत पहा
ताता चेंडू नवा नवा १

खेळ खेळती नभांगणीं
तारा बाला हांसोनी
चेंडु तयांनी उडवावा
भूवरिं ताता मला हवा २

सागरांत हा टकमकतो
लाटांवरती गडबडतो
त्याला झडकरि घेउनियां
ताता मज द्या खेळाया ३

दिधला ना तरि जाउनि मी
निश्चित आणिन निजधामीं
आश्चर्यानें पहा पहा
चेंडू माझा नवा नवा ४

ज्वरपीडित तो बाल पडे, चेंडूचा त्या छंद जडे
आस एक मनिं पुरवाया, जाई त्यागुनि लोका या ५

## ५६ अनुताप : मी तप्त जरी मदन शरें०—या चालीवर

" अनुताप मना होइ गडे माझिया सखे
कठिणवचें तिकडे मी दुखविलें निकें
वदतांना कळत न मज पुढति काय तें
अवचित मम कटु वच ते ऐकुनी ग ते
अपमान शल्य वाटुनियां कोपुनी ग ते
गेले मज सोडुनिया काय करु सखे

सुटलेला शर न कधीं येत फिरुनिया
गेलेला कटु वच हो मधु न फिरुनिया
झाले ते होत न कधिं खचित फिरुनिया
या क्षणिं मज माहित हो काय करुं सखे

कितिदां मज स्वारीनें शिकविलें परी
सवय न मम सुटली ही दुष्ट आसुरी
काय तिनें सवत गणुनि रोखिली सुरी
अंतरिं, मम द्वेषानें वाटते सखे

माझें मन स्फटिकासम असुनियां सखे
रसनेनें घात पुरा मांडिला सखे
दावा कीं साधियला भासते सखे
सांग हाय योजु काय या क्षणिं सखे

मानी रणशूर असा भाव तिकडला
लीन कधिं हो न कुणा परि सदा मला
सुमनासम झेलुनियां ठेविलें मला
प्रेम रहित झालें गे काय करुं सखे

प्रेमपूर्ण माझें मन जाणलें जरी
क्रोधे मन ग्रासुनियां तिकडलें परी
अविचारें लोटियलें हाय मज दुरी
प्रेमदेव शोधु कुठे सांग मज सखे

स्वारीचा दोष न मुळिं कधिंहि तिळभरी
भाग्यवंत गुणवंता सुख न अंतरीं
अनुतापें सांग कशी साहुं शर्वरी
ठेविन शिर चरणिं क्षमा मागुनी सखे "

## ५७ पंढरी : : : : : वीणावाणी

ये विठ्ठल विठ्ठल नाम असे
ती पावन पंढरि गाजतसे

मृदंग चिपळ्या घेती नाना
टाळविणेंची तर गणती ना
भजनी मेळे गाती गाना
विठ्ठल विठ्ठल नाम असे
ती पावन पंढरि गाजतसे १

भीमेवरती स्नानें करुनी
गतजन्माची पापें धुवुनी
गाती मानव पावन होवुनि
विठ्ठल विठ्ठल गान असे
ती पावन पंढरि गाजतसे २

पूर नयनिं ये प्रभुप्रेमाचा
तैसा हृदयीं भक्तिरसाचा
विठ्ठल दर्शन कीं घ्यायाचा
भाव अंतरीं फार असे
ती पावन पंढरि गाजतसे ३

ज्ञानदेव तुकयाही तरले
नामा, मुक्ता, मुक्ति लाभले
नाथजनांचे कोड पुरविले
ती रम्य गोजिरी मूर्ति असे
जी पावन पंढरि गाजतसे ४

महिमा राहे अपार नामीं
एकादशि पर्वणि निष्कामीं
जीवा जाणिव करि परिणामीं
ती रम्य गोजिरी मूर्ति असे
जी पावन पंढरि गाजतसे ५

उभी विटेवरि, कटिं धरि हात
कोटि चंद्र ते वदनीं तळपत
मंद मंद ती विठाइ हांसत
नयनापुढती हृदयिं वसे
मम रसना गाई गान असे ६

कलियुगिं आहे साधन सोपें
दूर कराया सारी पापें
विमुक्त होण्या या भवतापें
विठ्ठल विठ्ठल नाम असे
ती पावन पंढरि गाजतसे ७

## ५८ वृद्धेचें अश्रुमोचन : : आजि अक्रुर०-या चालीवर

( शिवकालीं मोहिमेंत आपला एकुलता नातू कामीं आल्यावर त्याचे शवास अग्नि देण्याचा प्रसंग आला असतां एका म्हातारीचा शोक )

" घे विश्रान्ती मोदभरें तूं आतां तुज नसे कशाची चिंता
तव जन्माचे सार्थक झालें सखया कर्तव्य सारिता राया
तूं झुंजुनिया पडसी रणरंगांत भाग्यवान तूं स्वकुलांत
तव सोनें झालें बाळा । तूं कीर्ति वरुनियां गेला ।
देवास मोहही पडला
तव पाहुनिया दिव्य पराक्रम राया कर्तव्य पूर्ण राखाया

एकेक तुझ्या देहावरचा वार त्वेषास स्फुरवि अनिवार
रिपुकंठातें छेदुनिया शिरकमला वाहिलेस जगदंबेला
एकेक तुझी जखम मला सांगे ही कृति तव ही अघटित बाई
तूं वचक फार बसवीला । थरथरां शत्रु कांपविला ।
विक्रमें प्राण वेंचियला
निजदेशाचें पालन करण्यासाठीं मारुनी लढाई मोठी

अपशकुन तुला झाला होता तेव्हां तूं निघालास रे जेव्हां
मम काळिज रे चरचरलें त्याकालीं जाणीव मला ही झाली
संतोष परी पाहुनि होई मजला देश हा देव तुज झाला
निर्दळिला अरि समरांत । यश येइ तुझे हातांत
परि बघणें ना दैवांत
म्हणुनीच अशी अवचित घटना घडली, जयदेवि गतधवा झाली

गुण आठवुं मी किती तुझे वेल्हाळा माझिया राजसा बाळा
वय असतांना तुझे पांच वर्षांचे तुज वेड विविध खेळांचे
लुटुपटुची मी देतां तुज समशेर कोपलास राया फार
रागानें फेकुन दिधली । हांसले तुला त्यावेळीं
प्रक्षुब्ध दृष्टि तव झाली
तूं बसलासी हट्ट धरुनि घेण्याला समशेर खरिखुरी तुजला

४८४

वय बाराचें सान तुझें असतांना ते दृश्य तुला दिसतांना
कुणि म्लेंच्छ धरी गोमातेची मान होऊन पूर्ण बेभान
तेव्हांच सख्या बाल गडी जमवोनी मारिला खान त्या स्थानीं
दुडदुडा सवंगडी आले। मज वृत्त असें हें कळलें।
मी तेव्हां रागें भरलें
परि बांधियलें सत्य खूणगाठीस रणशूर वीर तूं खास ५

तुज अपमानें कुणि न कधीं बोलावें विनयानें तूं वागावें
कुलदेवीला स्मरुनि शपथ अंबेची घेतलीस शिवसेवेची
मी प्रेमानें आज्ञा तुजला दिधली त्या वेळिं तृप्ति तव झाली
आठवूं किती वेल्हाळा। तव बालपणींच्या लीला।
रुचलें न हाय दैवाला
म्हणुनिच तुला झडकरिं ओढुनि नेलें। शोकांत मजासि लोटियलें ६

उलटाच कसा ऐसा फासा पडला हा प्रसंग विपरित आला
तव हातानें अग्नि मिळावा मजला मुक्तिलाभ मम जीवाला
नच घडतां तें अग्नि तुला द्यायाला फर्मावि काळ हा मजला
पाडसा चिता धडधडली। ही ज्वाला गगनीं भिडली।
शोकानें मति मम भ्रमली
मी ठेवुं कसा प्राण जीर्ण देहांत। तुजवीण शून्य जगतांत" ७

## ५९ निर्झरिणी : : : : लिहूं कविता०—या चालीवर

तुला बघुनि—मनिं भुलोनी
अये भ्रमतों मानिनी

निर्झरिणी तूं झुळझुळ नादें कानन घुमवीसी। सारें
निर्भयता ती शुचितमताही धवल विमल चमके। भासे
स्वर्गंगा वा अवतरसी तूं शशिमौली त्यजुनी। कोपें
पाताळांतुनि प्रगट होउनी आलिस मज भासे। प्रेमें
सकौतुकानें सख्या चांदण्या अंकावरि घेसी। निमिषीं

क्षणात शशिसी कवटाळुनियां पोटासी धरिसी । भासे
भेदभाव ना तुझिया ठायीं समान लेखोसी । जीवा
तुझ्या सन्निधीं अस्थिर मानस स्थिरतम तें होतें । माझें
सृष्टिसुंदरी कौतुक करिते मोदभरें हंसते । भासे
हंसणें चाले तुझें तदा तें मानस विकसवितें । माझें
सदा वाहुं दे प्रवाह तव तो मीहि असा राहें । प्रेमें
प्रशांत समयीं, नितांत ऐशी शांती अनुभवुं दे । मजला

## ६० आई : : : : आनंद कंद०—या चालीवर

जी जन्म देइ जगतीं ती वंद्य थोर आई
पाजोनि प्रेम-पान्हा शिशु वाढवोनि तान्हा
कष्टी सदैव होई ती वंद्य थोर आई
तिळमात्र स्वार्थ नाहीं स्वप्नीं न लोभ कांहीं
जी स्नेह—मूर्ति राही ती वंद्य थोर आई
बालांसवें रमोनी तल्लीन होइ जननी
जग भूषवूनि राही ती वंद्य थोर आई
वात्सल्य माउलीचें जणुं छत्र साउलीचें
आराम पूर्ण देई ती वंद्य थोर आई
" माते समान कांहीं उपकारि अन्य नाहीं "
हा बोल साक्ष देई ती वंद्य थोर आई
शिशु चुंबितां सुधेचा वर्षाव होत साचा
जी स्नेहपूर्ण होई ती वंद्य थोर आई
हे मातृदेवि सुभगे नमितों पदांबुजा गे
रसनेस रंग येई गुणगान गोड गाई

## ६१ तानाजी-पत्नी-विलाप : वद जाशि कुठें या चालीवर

" हे गुणवंता गेला कां मजसि टाकुनी
या घोर अशा वैधव्यामाजि लोटुनी

रणिं वधुनि अरी, भीममनीं हर्ष दाटतां
रुधिरस्नात वीर होत समर जिंकितां
तृप्त मनीं पांचाली त्यास देखतां
तीच आस मानसांत, फोल या क्षणीं १

अमित हनन अरिचमुचें करुनि तोषला
बिकट दुर्ग कोंडाणा तेंवि जिंकिला
फडकवितां जयझेंडा मोद उसळला
शोकाब्धीं कां जातां मजसि लोटुनी २

सप्तविंश गड केले सहज सर यदा
धजत ना कृतांत तुम्हां पाहण्या सदा
जन्मभरीं झुंजियली झुंज सर्वथा
कालासह कां गेला मजसि त्यागुनी ३

सवत सुप्त समशेरी हाय काय हे
दक्ष न तूं सज्ज काय दैव आड ये
जवळिं असुनि सोडियलें प्राणनाथ हे
साहुं केंवि हा वियोग एकली जनीं ४

मम बाल शूर रायाचें लग्न सोडुनी
समर श्रेष्ठ गड लग्ना धन्य धांवुनी
दुर्ग साध्य पूर्ण वचन करुनियां झणीं
टाकुनि मज स्वर्ग रुचे हाय कां मनीं ५

बोला हो विक्रान्ता मीहि एकली
राहु केंवि भूवरतीं वृत्ति लोपली
जगतिं लता तरुवाचुन कधिं न राहिली
आयु कसें खडतर हें कंठुं निशिदिनीं " ६

## ६२ भरारी : : : असा धरि छंद०—या चालीवर

मार भरारी
वातावरणीं स्वैर उडोनी
दिव्यदृष्टिनें जग हेरोनी
सहल आपुली घेइं करोनी
मार भरारी १

पंथ तुझे ते तुजला ठावे
नच तेथें कधिं हेवेदावे
गीत गोड तूं खुशाल गावें
मार भरारी २

निर्विकार प्रभु निर्गुणरूपा
एकान्ताचा मार्गच सोपा
त्यागुनि ऐहिक अनेक तापा
मार भरारी ३

परमार्थाचा पंथ धरोनी
मुक्ति लाभ घे तूं मिळवोनी
प्रभु भजनातें नित गावोनी
मार भरारी०–४

पाखरा कुतुहला प्रेरी
गगनिं विहरुनी देखिसि सारा
मानवतेचा फोल पसारा
दिव्य कोटिंतिल जीवाधारा
मार भरारी ५

तुझिया पंखीं अचाट शक्ति
तुजवरि चाले नच कधि सक्ति
ब्रह्मानंदीं अखंड भक्ति
मार भरारी ६

सृष्टिदेविचा नित्य प्रवासी
भाटासम कधिं गान घुमविसीं
लाभ देइ मज तव सहवासीं
मार भरारी ७

भरारि घेसि गगनमंडलीं
मैत्रि चिरंतन ठेवी अपुली
जगताची तुज परवा कसली
मार भरारी ८

× × ×

तेजोवलयीं अखिल दिशांतरिं परस्परांचे प्रिय सहकारी
आपण दोघें गगनमंदिरीं
मारुं भरारी–भावना मला ही प्रेरी ९

## ६२ स्मशानांतलें गाणें : अर्ध तनू वारुळीं —या चालीवर

स्मशानांतली भेसुर शांती विषण्णता आणुनी
मनाला देइ दृश्य पटवुनी

क्षणभंगुर हें जीवित सारें घेइ घेइ पाहुनी
अखेरी पडसि इथें येउनी

आप्त इष्ट तुज शय्या देती शोकानें पसरुनी
शेवटीं अग्नि देति लावुनी

अंबर तुजला पांघरूण हें नील नील शेवटीं
प्रचिती ठसवि हृदयसंपुटीं

तुज विलास वैभव न मिळे येथें कधीं
नच सुवर्णमंचक सुखदायकही कधीं
ना शेज फुलांची मिळेल तुजला कधीं
वैभव इथलें वैराग्याचें पावन घे पाहुनी
मनाला पटवि आपुल्या क्षणीं

अनेक आले अनेक गेले गणती नाहीं मुळीं
इथें नच कल्पकता ती खुळी

बाल चिमुकलें मुसमुसलेली सौंदर्याची खनी
जरठही पडति इथें येउनी

आयुष्याच्या भरीं तरुण तो विनष्ट होतो अहा
मिसळते मातिस माती पहा

हें समाधिसाठीं स्थान असे एकलें
ती भेद भावना कधीं कुणा नाढळे
सकलास सर्वथा समता शेवटिं मिळे
समतेचें हें एक स्थान बघ डोळे तूं उघडुनी
चित्र हें पाहीं रात्रंदिनीं

धनसुतदारा व्यर्थ पसारा, कोणि न येथें रडे
एकला ज्याचा तोची पडे
जसा येत तो जन्मा प्राणी तैसा जाई पहा
एकला हाय बापुडा अहा
भयाण शांती विकट हांसुनी पवनासह सांगते
सुसमता सखी इथें नांदते
ना स्पर्धा येथें कधीं कुणाची असे
नच वैरभावही कधीं कुणाचा वसे
षड्रिपूंस थारा तसा न स्वप्नीं दिसे
शशिमौलीच्या प्रियस्थानिं या भीषणता गाउनी
साम्यता पटवि तुला या क्षणीं

## ६४ करुण दृश्य : वीर अभिमन्यु० – या चालीवर

" दयाळा देवा । देवा ही येई । कशीही दीन दशा पाही ।
जाहला संप । संपचि गिरणीचा । प्राण परि जात असे अमुचा ।
सोडुनी शेती । शेती सोन्याची । घेतली माति करुनि अमुची ।
त्यागुनी देश । देश सुखासाठीं । धांवलों पोटाचें पाठीं ।
सोनेरी बेडी । बेडी ही खोटी । चाकरी प्राण घेइ मोठी ।
बोळाचा भात । भात जेवुनियां । कुणाची तृप्ति होत राया ।
कणहि न अन्नाचा । अन्नाचा बाई । उपाशी चिमुकलाहि राही ।
सांज–समईला । समईला नाहीं । तेल मग कुठुनि दिवा राही ।
त्यांत व्यसनाची । व्यसनाची तिकडे । चटक कशि कोणापायिं जडे
कामहि ना कांहीं । कांहीं एक बाई । बाटलीबाइ सुटत नाहीं ।
दुखणें हि येई । येइ जिवावरचें । कोठलें औषध कवडीचें ।
पदरीं मज घेई । घेइ देवराया । ठेवि परि बालावरि माया ।
माझियामागें । मागें कुणि नाहीं । जपाया स्वारीसी बाई ।

\+ — + — +

दिग्विजयी येई । येइ पती देव । दारुची बहुत जया हांव ।
भान ना राही । राहि दारु पायीं । तडाखा काठीचा देई ।
निघाली वाणी । वाणी शेवटची । स्थलीं त्या पावन देवीची ।
" दयाळा देवा । देवा नच व्हावी । दुर्दशा कुणाचीाहे भावी "   ॥

## ६५ प्रेमग्रहण   :   :   :   धांव पाव०—या चालीवर

रमति या तारा अंबरीं,   रिझवितां राणी शर्वरी

खेळ खेळती झिम्मा फुगडी
बागडतांना चाखति गोडी
शशांक रजनी पाहुनि जोडी
खुणाविती प्रेमें अंतरीं   १

शशांक लोभी लोभी रजनी
विस्मित करिती प्रेममीलनीं
कधीं न त्यागी कुणास कोणी
गाणें गाती सुंदरी   २

प्रेमसुधेचा सुमधुर ठेवा
बघतां धाटे हेवादावा
प्रतिदिनिं परि तो जगीं असावा
गिरक्या घेती अंबरीं   ३

अभिलाषेनें भ्रष्ट होवुनी
अधोगतीसी जिव मिळोनी
जाणें ना तो प्रेम समजुनी
शिकाविती तारा मंदिरीं   ४

विवेक धरुनी प्रेम करावें
नातरि शशिसम लांछन यावें
सदैव जागृत मन ठेवावें
बोधिते रमतां सुंदरी   ५

शुभ्र विमल हें गोड चांदणें
आत्मस्वरूपा त्यांत पाहणें
परिणामीं मग जें जें होणें
कळत तें त्यांना गायनीं ६

वदती ऐसें एकमेकिंसी
भाव बलानें त्या समयांसी
यामिनि कोपें सखिवृंदासी
ऐकुनि भाषा सत्वरीं   ७

सम्मेलन हें नभीं चालतां
प्रमुखपदावरि शशांक असतां
संतोषविण्या न परी धजतां
शिथिल तो राही अंबरीं ८

इतुक्यामाजीं राहु येउनी
दुर्दैवी ही कविताराणी
घेइ तयाला पूर्ण ग्रासुनी
ढाळित अश्रू मानिनी   ९

## ६६ उत्कंठिता : : डोळे हे जुलमी०—या चालीवर

" वाट किती पाहुं अशी          येणें नाहिं अजुनि घरा
विजयी कां स्वारी नसे          चिंतातुर मनहि जरा
दुसऱ्या क्षणिं भासे परी          अपयश ना आर्यवरा
सेना ही पाहुनियां
आतुर मन होवुनियां
स्वारीसी निरखाया
आशेनें बघत परी          येणें नाहिं अजुनि घरा

विजयि वीर येतांना          युवति मुदित होति किती
पंचारति करुनीयां          प्रेमभरें रमति अती
समरवृत्त पुसुनीयां          गुजगोष्टी वदति किती
सीमा नच आनंदा
परि माझ्या सुखकंदा
प्रेमाच्या मकरंदा
सवाया तळमळतें          येणें नाहिं अजुनि घरा

सुममाला सुकुनीयां          लावि मला हाय पिसें
भाग्य तिचें लोपुनियां          जाइ मला दिसत असें
स्वारीसी सजवाया          योग्य न ही मजसि दिसे
शिणले मम नयन अतां
अश्रुसरी ओझरती
साहुं कशी मी राती
कंठुं तरी काळ कसा          येणें नाहिं अजुनि घरा "

## ६७ सिंहाचा छावा : तूं टाक चिरुन ही मान०—या चालीवर

[ मराठेशाहींतील रणधुरंधर सेनापति मोहिमेवर निघाला असतां त्याच्या एकुलत्या मुलाचा हट्ट. ]

" मोहिमेवरीं ताता मला न्यावें
मम शौर्य कसें तें रणांगणावरि
आपण निरखावें

फेंकुनियां घोडा वेगें । मी येइन अपुल्यासंगें ।
मम चित्त रणांगणिं रंगे । तरि न्यावें ताता मनोरथा मम
आपण पुरवावें

कसल्याही घाटावरुनी । जाईन सहज मी चढुनी ।
पवनासम रणिं संचरुनी । आणीन बातम्या रिपुगोटांतुन
हुकूम मज द्यावे

रणनिपुण वीर तो लढला । कुरुक्षेत्रिं जसा तो तपला ।
अभिमन्यु बाल रणिं पडला । तैसीच करिन मी कृती मला परि
समरीं झणिं न्यावें

परतंत्र भूमि ही बघतां । हृदयास जाळते चिंता ।
कर्तव्यदक्ष मी असतां । मज आपुल्यासंगें समरीं न्याया
कां न सिद्ध व्हावें

बहु बलाढ्य जरि रिपुवीर । येतील चालुनी शूर ।
मी कधीं न डगमगणार । निमिषांत तयांना करीन जर्जर
ताता मज न्यावें

ही अशी दानवी सत्ता । उलथण्या सिद्ध मी असतां ।
जिवलग मी जरि एकुलता । रणिं येतां कामीं पितर ढाळितिल
अश्रु प्रेमभावें

भिंगरीवाणि त्या खाना । फिरवुनिया घेइन प्राणा ।
राखीन मराठी बाणा । चिमुकलि ही माझी कट्यार सांगे
रिपुसी छेदावें

खणखणाट तो शस्त्रांचा । दणदणाटही तोफांचा ।
सणसणाट तोहि शरांचा । मज रुचतो प्रियतम ताता मजला
समरीं झणिं न्यावें
वडिलांचा पथ अनुसरणें । हा पुत्रधर्म जागिं असणें ।
तरि कां न मीहि पुरवीणें । तो कथा मला तुम्हि ताता सत्वरिं
अपुल्यासह न्यावें
येईन परत मी आई । तूं धीर असूं गे देई ।
वंदन हे मम तव पायीं । मज समरीं जाण्या प्रेमानें तूं
आशीर्वच द्यावें”

\+ + +

या स्फूर्तियुक्त वचनांनीं । ती पितरेंही गहिंवरुनी ।
साभिमान त्या निरखोनी । आशीर्वचनें देउनि त्याला
कुरवाळिति भावें

## स्वारी आली हं ! : काशि बाई मूर्ति मल्हारी०–या चालीवर

“ बघ स्वारी दारीं आली जाउं दे मला या वेळीं
वरुनियां जयश्री येणें विजयी ती मूर्ती बघतां
रक्तानें भिजुनी जाणें मम चित्त हरपुनी जातां
आनंदी स्वारी असणें हसुं नकोस विनती आतां
पंचारति करिं घेवोनी बघ स्वारी दारीं आली
जातें ये तूं मागोनी–१ जाउं दे मला या वेळीं– ४
चौफेर वारु तो उडतो स्वारीसी विजयी बघणें
पवनानें मंदिल उडतो मम आशा पुरती होणें
धूळीचा ढग हा येतो क्षण नच तो आतां जाणें
बघ स्वारी दारीं आली ही विजयी स्वारी आली
जाउं दे मला या वेळीं–२ जाउं दे मला या वेळीं– ५

तळपति प्रखर ते भाले
दळभार कसा बघ हाले
स्वानंदें स्वारी डोले
बघ स्वारी दारीं आली
जाउं दे मला यावेळीं-३

स्वारीच्या आनंदांत
स्वारीच्या प्रेमसुखांत
एकरूप आत्मा होत
मी वेडी झालें बाई
दाराशीं स्वारी येई "- ६

## प्रश्न ! : : : : : : : : :

लतिकेवर कलिका फुले, मुदें जी डुले
गंध दरवळे, पवन लहरीनें, पवन लहरीनें
आईस पुसे ती प्रश्न मनोभावानें १

" सांग ना मनुज हे हिरे
सदय वा खरे, हौस नावरे
कंठ चिरण्याचि । कंठ चिरण्याची
ताटातुट करिती हाय
मातृप्रेमाची २

तोडुनी नेति जे बळें
हाय ते खुळे, हेतु ना कळे
फंद मोहाचा । फंद मोहाचा
सुमनास भोग तो
पुढें बंदिवासाचा ३

ठेविती युवतिच्या करीं
शिरीं जी धरी, केश सावरी
रूप सजवाया । रूप सजवाया
यापरी भोग ते भालीं
येति ग वाया ४

सौगंध संपतां पार
फेंकिती दूर, कधीं दरकार
तयांना नाहिं । तयांना नाहीं
यापरी अवस्था सदा
होत ती जाई ५

त्याविणें काननीं जरी
जन्म महिवरीं, सौख्य अंतरीं
मातृप्रेमाचें । मातृप्रेमाचें
तव अंकावरतीं खेळ
गोड मौजेचे ६

मानवा बघुनियां गडे
पडत सांकडें, येतसे रडें
बोल तूं आइ । बोल तूं आई
हें पाप कोठलें म्हणुनि
घात हा होई " ७

## ७० चातक : : : लिहूं कविता०—या चालीवर

"मनीं आशा, कशि निराशा, उगा करिसी बोल रे
पळपळ मोजुनि घडि घालवितो
कॅवि कथुं तुजला । मेघा !
गगनामाजीं संचरसी परि
भूवरि ना येसी । मेघा !
इकडे तिकडे फिरफिरुनीयां
आशा दावीसी । मेघा !
कडाडुनीयां नभिं गडगडुनी
चपला चमकविसी । मेघा !
घन गर्जवुनि येतो आतां
ललकारी करिसी । मेघा !
नाहिं परि रे तव आगमना
कसलिही आशा । मेघा !
जलबिंदू ना, एकहि मुखिं मम
प्राण व्यथित झाले । मेघा !
शक्ति न राहे तुज आळविण्या
नयनीं जल वाहे । मेघा !
फडफडती मम पंख पहा हे
त्राण नसे उडण्या । मेघा !
ग्लानी येते धांव सख्या तरि
करुणा येऊं दे । मेघा !
बोल न निघती घुटमळती हे
प्राण जलासाठीं । मेघा !
तेही त्यजितों तुझ्या पदांबुजिं
हे अंबुदराजा । मेघा "!

## ७१ चतुर्थीच्या चंद्रास : पोवाड्याचे चालीवर

सामोरि बळें कां येसी
कां नेत्रबाण फेंकिसी
कां रमणीवाणी हंससी
चल येइ सोडुनी सदन ।
उघड तव वदन ।
दाव पाणी । तस्कराही
हें लांछन चंद्रा पूर्ण जाण तुज
चतुर्थीच देई १

शीतलता देशी भुवना
परि कोणि बघेना वदना
जरि बघे तरी करि रुदना
पाहतां तुला अंबरीं ।
भीति अंतरीं ।
रमणरमणी अवनिवरती
हें लांछन चंद्रा पूर्ण जाण तुज
चतुर्थीच देई २

जरि कामीजन देखिती
पाहुनी धन्य मानिती
आस्वाद प्रणय चाखिती
दुर्भाग्य आज परि तुझें ।
कोणि ना धजे ।
पाहण्याला । केधवांहि
हे लांछन चंद्रा पूर्ण जाण तुज
चतुर्थीच देई ३

भगवान कृष्ण सारथी
प्रत्यक्ष वीर महारथी
देखुनि तुला मनिं कथी
पाहिला चंद्र तेधवां ।
म्हणुनियां असा ।
आळ आला चोरिचाहि
हे लांछन चंद्रा पूर्ण जाण तुज
चतुर्थीच देई ४

आपदा भोगिल्या जंई
श्रीकृष्ण प्रभुनें तंइ
मग पाड मानवा ठायीं
छल दुःख क्लेश साहण्या
भोग भोगण्या ।
मुळिंच नाहीं भुवनिं पाही
हें लांछन चंद्रा पूर्ण जाण तुज
चतुर्थीच देई ५

दिनिं उत्सव गणरायाचा
आनंद मनीं होण्याचा
परि खेद योग दैवाचा
आनंद खेद हा जाण
विरोधाभास ।
भुवनिं कीर्ती । नाटकी ही
हे लांछन चंद्रा पूर्ण जाण तुज
चतुर्थीच देई ६

तुज बघुनि काव्य रचियलें ते जन्मजात कवि शिणले
परि आज कसे विसरले
हें चंद्रकाव्य चवार्थिचें सख्या आजचें
नवल गमतें मानसाहि
हें लांछन चंद्रा पूर्ण जाण तुज चतुर्थीच देई

## ७२ नवल : : : मज गमे ऐसा०–या चालीवर

नवल मजसी वाटतें प्रभुकृतीचें

पर्वतश्रेणी गगन चुंबिती
तरुलतिकाही सुखें डोलती
हरित तृणामधिं मोति चमकती
नवल मजसी०–१

किलकिल करिती विहंग सारे
मोर प्रियेसी रिझवि तसा रे
शुक कोकिल मनिं मोद विहारे
नवल मजसी०–२

सरोवरांतरिं हंस तरंगे
कमलिनि स्नेहें अलिच्या संगें
विहार करुनी प्रेमें रंगें
नवल मजसी०–३

शशका इंगिति प्रेमें हरिणी
पाडस मोहें नयनीं पाणी
चपल शरासम धांवति रानीं
नवल मजसी०–४

अष्टदिशांचे नृपराजहि ते
पाचारिति झणिं स्वसुंदरीतें
संध्याराणी डुलत झुलत ये
नवल मजसी०–६

नभांगणींच्या रम्य उपवनीं
विकसुनि हंसती तारारमणी
रजनी राणी करित पहाणी
नवल मजसी०–७

सुधाकराची सुधा प्राशुनी
धुंदित पडतां जीव गुंगुनी
कृष्ण मेघ करि विरस येउनी
नवल मजसी०–८

घनांधकारें दर्शविण्याला
दूत यमाचा जणुं तो आला
अखिल अशाश्वत सांगायाला
नवल मजसी०–९

चंपकगंधा पवन पसरवी
खल अहि तोही डोलत ठेवी
ऋषिमुनिवाणी तंद्री लावी
नवल मजसी०-५

दृश्य जगत हें शाश्वत नाहीं
तत्व एक परि शाश्वत राही
रसिका जादू शोधुन पाहीं
तुजसि कविता विनविते १०

## ७३ आत्मज्योत : ये धांवत कृष्णाबाई०-या चालीवर

“ही रीत कशी या हरिची, किति नवलाची
त्याचीच कळे त्या साची
यमुना ही श्यामल राणी, वेड्यावाणी
करि हरिस पहावें कोणी
त्या रम्य नदितटीं बाई, कैसा राही
हा कदंबवृक्षा ठायीं
तो पीत पितांबर कटिंचा, मुकुट शिरींचा
नटवीच नटेशा साचा
गळिं मोहक माळ मजेची, सजवी त्याची
मधु मंजु बांसरी करिंची
हा ठेवुनि बोटें पांचीं, फिरवी त्याची
गहिरी ग नजर नयनाची
हरि धरी बांसरी अधरीं, करि मग हंसरी
मुद्रा ग कशी क्षणिं दुसरी
हा सप्त सूर मधु छेडी, सदा ही खोडी
करी पुन्हा पटल जग जोडी
हा याचा खेळच ऐसा, वाटे कैसा
जादुगार सखये जैसा
तो वाजवि पुंगी जेंवी, सर्पा डुलवी
व्रजमानस तैसा रमवी
हा रमवी आत्माराम, चिरसुखधाम
राधेचा मेघश्याम

केवारी हा दीनाचा निजभजकाचा
धावून येइ हा साचा
ही याची ख्याति असे परि, कधि कुणि ग तरी
बांसरी छेडि गिरिधारी
तरि बळेंच रागावूनी, छळि फिरफिरुनी
"नाहींच" असें ग म्हणुनी
परि दुसऱ्या क्षणिं हा जाई, यमुनेठायीं
तेथेंच रमे लवलाही
कुणि नाहीं ऐसें बघुनी, लपुनी छपुनी
बासरी वाजवी फिरुनी
ही श्यामल राजाराणी गातां गाणीं
थकली ग पुरी श्रुतिवाणी
त्रिभुवनीं ग याचि भरारी, बघ कैवारी
म्हणवितो पुन्हा हा भारी
मी असेंच गावें म्हणुनी, हरि फिरफिरुनी
बासरी वाजवी लपुनी
वासुदेवपदिं मति मुरली, ऐकुनि मुरली
ती आत्मज्योत मज कळली"

## ७४ व्यथिता : : : : : : :

"ऐक ऐक विनति मुरारी त्यजिसी प्रीत काय सारी
मी कोपावें त्वां हांसावें
मी लाजावें त्वां देखावें
मी न वदावें त्वां वदवावें १

सुमनें खुडतां त्वां अडवावें
माला रचितां रचुं नच द्यावें
चित्तचकोरा स्थिर न असावें २

कुंजवनीं या मज शोधावें
बांसरिनादें मज मोहावें
कृतार्थ आपण मग मानावें ३

विश्व तव पदीं जरि लोभावें
मजवांचुन परि तुज न सुचावें
स्नेहभाव कां उगि विसरावे ४

बोल कन्हैया कां कोपावें भिरिभिरि किति मी तुज शोधावें
व्यथित किती मी असें रहावें" ५

## ७५ माता : : : : : : : : :

जिच्या उदरांतुनि जन्म होइ माझा
अशी ती प्रेमपूर्ण माता
जिच्या अंकावरिं खेळ होइ माझा
अशी ती हिंदभूमि माता
जिच्या प्रेमांतुनि फुटत प्रेमपान्हा
पुनित गो करुणमूर्ति माता
जिच्या रसनेंतुनि निघत बोल माझा
मराठी दिव्य मायभाषा
जिच्या स्फूर्तियोगें वीर होइ राजा
भवानी राष्ट्रदेवि माता
जिच्या आशींतुनि विजयि वीर झाले
जिजाई स्नेहपूर्ण माता
जिच्या प्रतिभेंतुनि कवन बोल निघती
अशी ती शारदामाता
जिच्या भजनानें मनुज मुक्त होई
विठाई प्रेममूर्ति माता
पडत पारतंत्र्य विकल सर्व आतां
प्रभो ना कोणिही त्राता

## ७६ अमावास्येच्या रात्रीस : : पूर्वी—त्रिवट

" घेणार नाहिं काधिं करिं ही
चित्रित करण्या कुंचलि माझी

घोर यामिनी घोर भामिनी
नको आळवूं अशी प्रतिक्षणीं
नाहीं तारका नभिं शशिराणा
व्यर्थ कशास्तव फुलवुं कल्पना १

भारत माझा किति ग्रासियला
घोर किती अपराधाचि केला
तूंच विचारी तव हृदयाला
लाज कशी ना तुज येण्याला ४

परवशतेची सदैव दासी
कां रेखावें वद मी तुजसी
खल चित्रातें नको कुंचली
फिरवि नजर तूं झणीं आपुली २

कुटिल कृती कधिं कुणा न रुचते
तत्व सदां हें भुवनीं वसतें
तेंच माझिया मानासिं ठसतें
उगा राहि ना पळभरि येथें ३

रंगाविणें ना कृष्णमुखातें
नको श्रमाविणें मम कुंचालतें
नको हि वदणें तुझियासह तें
जाई कुलटे राहि न येथें ५

चित्रकार मी प्रतिसृष्टीचा
विधिसम माझा भाव मनाचा
चित्र काढितों मधुर कृतीचें
मनोज्ञ मंगल भाव जयाचे ६

स्वतंत्रतेच्या वातावरणीं
नाहिं ठाव तुज जा येथोनी
मंगलतेच्या शुचितम भुवनीं
राहुं नको पळ उभिहि फिरोनी ७

## ७७ मराठा : : उद्धवा शांतवन०—या चालीवर

स्वातंत्र्य देविचा दास
आठवा मराठी शौर्य
आठवा मराठा मर्द
आठवा मराठा वीर
निरखुनी मूर्ति गंभीर
फेकुनी दृष्टि चौफेर

आनंदवनींचा मोठा। जातिवंत शूर मराठा।
शौर्याचा केवळ साठा

आठवा तोच रणधीर
आठवा मराठा वीर

आठवा मराठा भाई
अशनाला अवसर नोहे
गिरि दुर्गम पथ चढतांना
जो शिदोरि बांधुनि घेई
पर्वाहि तयाची नाहीं
भरभरा भरारी घेई

त्या क्षुधा कशाची होती। अंगार पेटला चित्तीं।
स्वातंत्र्यप्राप्तिचो खंती

आठवा तोच नरवीर
आठवा मराठा वीर

आठवा मराठा भीम जो होता योद्धा खंदा
तो अचाट सामर्थ्याचा देशाचा होता बंदा
प्रत्यक्ष काळ विक्राळ अवतरे रणीं त्या वंदा
विक्रमें घुमवुनी देश । प्रतिध्वनी कथीं आदेश ।
तो भजा पुजा परमेश
स्थापुनी हृदयिं शिववीर आठवा मराठा वीर

वाढवा मराठा सिंह जो करी गर्जना घोर
'हरहर' या विक्रम नादें गिरिदऱ्यांतुनी तो थोर
पडसाद उठवि चैतन्या चेतवी मराठा जोर
तो मत्त रिपू तुडवाया । गज गंडस्थल फोडाया ।
आकंठ रुधिर प्राशाया
काननीं भ्रमे हरि फार आठवा मराठा वीर

आठवा मराठी बाणा 'मेळवा मराठा तितुका'
'वाढवा मराठी धर्म हा बोल वदा कां लटका
स्फूर्तीचा मंत्र सदा हा यवनाला देई फटका
वित्ताची पडली चिंता । तख्ताची पडली चिंता ।
प्राणाची पडली चिंता
चिंतेस मूळ तो शूर आठवा मराठा वीर

आठवा मराठा मर्द जो भी न रणीं मरणाला
प्रत्यक्ष यमाचा दूत टाकतां पाश कंठाला
हा वीर धीर समरांत कवटाळी धन्य तयाला
बांधुनी चंग हा रंगे । झुंजण्या कृतांता संगें ।
ते ध्येय कधीं ना भंगें
जो वंद्य जगीं नरवीर आठवा मराठा वीर

## ७८ समजलं हं ! : हे दयावंत यदुराया०–या चालीवर

"मी मनासारखी आहे का नाहीं सांगणें
येउं द्या दया तिळ राया
विनवितें आपुल्या पाया
मज उघड नीट सांगावें हें माझें मागणें

मजसवें सरळ वागाया
माहित ना कधिंही राया
तिटकारा येउनि आंव्या भालीं मी पाहणें

प्रीत ना कधिं मज दिधली
झुलविलें परी मी भोळी
राहिलें जादुच्या भारें आतां ना साहणें

धडपणें कधिं न वागावें
नच प्रेमें कधिं हांसावें
इंगीत यातलें सारें मज आतां सांगणें

कधिं लक्ष न तिळ घरिंदारीं
तंद्रींत आपुली स्वारी
गुंगुनी रंगते भारी का नाहीं बोलणें

मी मनासारखी नाहीं
म्हणुनियां छंद का बाई
लागला फंद नित ऐसा का मजला फसविणें
हां ! सर्व ध्यानिं तें आलें
लेखनीं चित्त रमलेलें
मग कुठुनि वेळ मिळणार संसारा सजविणें"

## ७९ मुरलीवाला : : : : : :

मुरलिवाला पाहि आला बाई मोहि मानसाला

नको ग पद तूं पुढति टाकूं
नको ग दृष्टी पुढति फेकूं
ऐक गायनाला १

हळू छपुनियां ध्वनि मुरलीचा
श्रवणिं पडूं दे मधुर हरीचा
विनविते ग तुजला २

भिरिभिरि फिरतें मुरलीसाठीं
अवचित दिसला हा जगजेठी
ठेवि हृदयिं याला ३

एकान्तीं हा बघ रमलेला
तदाकार हा कसा ग झाला
लोभवी मनाला ४

मन देउनियां मनोहराला
असें असावें रुचतें मजला
जीव गुंग झाला ५

अबला जरि मी वदतिल जन मज
परि नच परवा कथितें मी तुज
एक तोचि मजला ६

आत्मा माझा तोच हरीचा
हरिचा आत्मा तोही माझा
वेणुनाद आला ७

राधेचा हा मुरलीवाला
नच इतरांचा समज मनाचा
निश्चित गे झाला ८

पुण्याई मम सफलहि होते
हरिरुपिं बाई विलीन होतें
सफल जन्म झाला ९

## ८० पंजरीं : : जग नसे सरल हृदयाचें०—या चालीवर

हो वाचस्पति तूं आतां । पंजरीं
इतरास सदा सुखवीतां । अंतरीं
घालवी काळ लोटीतां । घडिभरीं
राजसा तुला पंजरीं । सौख्य महिवरीं । बोल कैसें
मिळतसें सदा रे ऐसें । पोपटा

शिकविलें बोलसी बोल । सर्वथा
नच जगीं तयाला मोल । सत्यता

मज उघड हृदय तव खोल । तत्वतां
मुक्तता तुला वाटते । काय भासतें । पंजरींही
मज स्पष्ट ऐकुं तें देई । पोपटा

मिष्टान्न फळें गिळतांना । रुचति कां
तुज लाड करुनि घेतांना । रुचति कां
तुज थाटमाट होतांना । रुचिती कां
ही दशा रुचे निशिदिनीं । कथी रे क्षणीं । इमानानें
पुसत मी मनोभावानें । पोपटा

स्वर्गिचें विभव भोगीलें । पंजरीं
वा नरक हाल साहीले । पंजरीं
मुक्ति वा दास्य प्रिय झालें । पंजरीं
एकला प्रश्न हा असे । वाटतें कसें । या वरोनी
तूं सांग हृदय उकलोनी । पोपटा

मम भारत तेवीं राहे । पंजरीं
त्या हाचि प्रश्न करिताहे । सत्वरी
तोषवी दशा कां दाहे । अंतरीं
तो तुझ्यासमचि या जगीं । परी तगमगीं । कर्मयोगी
आपुले भोग जो भोगी । महिवरीं

## ८१ महोत्सव : हे दयावंत यदुराया०—या चालीवर

ही वेळ घटी तव भरली बा
ही दीड दिसाची दुनिया
क्षणभंगुर नश्वर काया
परि मोह असा कां यावा
यमराया०— १

यमराया बोलवी
अंतिच्या अशा या समयीं
एकाग्र चित्त हरिपायीं
करुनियां लीन तूं होई
यमराया ५

कां चित्त तुझें फिरफिरुनी
राहतें असे अडकोनी
व्यामोह सोडि समजोनी
यमराया० २

जन्माचें फेरे सरतां
मरणाच्या घटका भरतां
निशिदिनीं चक्र फिरतांना
यमराया० ३

भय असे बोल मरणाचें
सुख कसें सांग जन्माचें
वाटते तुला तें कैचें
यमाराया० ४

नच जन्म कधींही यावा
परमेश दास तूं व्हावा
स्वरुपांत मिळोनी जावा
यमराया० ६

काळास क्रूर लेखीतो
मानवी जीव घाबरतो
परि महोत्सवचि हा सारा
यमराया० ७

शाश्वतता प्रेमें वदते
मृत्यूंत मुक्तता होते
तत्वसार उसळुनि येते
यमराया० ८

## ८२ माझी सिंधु !

विकसली न पुरती
हंसतांना ती कमल भूषवी
बघतांना ती हरिणि लाजवी
वदतांना ती मनास रमवि
अरेरे सारंगी तुटली !

संध्येला प्रिय गमलि म्हणोनी
चंद्राला ये लोभ बघोनी
रजनीनें कीं प्रेम करोनी
अरेरे भूवरुनी नेली !

माध्यान्हींचा रविही हंसोनी
बोलवि तिजला हळु खुणवोनी
दिव्य तेज तिस अर्पण करुनी
अरेरे फसवुनियां नेली !

देवा देणें कधि ना द्यावें
विनवीं तुजला जीवेंभावें
दिधलें तरि तें परत न घ्यावें
अरेरे कविता ही सरली !

कलिका सोडुनियां गेली
दिव्य तनू ती मातिंत गेली
मातिंत मिसळुनि माती झाली
पिसें लागुनी मतिही भ्रमली
अरेरे लेखणीहि थकली !

कोमल कलिका रुचलि प्रभूला
माझी सिंधु राजसबाला
भूषविली निज मंगल माला
अरेरे मूक कळी गळली !

खेळ विधीचा हा निमिषाचा
होम आमुच्या सर्वस्वाचा
सदैव हृदयीं कहर स्मृतीचा
अरेरे सारंगी तुटली !

## ८३ तो वंद्य ! : : : आनंद कंद०—या चालीवर

जो जिंकि वासनेला तो वंद्य हो जगाला
स्वार्थी न ठाव देई
निंदेस भीत नाहीं
नमवीत वासनेला तो वंद्य हो जगाला

पक्वान्न माधुरीचे
उपवास क्षीणतेचे
नच मोलही जयाला तो वंद्य हो जगाला

अमिरींत भूषविलें
फकिरींत लोळवीलें
तरि भेद नाहीं ज्याला तो वंद्य हो जगाला
सौगंध तो सुमांचा
दुर्गंध रौरवाचा
नकळे जया मनाला तो वंद्य हो जगाला

लावण्य सुंदरीचें
प्रणयांत वेधण्याचें
गमते हि तुच्छ ज्याला तो वंद्य हो जगाला

यदि खड्ग घाव होई
सुममाळ भास होई
स्थिति हो समान ज्याला तो वंद्य हो जगाला

अणुरेणुंमाजिं वारा
जड जंगमांत सारा
आनंद लाभ ज्याला तो वंद्य हो जगाला
संसार तीव्रतापें
तोडोनी आत्मरूपें
रमवीत योग लीला तो वंद्य हो जगाला

अवतार मानवाचा
सहकार श्रीहरीचा
मिळवीत मुक्ततेला तो वंद्य हो जगाला

## ८४ हरहर मोतिलाल गेला सबसे रामभजन०—या चालीवर

दुर्दैव हिंददेविचें हरहर मोतिलाल गेला
काळाचा जो काळ असे तो थरकांपवि रिपुला
हिंददेविच्या केसरीस कां स्वर्गवास रुचला
धन्य जवाहर ध्येयमनोहर देशास्तव दिधला
अमिरी सारी झुगारुनीया फकीर तो झाला
नंदनवानिचा सुगंध सारा लोपुनिया गेला
उपवन झालें अरण्य आजि निबिड ऐन वेळा
समरधुरंधर भारत चरणीं देह ठेवुनीयां
भारत तरुणां कथीं वहाया देशास्तव काया
आनंदाच्या भुवना प्रेमें अर्पुनी देशाला
औदार्यातें अनुसरुनीया तोषवि कर्णाला
कारादंडा दंड थोपटुनि खुशाल कवटाळी
भीष्म पितामह जणूं पहुडला हाय ऐनवेळीं
सतार तुटलि गाणें गातां शारदाहि थकली
ढाळित अश्रू शाहिर ऐशा शोकाकुल कालीं

## ८५ प्रमाद् : : सुरा सुरा जणुं०—या चालीवर

"जनांत माधव मनांत माधव माधव दिसतों चोंहिकडे
कांहि सुचेना कांहि रुचेना त्याविण मजला जगीं गडे
कुंजवनीं मी वेंचित सुमनें स्वप्नामाजीं निशिथिं गडे
खदखद हंसतां बघतां मजला सन्निध माधव उभा गडे
माधव माधव गुंजन करिती विहंग पाहीं गोड गोडे
माधव माधव हंबरुनीयां स्नेहें धेनू रमति गडे

माधव माधव गाणें गाती
यमुनेकांठीं तो जगजेठी
घरिंदारीं ग अंतरिं माझ्या
अशनीं शयनीं भोजनिं विपिनीं
जप जपतांना मधुर मुखानें
प्रमाद माझे कितितरि घडती
प्रमाद माझे प्रमोद देती
धरणीवरतीं गगनामाजीं
माधवमय हें विश्वच दिसतें

यमुना-लहरी गमे गडे
विहार करितो जरी गडे
विलास त्याचा असे गडे
माधव भासे मला गडे
स्नेह उपजवी सदा गडे
भान मला ना मुळीं गडे
माधव नामीं सतत गडे
माधव दिसतो चोहिंकडे
प्रमाद कां वद असे गडे"

## ८६ फटिंग : मी या जगांत वेडा ठरलो०—या चालीवर

जो तो फटिंग जन्मा येतो परि जालीं धडपडतो

जाळें मोठें हें मायेचें
अडकवि जीवा मधुराशेचे
गुरफटवी तें त्या जन्माचें
फटिंग गडबडतो- १

माया ममता स्नेह प्रेम हीं
काम क्रोध मद मत्सर राही
शिकारी घेउनि मनुज विमोही
फटिंग बडबडतो २

फटिंग येई कुठुनि कळेना
फटिंग जाई कुठें कळेना
समज मनाची कुणा पडेना
व्यामोहीं दडतो ३

दिक्कालांतुनि चित्र दिसेना
गत इतिहासीं चित्त रमेना
भविष्यवाणी कांहिं वदेना
मनुज तान घेतो ४

वातावरणीं अविरल राहुनी
सहज तुतारी ही फुंकोनी
अचल हिमनगासम मी होउनि
जगता चेतवितो ५

## ८७ अये मायभूमी : : : : : :

" अये मायभूमी अये जन्मभूमी
वंदितो तुझ्या विमल पाया

इथें जन्म माझा घरीं बाल राजा
रांगलों खेळलों स्थलीं या

हीच पाठशाला मित्र प्रेममाला
सजविली शारदा भजाया

सरस उपवनीं या चारुता वघायां
विहरलों पिसा होउनीयां

शरद्-चंद्रिकेनें सरीद् गीत गानें
हरपलें भान गोड समया

पडे लग्न-माला इथें त्याच काला
खळखळां अश्रु आज वायां

तुझ्या भक्तिसाठीं मला प्रीत मोठी
वाहिली तुझ्या पायिं काया

हाच दोष घडला घोर रोष झाला
जखडिलें शासनास द्यायां

बंदिवान झालों तुला हाय मुकलों
धाडिलें दूर देशिं वाया

कष्ट सोसतांना आपुला मी बाणा
टिकविला, झिजवुनीहि काया

असें पुण्य माझें तसें प्रेम तूझें
देवते नमित आज पायां

कितिक मित्र गेले धन्य कार्य केलें
सुरपुरीं देवमान घ्याया

पहा चंद्र हंसतो — मला 'तुच्छ' वदतो
परवशीं दुर्बला बघाया
नयानिं अश्रु आलें — प्राण क्षीण झाले
ठेवितों तुझ्या आंकिं काया !"

## ८८ परमात्मा कुठें आहे

सबसे राम०—या चालीवर.

[ भगवद् भक्त प्रल्हादास 'कुठें आहे तुझा परमेश्वर दाखव' असा प्रश्न केला असतां तो आपल्या पित्यास सांगतो, व पुढे नृसिंह अवतार होतो तो प्रसंग पुढील कवितेंत आहे. ]

"परमेश कुठें तो" पुसे प्रश्न हा दानव बालाला
बाल कथी तो भक्तशिरोमणि लालचि ईशाचा
जगतामाजीं सकलहि स्थानीं वास असे हरिचा
सुमनांमाजीं मधुपांमाजीं लतिकेसह राहे
जीवजंतुमधिं अखिल निरंजन परमात्मा आहे
निराकार तो निर्विकारमय चराचरीं भरला
अणुरेणूमधिं वायु-अग्निमधिं उदकींही नटला
सगुणरूप तो असा श्रीहरी पिंडीं ब्रह्मांडीं
व्यापुनि राहे, वाचा माझी पामर हो वेडी
हरिसत्तेविण कांहिं न चाले तृणही नच हाले
प्रेरक ऐसा परमात्मा तो सर्वांतरिं डोले
मानव सारे निमित्तमय या भूवरती ताता
सत्य कथियलें क्षमा असावी बालासी आतां
पुन्हा सांगतों त्रिवार तेंची प्रेमभरें ताता
परमात्मा तो जगदात्मा हरि सकलांचा त्राता
स्तंभामाजी श्रीहरि आहे निरखुनियां पहावें
हरिनामाचा गजर करोनी हरीगीत गावें "

असें ऐकतां दानवा कोप आला
अती दुर्मती लाथ मारी तयाला
नृसिंह प्रभूचा तदां जन्म झाला
विदारोनि त्याचा झणीं नाश केला

## ८९ नजरबंदी : : : : : वीणावाणी

" नजरबंदि कां अशी असावी
भेट जाहली पहिल्यावेळीं
वृत्ति खरोखर तदां हरपली
चमत्कृती कशि कळे न घडली
नजर०-१

जादु वसतसे नयनामाजीं
मोह उपजवी चित्तामाजीं
खचित मुग्धता येई सहजीं
नजर०-२

जादुगिरी ही कुणिं शिकविली
कळे न मजला सारी अपुली
सांगावी या मंगल कालीं
नजर०-३

कळे न मजला मनिं वाई
नजर भिडत ती जंइ नजरेला
भाव येत तो केवि मनाला
कुणि सांगावें जागिं कवणाला
नजर०-४

तृषा क्षुधा मम हरपुनि जातें
मंत्र मुग्ध मी क्षणांत होतें
जडतें केंवि प्रेमळ नातें
नजर०-५

जादुगिरीचें बक्षिस द्यावें
काय मला ते कांहीं न ठावें
कोडें केंवि उलगडवावें"
नजर०-६

## ९० हे श्यामसुंदरा : : तीन फुलें०—या चालीवर

मंदमती, होत अती — बघुनि तव कृती—हे श्यामसुंदरा
रमुनीयां, रमवुनियां — काय शोधिसी—हे श्यामसुंदरा
सजुनीयां, सजवुनियां — भक्ति पाहसी—हे श्यामसुंदरा
हंसुनीया, हंसवुनियां — स्मित विलोकिसी—हे श्यामसुंदरा
नित्य अशा, विविध दशा — रुचति व्रजिं तुला—हे श्यामसुंदरा
फसवोनी, कुंजवनीं — राहसी इथें—हे श्यामसुंदरा
नच कोणी, या स्थानीं — रुचिर शांतता—हे श्यामसुंदरा
मोहिनिचा, बांसरिचा — नाद काढिसी—हे श्यामसुंदरा
त्यजुनीया, मज वायां — रमसि कां इथें—हे श्यामसुंदरा
देह जरी, दोन परी — स्नेह अंतरीं—हे श्यामसुंदरा
मूर्ति तुझी, साउलि मी — एकरूपता—हे श्यामसुंदरा
जेथें तूं, तेथें मी — भेद कां उगा—हे श्यामसुंदरा

## ९१ परीक्षा : : : वीर अभिमन्यु०—या चालीवर

“परीक्षा आली । आली ही जवळी । चिंता देहातें जाळी
जागतों रात्रीं । रात्रीं अपरात्रीं । लागतों अभ्यासापाठीं
गणितें सारीं । सारीं सोडवुनी । भूमिति भुगोल घोकूनी
इतिहासा पाठ । पाठ करुनीया । घेतलें संस्कृत घोकाया
इंग्रजी भाषा । भाषा विषयाची । काळजी घेत बहुत साची
शंका परि येई । येइ पास होण्या । लागते हुरहुर मज वायां
बाबांचा धाक । धाक फार वाटे । चरचरा काळिज हें फाटे
ना होता पास । ‘पास’ मला मिळणें । घरांतुन हाकलून देणें
अभ्यासी खास । खास जरी असलों । परीक्षा यंत्रीं परि पडलों
दैवाची खैर । खैर जरी होई । तरी मम लाज प्रभो राही
ना तरी जाणें । जाणें त्या मार्गें । योजिलें असेल दैवानें
देवाला कींव । कींव पूर्ण येवो । सदां तो विद्यार्थ्यां पावो”

## ९२ कौतुक : : खेळायाला चांद०—या चालीवर

बालपणांतिल क्रीडेचे
किततरि नाना मौजेचे
माय तात नित प्रेमानें
कौतुक करिती मोदानें
उपवनिं कलिका फुलतांना
दिव्य गंध ती देतांना
मनुज मोहुनी करीं धरी
कौतुक सारें किती करी
पूर्ण चंद्रमा यदां असे
सुधा जगाला पाजितसे
प्रसन्नता मग मंद हंसे
सृष्टि कौतुका करित असे
गर्जत सागर भरतीनें
गमे दरारा भीतीनें
सरिता भेटत शांतपणें
कौतुक करिता प्रेमानें
स्वतंत्रतेस्तव लढतांना
वीर देह तो पडतांना
कृतांत विस्मित होवोनी
कौतुक करि त्या देखोनी
पूज्य असाति गुण जगताला
भेद भाव ना तिथें खुळा
गुण गौरव कोण जगीं करो
कौतुक करितां स्नेह वरो
ऊठ भारता ऊठ गडे
काय सांकडें तुला पडे
स्वतन्त्रतेविण कधीं नसें
कौतुक तव परि जगीं हंसें

## ९३ योगेश्वर : देशाचा पालनवाला०--या चालीवर

चेतना जगा द्यायाला योगेश्वर जगता झाला
जन्मला बंदिशालेंत गोकुळांत लीला करित
खेळला बाल गोपांत योगेश्वर जगता झाला
भक्तिचा पंथ शिकवीला मुक्तिचा मार्ग दावीला
मुरलिचा नाद छेडियला योगेश्वर जगता झाला
गोब्रह्म धन्य तेजानें तारिले संत प्रेमानें
मारिला कंस लीलेनें योगेश्वर जगता झाला
मुत्सद्दि चतुर तो राणा सत्याचा ज्याचा बाणा
जो कौरवकुल वधतांना योगेश्वर जगता झाला
कुरुक्षेत्रीं गीता कथिली संजीवनि समरीं झाली
पार्थासी स्फूर्ति दिधली योगेश्वर जगता झाला
धर्माचा पालनवाला साधूंचा प्राणच झाला
घुमवीत याच गीताला योगेश्वर जगता झाला

## ९४ खुळा चांदोबा : आनंदी आनंद०—या चालीवर

चांदोबा हा खुळा कसा हांसत राही पहा पिसा
खदखद हंसतो कशास हा वेड लागलें गमें महा
उडविति तारा पहा पहा आकाशींचा चेंडू हा
कमल फुलवितो कसा गडे छंद तयाला सदा जडे
हळुहळु बघतो जलांत हा मुळुमुळु रडतो मनीं हा
धांवत मागें पुढें असे लाटांवरचा स्वार दिसे
अम्हां मुलांना आवडतो हट्ट कराया शिकवीतो
पहात रहावें चांदोबा मनावरीं ना कधिं ताबा

## ९५ विश्वरंजन : : वनदेवी विभव०—या चालीवर

अभिनव नित सुंदर कृति विश्वरंजनाला
विविध दृश्य सौंदर्या निर्मि कौतुकाला

विश्वगोल फेंकोनी
गरगर दे फिरवोनी
शशिरविते लटकावुनी
झुलवितो तयाला

बाहुलि घडि प्राण्यांची
भर घाली आत्म्याची
निज करि धरि कळ त्यांची
सूत्रचालनाला

रत्नाकर पसरविले
नगराजा उभविले
नदि गीता घुमविलें
गान माधुरीला

जीवात्मा रंजवितो
विश्वातें तोषवितो
चिन्मोदा लुटवीतो
लोकसंग्रहाला

## ९६ हौस : : : ही मौज चांदण्याची--या चालीवर

ही हौस कल्पनेची राणी काव्य वैभवाची
लिहितों कांहीं नकळे मुळींही
ही हौस लेखनाची

जें जें गातों जें जें स्तवितों
ही हौस शारदेची

प्रसाद वाणी स्फूर्ति राणी
ही हौस रसिकतेची

प्रतिभा मानी शिकवित गाणीं
ही हौस गायनाची

सुखदुःखाची यशचिंतेची
ही हौस भावनेची
स्वातंत्र्याची निजदेशाची
ही हौस विक्रमाची
प्रभुसि पहावें प्रमुदित व्हावें
ही हौस दर्शनाची
मोल मुळींहि कधिं तिज नाहीं
ही हौस जीवनाची

## १७ राधामाधव : : सेवि रविकरा०–या चालीवर

" जाउं चल गडे कुंजवनीं रम्य सखे
उपवनिं त्या रुचिर मधुर। पाहुं कसा येइ बहर
शोभा देखुनि। जाऊं रमुनि। जाउं०–
आलिंगिति तरु लतिका। आळविती मधु कलिका
भृंगासहित। पाहूं अमित। जाउं०—
मानसिंचे हंस कसे। क्रीडति ते पाहुं तसे
पक्षें हालति। लाटा नाचति जाउं०—
बांधिन मी हिंदोला। मंगलमय त्या काला
पाहूं मानस। दोघें राजस। जाउं०–
बैसुनिया हिंदोलीं। झोके घे मग अपुली
दृष्टी जुळवूं। जीवा मोदवुं। जाउं०–
विश्वाच्या हिंदोलीं। जादु कुठें बघुं लपली
काढूं शोधुन। राधे गुंगुन। जाउं०–
सुम-माला गुंफोनी। उभय गळां घालोनी
प्रेमी बंधन। घेऊं बांधुन। जाउं०–"

## १८ भवपार : : छंद लागे मनीं०—या चालीवर

" गुंग होऊं मनीं । रम्य प्रभुदर्शनीं

सुख त्यागुनीयां
नित सेवुनीयां
झिजवूंहि काया
चंदनासम गुणी १

तूं स्वार्थत्यागी
तव-प्रेम-योगी
अनुरागमार्गीं
दंग मी गायनीं २

जें ध्येय माझें
तें ध्यान तूझें
समता विराजे
अंतरीं गुणखनी ३

कारुण्यतेनें
प्रेमी मनानें
शम दम तपानें
वेधुं जग मानिनी ४

असतां विचारी
मन निर्विकारी
भवतापहारी
संपली यामिनी ५

मी मुक्त मार्गीं
रमतों विरागी
तूं आत्मत्यागी
संसारतारिणी ६

जगदीश राजा
आत्मीय काजा
दे ज्ञान तेजा
मानवा प्रतिक्षणीं ७

संसार त्यजुनी
मनिं प्रेम धरुनी
जनता भजोनी
मुक्त होऊं क्षणीं ८ "

## १९ सन्यासी : : : : वीर अभिमन्यु

" कशाला येसी । येसि बोल मागें
परत तूं जाइ घरीं वेगें
अम्हाला नाहीं । नाहिं घरदार
थोर तूं धनिकाची पोर

राहतों आम्हीं । आम्हीं कोठेंहि
झणीं तूं निघोनियां जाई

विरागी आम्हीं । आम्हीं अवनिवरतीं
कशाला ठेविसि ही प्रीती

भूमीतल आम्हां । आम्हां शय्येला
दिशा त्या दाही वसनाला

प्रभूचें ध्यान । ध्यान, सदा बाणा
पुरवितो, जगीं देवराणा

संसारा नाहीं । नाहिं कधिं थारा
विषारी पंथ तुला सारा

धैर्य हाचि जनक । जनक असे अमुचा ।
रक्षणा करितो नित साचा

क्षमा ती जननी । जननि प्रेमपान्हा
देतसे नित्य जगीं आम्हां

दया ही भगिनी । भगिनि फार मानी
असें हें नातें कल्याणी

गेहिनी शांती । शांतिदेवि अमुची
सेवा करिते चरणाची

विरक्ती आम्हां । आम्हां नित गोड
तुझा हा छंद सोड सोड

प्रभूचे दास । दास अम्हीं फिरतों
जगाची चमत्कृती बघतों "

## १०० मोगरा : : : : : : भैरवी

मोगरा फुले । सदा । मोगरा फुले
विश्वबाग बहरले । मधुप नाचुं लागले
पवन मंद पसरले । सौरभामुळें
जन सुखावयासी पाहिं । सुमनराज जन्म वाहिं
उपकारा देह ठेवि । भावनेमुळें
युवतिकेश भूषवुनी । वीरमणी तोषवुनी
विहरत जो बालमनीं । स्नेहमय झुले
पदतालिं कुणि नाश करी । अथवा कुणि स्वकरिं धरी
नोहे त्या खंत परी । सतत तो झुले
हरिचरणीं राहि सदा । धन्य भाग्य होइ तदा
बोले मज सुमन सदा । ' मोगरा फुले '

## १०१ अभीष्टचिंतन : : : : भूपाळी.

[ देशभक्त नरसिंह चिंतामण उर्फ श्री० तात्यासाहेब केळकर यांच्या ६१ व्या वाढदिवसप्रसंगीं ]

महन्मंगला सगुणसुंदरा महाराष्ट्र माउली । लोभली
नरसिंहाच्या जन्मदिनीं धरिं प्रेमकृपा साउली ॥
देवि शारदा प्रसन्न वदनें सकौतुकें पाहते । देखते
वीणानादें नरसिंहातें प्रेरक ती वाटते ॥
प्रतिभादेवी हर्षभरानें सामोरी येउनी । ठाकुनी
वदते माझा हाच असे कीं कंठांतिल तन्मणी ॥
उपमा अवघी अभिमानानें अभीष्टता चिंतिते । भासते
नरसिंहाची अमोल सेवा बघुनि धन्य मानिते ॥

नाट्यदेवता सविता मानी नरसिंहा सर्वथा । तत्वतां
ओजस्वी यत्कुशल लेखणी विविध खेळ खेळतां ॥
विनोदनिर्झर खळखळ वाहे चरणांबुजिं धांवुनी । मोहुनी
कुशाग्रबुद्धी विनोद–पटुता त्याची ती देखुनी
राजकारणी माय भवानी तृप्त मनीं होउनी । मोहुनी
दीर्घायूतें चिंति तयाला डावपेच देउनी ॥
गर्में जनार्दन जनतारूपें हर्षभरें उमलला । विकसला
मंगल संधी अशी पाहुनी प्रसन्न तो जाहला ॥
महिमा गातां, वर्णन करितां, पुरा न होई कदा । सर्वदा
यशबल आयू चिर देवो प्रभु सदैव सुखसंपदा ॥
सुदाम पोहे नेतां ठेवी जेंवि भक्ति–भावना । दर्शना
गंधहीन ही शब्दसुमांची माळ असे पूजना ॥

## १०२ मी : : : : भूपति खरे ०–या चालीवर

ही सत्ता माझी माझें माझें सारें
मी आहे म्हणुनी चालति सर्व पसारे
मी करितों कार्यं कुशल रणाची घोर
मी अजिंक्य आहे वीरांनाही थोर
मी मुत्सद्दी मी प्रभावशाली आहे
मी सत्ताधारी बलशाली कीं आहे
मी सुंदर मोठा मदनाचा जणुं पुतळा
त्या कितीक ललना लोभति पदकमलाला
मी शास्त्री पंडित वेदांती मी जाडा
मी पंचाक्षरि मी धूर्त वाचतो पाढा

मी व्याख्याता मी तैसा नाटककार
मी मार्मिक वाचक गुणज्ञ टीकाकार
मी गायक श्रोता भोक्ता मी गुणवान
मी अष्ट प्रकारें सांभाळी अवधान
मी वैराग्याचा पुतळा योगी आहें
मी परमेशाचा दास भक्तही आहे
मी त्रिपुटि लावितों ध्यानासनिं मी बसतों
षण्मुद्रिं गुंग मी समाधिमाजीं रमतों
मी निष्कामीं नित कर्मयोगि मी आहें
मज माझें सारें पुरतें कळतें आहे

*   *   *

तूं कोण कुणाचा कोठुन येसी पाही
हें मीपण सारें विसरुनि सखया जाई
तूं मीपण जातां विसरुनि सारें जगतीं
उमजेल तुला रे ईशपदाची महती

## १०३ इषारा : : : आनंदकंद०–याचालीवर

जीवा विचार येई संसारिं मौज नाहीं
अवघें मनास कळतें
अवघें सदैव पटतें
वदतो पुन्हा पुन्हाही संसारिं मौज नाहीं
जन्मास जीव येई
कोठें निघोनि जाई
नकळे मनास कांहीं संसारिं मौज नाहीं
क्रीडा अनेक करितां
बाल्यांत काळ जातां
जाणीव ना कधींही संसारिं मौज नाहीं

पद यौवनांत येतां
रमणीसवेंहि रमतां
नच कल्पना शिवे ही संसारिं मौज नाहीं

जरठांस त्राण नाहीं
मन काळजींत राही
परि जागृती न होई संसारिं मौज नाहीं

यमदूत येति जेव्हां
जाणीव होत तेव्हां
हरिलागिं जीव वाही संसारिं मौज नाहीं

बुद्धींत थोर साचा
अवतार मानवाचा
नच भान त्यास राही संसारिं मौज नाहीं

साही रिपूस कोणी
जिंकूं शके न प्राणी
नित दास मात्र होई संसारिं मौज नाहीं

हे मानवा इषारा
कविताहि देइ सारा
हरिनाम गोड घेई संसारिं मौज नाहीं

## १०४ भावि भारत : : : लावणीच्या चालीवर

परवशतेचा काळ खरोखर झडकरि हो सरणार
अंबरिं स्वराज्यरवि येणार
भारत देशा, तुझी दुर्दशा क्षणामधीं पळणार
तुझा तूं धनी स्वतः होणार

छाति कुणाची तुला देखण्या नच कधिंही होणार
शत्रू बघोनि थरथरणार

विभवयुक्त, तव पराक्रमाचा डंका दुमदुमणार
जगाला वचक सदा बसणार

भारतदेशीं, आनंदानें प्रसन्नता रमणार
झेंडा अखंड फडफडणार

रविरायाच्या चंडप्रतापें घूक अखिल पळणार
सारे चंडोलचि गाणार

भारत देशा, अखिल बाल ते सेवक तव होणार
शौर्यें त्रिखंड दुमदुमणार

भारत देशा, स्वतंत्रतेचा काळ क्षणीं येणार
पुनरपि सुवर्णभू होणार

## १०५ कविसम्मेलन : : : : :

[ पुणें येथील पहिल्या महाराष्ट्रकविसम्मेलनास अनुलक्षून ]

धन्य शारदे ज्ञानसंपदे कविवरदे देवते । प्रेमले
मंगलमय या सभामंडपीं काव्यप्रभा फांकते ॥
उपासकांची उपसनाही अखंड वागीश्वरी । ईश्वरी
मनोज्ञमंगल उधळिति सुमनें गातां दिग्सुंदरी ॥
हिमाचलाची पावन तनया पुण्यपुरीं पातली । लोभली
नयनमनोहर कविकमलेंही ज्ञानाचीं विकसलीं ॥
अमरपुरीचा कुलगुरु येथें बृहस्पती थाटतो । भासतो
जयासन्निधीं सुरवृंदाचा ज्ञानवाद चालतो ॥

अर्चन, वंदन, पूजन, चालें महोत्सवीं प्रीतिनें । भक्तिनें
पवन सखाही शांत होतसे ऐकुनि गुणगायनें
शब्दवैभवा गुंफुनि माला अर्पिति हे कविवर । सादर
प्रसन्न होउनि तया देसि तूं स्नेहाचा निर्झर ॥

हृदयाच्या या वीणेवरची मंजु तार छेडितों । विनवितों
सनम्रभावें किंकर सेवा करुनि गान घुमवितों ।

## १०६ अपूर्वता : : दुर्बलता जाची•—या चालीवर

मंगलता येई नवनवी । पाहीं मुक्तीसी
उषासुंदरी उधळि गुलाला
नव तेजाचा अरुण उगवला
सहज बघ सुंदरता येई । नवनवी

द्विजगण गगनीं स्वैर उडोनी
मंजु गान तें किलकिल करुनी
अभय वच गाती मधु फिरूनी । नवनवी

सृष्टिसुंदरी, खद खद हांसे
त्या हास्यानें भरवि मनिं पिसे
श्रवणपथिं हेंच गीत येई । नवनवी

तमा मागुनी तेज विलसतां
क्रम असला हा सदैव असतां
अहर्निश हिंददेशिं येई, । नवनवी

अखिल जगाचा मेरु-मुकुट-मणि
हिंद साज तो आत्मभूषणीं
नवघडीं नविन तेज देई । नवनवी

## १०७ तुजसाठीं : : प्रतिकूल होईल०—या चालीवर

कविते मी तुजसाठिं सदये सकल त्यागुनीया
विहरत जगिं मोदभरानें सौख्य मानुनीया

धनविभवें मोह कधिंहि होइना मनाला
कीर्तीची हांव कधिंहि ना शिवें मनाला
शिष्टांची प्रीति कधिंहि ना कळे मनाला
आस सदा एकचि मजसी लाभ देइ पायां— १

तुजसाठीं जननिंदा मी साहितों अपार
आप्तांच्या कटु वचनातेंही पचवितों मी फार
सुहृदांचे दूषण तेंहि झेलितों अपार
तिळभरि ना खंति मला तूं ठाव देइ पायां २

तुजसाठीं चंद्रालागीं पुसत प्रश्न कांहीं
तुजसाठीं नदिच्या संगें धांवत मी जाई
तुजसाठीं दाहि दिशा मी धुंडुनिया राहीं
कोठें तव वसती सांगे विनति नम्र पायां ३

चुकलों मी हाय खुळा गे वाटतें फिरोनी
दर्शन तव कैसें मजला भाग्य तें कुठोनी
घडत न मम सेवा पुरती मूढ मी असोनी
विनवुं कैंवि लाभ मजासि देइ तरी पायां ४

करुणा तुज येवो किंवा नाहिं जरी आली
भाव मनीं वसत सदा कीं तूंच एक वाली
पाश सदा मम कंठीं तो जरि कृतांत घाली
कथिन तया पुसतां मजला, नेइ तुझ्या पायां ५

१०८

# वंदे मातरम्

मंत्र वंदे मातरम् तो जनमनाला जागवी
बंदिशालीं पिचत पडतां दिव्य तेजा बाणवी
खड्ग नंगे कंठिं पडतां खदखदां त्या हांसवी
दिव्य आत्मा गुप्त कार्या सुप्तरीतें प्रेरवी
वायुलहरीं फिरफिरोनी जीवजीवा चेतवी
रोमरोमीं विहरुनीया रतिरती ही जागवी
वीर्यशाली निर्झराचे पाट शरिरीं वाहवी
मुक्तिलाभा मेळवाया शांतिलागी स्नेहवी
भूवरोनी उडुनि लावी स्वर्गद्वारा उघडवी
हृदयवीणेवरति राहो हिंद रिझवो वैभवीं

REFBK-0004943